दैनिक
राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ८ वे । पाने ८ । मुल्य रू. ५.०० । अंक ३४ । शुक्रवार १३ नोव्हेंबर २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

अहिल्यानगर • जळगाव • धुळे • नंदुरबार • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • धाराशिव • लातूर • नांदेड • परभणी • हिंगोली • अमरावती • अकोला • यवतमाळ • बुलढाणा • वाशिम • नागपूर • वर्धा • भंडारा • गोंदिया • चंद्रपूर • गडचिरोली • मुंबई • ठाणे • पालघर • रायगड • रत्नागिरी • सिंधुदुर्ग • पुणे • सातारा • सांगली • कोल्हापूर • सोलापूर • नाशिक

पिंपरी अवघड ग्रामपंचायतीत आगीचा भडका

राहुरी : तालुक्यातील पिंपरी अवघड ग्रामपंचायतीच्या कार्यालयाला लागलेल्या आगीत ग्राम पंचायतीचे संपूर्ण सरकारी दप्तर जळून खाक झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. सोम वार, दि. ९ नोव्हेंबर रोजी रात्री ही आग लागली असून, मंगळवारी सकाळी या घटनेचा उलगडा झाला. विशेष म्हणजे, ग्रामपंचायतचे संपूर्ण रेकॉर्ड सुरक्षित ठेवलेल्या ठिकाणीच आग लागल्याने गावात उलटसुलट चर्चाना उधाण आले आहे. ही आग नेमकी कशामुळे लागली की लावण्यात आली, असा सवाल उपस्थित होत असून घटनेच्या सखोल चौकशीची मागणी जोर धरत आहे. पिंपरी अवघड ग्रामपंचायत इमारतीची पडझड झाल्याने गेल्या काही दिवसांपासून इमारतीच्या दुरुस्तीचे काम सुरू आहे. त्यामुळे मागील चार महिन्यांपासून ग्रामपंचायतीचा कारभार जवळच असलेल्या वाचनालयाच्या इमारतीतून सुरू होता. ग्रामपंचायतीचे महत्त्वाचे सरकारी दस्तऐवज, **(पान ४ वर)**

सहकाराच्या सत्तेवर डॉ. सुजय विखेंची मोहोर!

राजकीय पटावर बेरजेचे राजकारण ■ विखे-थोरात-गडाख-राम शिंदे एका छताखाली
जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदी डॉ. सुजय विखे पाटील ■ उपाध्यक्षपदी रणजितसिंह देशमुख यांची बिनविरोध





प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : जिल्ह्याच्या राजकारणात परस्परविरोधी विचारधारा, राजकीय संघर्ष आणि स्वतंत्र अस्तित्व जपणाऱ्या नेतृत्वांना सहकाराच्या एका व्यासपीठावर आणत बेरजेचे राजकारण यशस्वी करण्याची किमया साधणारे भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी अखेर अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदावर आपली मोहोर उमटवली. अध्यक्षपदी डॉ. सुजय विखे पाटील, तर उपाध्यक्षपदी रणजितसिंह देशमुख यांची गुरुवारी एकमताने निवड झाली. जिल्ह्याच्या राजकारणातील विखे, थोरात, गडाख आणि राम शिंदे या चार प्रमुख नेतृत्वांना सहकाराच्या समान व्यासपीठावर आणण्यात सुजय विखे यांनी बजावलेली समन्वयाची भूमिका या निवडीने अधोरेखित झाली आहे. त्यामुळे ही निवड केवळ जिल्हा बँकेच्या नेतृत्वबदलापुरती मर्यादित नसून जिल्ह्याच्या आगामी राजकीय आणि सहकार क्षेत्रातील नव्या समीकरणांची नांदी मानली जात आहे.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीची घोषणा झाल्यापासूनच संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष या निवडणुकीकडे लागले होते. जिल्ह्यातील सहकार क्षेत्रावर प्रभाव असलेल्या वेगवेगळ्या राजकीय गटांना एकत्र आणणे, संचालक मंडळात समन्वय राखणे आणि बँकेच्या नेतृत्वाबाबत सर्वमान्य निर्णय घडवून आणणे, हे मोठे आव्हान होते. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी **(पान ४ वर)**

शेतकऱ्यांच्या अपेक्षांचे आव्हान!

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा कणा आहे. शेतकरी, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, विकास सोसायट्या, सहकारी साखर कारखाने आणि अन्य संस्थांचे आर्थिक व्यवहार बँकेशी जोडलेले आहेत. पीककर्ज वितरण, शेतकऱ्यांना वेळेत आर्थिक मदत, सहकारी संस्थांना वित्तपुरवठा, थकबाकीचे प्रश्न, बँकेची आर्थिक शिस्त आणि आधुनिक बँकिंगचा विस्तार ही नव्या अध्यक्षांसमोरील प्रमुख आव्हाने असतील. बँकेची आर्थिक स्थिती सक्षम करताना ग्रामीण भागातील शेतकरी आणि सहकारी संस्थांना अधिक प्रभावी सेवा देण्याची अपेक्षा त्यांच्याकडून व्यक्त होत आहे.

देवळाली प्रवरात भर लोकवस्तीतील भंगार दुकानाला आग

दुकान बंद करण्यासाठी २०२३ मध्येच दिली होती नोटीस



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : देवळाली प्रवरा नगरपरिषद हद्दीतील भर लोकवस्तीमध्ये आणि शाळेच्या जवळ असलेल्या भंगार दुकानाला बुधवारी पहाटे चार वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना घडली.

या आगीत भंगार दुकानातील मोठ्या प्रमाणावरील जुनी वाहने, टायर, प्लास्टिक व अन्य साहित्य जळून खाक झाले. आग आटोक्यात आणण्यासाठी दोन ते तीन तासांचा कालावधी लागला. दरम्यान, अग्निशमन विभागाला फोन करूनही तब्बल दीड तासानंतर अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. या घटनेमुळे नगरपरिषद प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर आणि नागरिकांच्या सुरक्षिततेबाबतच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.विशेष म्हणजे, सन २०२३ मध्ये तत्कालीन मुख्याधिकारी अजित निकत यांनी या भंगार दुकानाला नोटीस बजावून दुकान बंद करण्यास सांगितले होते. मात्र, त्यानंतरही हे दुकान लोकवस्तीम ध्ये सुरू कसे राहिले, असा सवाल आता उपस्थित होत आहे. भंगार दुकानात मोठ्या प्रमाणावर ज्वलनशील साहित्याचा साठा असताना प्रशासनाने वेळीच ठोस कारवाई का केली नाही, असा संतप्त सवाल नागरिकांकडून केला जात आहे.

या परिसरात लहान मुलांची शाळा तसेच मोठी लोकवस्ती असून, आगीच्या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने नागरिकांच्या सतर्कतेमुळे मोठी जीवितहानी टळली. मात्र, भविष्यात अशी घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण, असा प्रश्नही उपस्थित केला **(पान ४ वर)**

चालत्या गाडीत रक्तरंजित थरार!

■ दोन वेगवेगळ्या घटनांनी श्रीगोंदा हादरले
■ वृद्धाचा खून तर झोपेतल्या आजीवर जीवघेणा हल्ला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : तालुक्यात हिंसक घटनांनी खळबळ उडवून दिली आहे. बाबीराच्या यात्रेवरून घरी परतणाऱ्या ६५ वर्षीय वृद्धाचा चालत्या वाहनात चाकूने वार करून खून करण्यात आला, तर दुसऱ्या घटनेत घरासमोर अंगणात झोपलेल्या ७५ वर्षीय वृद्ध आजीवर तीक्ष्ण हत्याराने प्राणघातक हल्ला करण्यात आला. किरकोळ वादातून झालेला रक्तपात आणि वृद्ध महिलेवरील हल्ला या दोन्ही घटनांनी तालुक्यात अस्वस्थता निर्माण केली आहे. विशेष म्हणजे, आजीवरील हल्ल्याप्रकरणी मृणाली नवनाथ बोरुडे याला सावडण्याचा कार्यक्रम संपल्यानंतर पोलिसांनी अटक केली. दोन्ही गुन्ह्यांतील आरोपी आता पोलिसांच्या ताब्यात आहेत.

यात्रेचा परतीचा प्रवास ठरला अखेरचा!

११ नोव्हेंबर रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास अहिल्यानगर-सोलापूर महामार्गावरील घोगरगाव फाट्याजवळ खुनाची थरारक घटना घडली. बाबीराच्या यात्रेवरून टाटा एस (एमएच १७ सीव्ही ०८१३) वाहनातून घरी परतणारे गोरनाथ रामभाऊ नाटकर (वय ६५, रा. भेर्डापूर, ता. श्रीरामपूर) यांचा वाहनातच नीलेश रंगनाथ मुंजाळ याच्याशी किरकोळ कारणावरून वाद झाला. वादाचे पर्यवसान रक्तपातात झाले. नीलेशने बॅगेतून चाकू काढून नाटकर यांच्या गळ्यावर आणि पोटावर सपासप वार केले. गंभीर जखमी झालेल्या नाटकर यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. यात्रेचा आनंद घेऊन घरी परतणाऱ्या वृद्धाचा प्रवास मृत्यूने संपला. या प्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल करून पोलिसांनी नीलेश मुंजाळ याला अटक केली आहे.



दोन घटनांनी सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर!

एका बाजूला प्रवासात किरकोळ वादातून वृद्धाचा खून होतो, तर दुसऱ्या बाजूला घराच्या अंगणात झोपलेली वृद्ध महिला हल्ल्याची शिकार होते. दोन्ही घटनांतील आरोपींना अटक झाली असली, तरी श्रीगोंदा तालुक्यातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. गुन्हे घडल्यानंतर आरोपींना पकडण्याबरोबरच अशा हिंसक घटनांना वेळीच आळा घालण्यासाठी पोलिसांची प्रतिबंधात्मक यंत्रणा अधिक प्रभावी होण्याची गरज या घटनांनी अधोरेखित केली आहे.

आजीवरील हल्ला; सावडण्याचा कार्यक्रम संपताच आरोपी जाळ्यात!

दुसरी धक्कादायक घटना निंबोडी (मांडवगण) येथे घडली. रंभाबाई दत्तू बोरुडे (वय ७५) या ३१ ऑक्टोबरच्या रात्री घरासमोरील अंगणात झोपलेल्या असताना अज्ञात हल्लेखोराने त्यांच्या डोक्यावर आणि हातावर तीक्ष्ण हत्याराने वार केले. या हल्ल्यात त्या गंभीर जखमी झाल्या. सुरुवातीला दुखापत घसरून पडल्यामुळे झाल्याचा संशय व्यक्त होत होता. मात्र वैद्यकीय तपासणीत ही दुखापत मारहाणीमुळे झाल्याचे स्पष्ट झाले आणि पोलिसांनी तपासाची दिशा बदलली. या प्रकरणी मृणाली नवनाथ बोरुडे याचा सहभाग निष्पन्न झाल्यानंतर सावडण्याचा कार्यक्रम संपताच पोलिसांनी त्याला अटक केली. या प्रकरणी बीएनएस कलम ११८(२) अन्वये गुन्हा दाखल आहे.

पाणी मिळेपर्यंत उपचार घेणार नाही

गोदावरीत पाणी सोडण्यासाठी शेतकऱ्यांचा निर्धार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

माळवाडगांव : गोदावरी नदीवरील वांजरगांव, खानापूर, कमालपूर या तीन बंधाऱ्यात पाणी सोडावे या मागणीसाठी नागमठाण गोदावरी नदी पुलावर वैजापूर श्रीरामपूर तालुक्यातील गावोगावच्या शेतकऱ्यांचे आम रण उपोषणाचा दुसऱ्या दिवशी दोन्ही तालुक्यातील प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून उपोषण कर्त्याची चौकशी तर सर्वपक्षीय नेत्यांच्या भेटीत उपोषण आंदोलनास पाठिंबा.दुसऱ्या दिवशी आज गुरूवारी सायंकाळी काही उपोषण कर्त्याची तब्येत खालावली असून त्यांनी आता आशू नव्हे तर नदी पात्रात पाणी पोहचल्या खेरीज उपचार घेण्यास नकार दिला आहे.

आमरण उपोषणाला बसलेल्या शेतकऱ्यांनी यापूर्वी १५ ऑक्टोबरला केलेले आंदोलन जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी ४-५ दिवसात मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून हक्काचे पाणी देतो असे आश्वासन दिल्यानंतर. आंदोलकांनी महंत रामगिरी म हाराज यांच्या हस्ते व विनंतीवरून आंदोलन स्थगित केले होते. मात्र तब्बल महिना भरात कार्यवाही न झाल्याने बुधवार ११ नोव्हेंबर २०२६ पासून शेतकरी संघटनेचे वैजापूर तालुकाध्यक्ष गणेश तांबे यांच्या सह दहा शेतकऱ्यांनी उपोषण सुरू केले. तीनही केटी वेअर किमान ५०% भरणे, नांदूर-मधमेश्वर येथून सोडलेल्या पाण्याची लेखी माहितीदेणे, वैजापूर-श्रीरामपूरच्या किमान १०० गावांच्या **(पान ४ वर)**



आमचे कोरडे बंधारे आंध्र कर्नाटकमध्ये आहेत काय ?

गोदावरी वरील निफाड, कोपरगांव, राहता तालुक्यातील बंधारे तुडुंब भरलेले, संगमनेर, श्रीरामपूर, राहुरी, नेवासा तालुक्यातील मुळा व प्रवरा नदीवरील बंधारेही तुडुंब भरलेले. वैजापूर श्रीरामपूर तालुक्यातील लाभधारक असलेले गोदावरी नदीवरील वांजरगांव खानापूर कमालपूर हे कोरडे बंधारे आंध्र, कर्नाटक मध्ये आहेत की काय ? असा सवाल आज उपोषणकर्त्या शेतकऱ्यांनी पाटबंधारे व महसूल अधिकाऱ्यांना विचारला आहे.

जिल्हा बँकेत पहिल्याच दिवशी हातात नांगर घेऊन जाणार : खा. निलेश लंके

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पारनेर : अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदी निवड झाल्यानंतर खासदार निलेश लंके यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरून आक्रमक भूमिका घेतली आहे. जिल्हा बँकेत पहिल्याच दिवशी हातात नांगर घेऊन जाणार आहे. कारखानदारांना कोट्यवधी रुपयांची कर्जे मिळतात, तर शेतकऱ्यांच्या मुलांना उद्योग उभारण्यासाठी मदत का मिळू नये ? बँकेतील अनियमि तता आणि कारभारातील गैरप्रकार चव्हाट्यावर आणल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.



पारनेर तालुक्यातील किन्ही-बहिरोबावाडी येथे मंगळवारी (दि. १०) किन्ही विविध विकास सेवा सोसायटीच्या नवीन इमारतीसह विविध विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन आणि जिल्हा बँकेच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल खासदार लंके यांचा नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

लंके म्हणाले, जिल्हा बँकेत कारखानदारांना सुमारे २ हजार ८५० कोटी रुपयांची बोगस कर्जे वाटप झाल्याचे प्रकार समोर आले आहेत. या सर्व बाबींचा जाब विचारणार आहे. मोठ्या लोकांच्या मुलांना कारखाने उभारण्यासाठी आर्थिक मदत मिळते, तर शेतकऱ्यांच्या मुलांनीही उद्योजक व्हावे, त्यांनाही बँकेने आर्थिक पाठबळ द्यावे. शेतकऱ्यांना न्याय देऊ शकत नसेल तर बँकेत जाण्याचा अधिकार नाही. शेतकऱ्यांच्या हितासाठी कोणाचाही मुलाहिजा ठेवणार नाही.सरकारने शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर ठोस निर्णय घेतले नसल्याने जनतेत नाराजी आहे. दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.यावेळी किन्ही विविध विकास सेवा सोसायटीच्या इमारतीसाठी २० लाख, गोरेगाव-कानूर पठार रस्त्यासाठी १ कोटी २३ लाख, तर किन्ही-सोनांबी रस्त्यासाठी ४८ लाख रुपयांच्या कामांचे भूमिपूजन व लोकार्पण करण्यात आले. कार्यक्रमास विविध राजकीय पदाधिकारी, ग्रामस्थ आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'नागवडे' कारखान्याच्या कारभारावर सहकार विभागाचा बडगा!

ऑडिट रिपोर्ट दडविण्याचा आरोप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : सुमारे ३० हजार सभासद असलेल्या श्रीगोंदा तालुक्यातील नागवडे सहकारी साखर कारखान्याच्या आर्थिक पारदर्शकतेचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल देण्यास टाळाटाळ होत असल्याची तक्रार सभासद तथा माहिती अधिकार कार्यकर्ते ॲड. भाऊसाहेब पवार यांनी केल्यानंतर सहकार विभागाने कारखाना प्रशासनाला दणका दिला आहे.

प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहिल्यानगर यांनी कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे आणि कार्यकारी संचालक प्रवीण शिंदे यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. विशेष म्हणजे, विहित मुदतीत अहवाल सादर न केल्यास सहकार कायद्यानुसार संचालक मंडळ बरखास्तीच्या कारवाईचा इशाराही नोटिशीत देण्यात आला आहे.

कारखान्याच्या आर्थिक व्यवहारांची माहिती मिळावी आणि लेखापरीक्षणातून आर्थिक स्थिती स्पष्ट व्हावी, या उद्देशाने ॲड. पवार यांनी ९ व १९ ऑक्टोबर रोजी ई-मेलद्वारे सन २०२५-२६ च्या ऑडिट रिपोर्टची मागणी केली होती. मात्र, वारंवार पाठपुरावा करूनही कारखाना प्रशासनाकडून अहवाल उपलब्ध करून देण्यात आला नाही. अखेर ३१ ऑक्टोबर रोजी त्यांनी प्रादेशिक सहसंचालकांकडे लेखी तक्रार दाखल केली. या तक्रारीत कारखान्याच्या आर्थिक व्यवहारांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता किंवा गैरव्यवहार झाला असण्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. सभासदांना कारखान्याच्या आर्थिक व्यवहारांची माहिती मिळणे हा त्यांचा अधिकार असताना अहवाल देण्यास टाळाटाळ का केली जात आहे, असा सवालही पवार यांनी उपस्थित केला आहे. अध्यक्ष राजेंद्र नागवडे आणि कार्यकारी संचालक प्रवीण शिंदे यांच्या कार्यपद्धतीवरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

या तक्रारीची दखल घेत प्रादेशिक सहसंचालक कार्यालयाने ५ नोव्हेंबर रोजी कारखाना प्रशासनाला नोटीस बजावली. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदींचा संदर्भ देत लेखापरीक्षण अहवाल कार्यालयात सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विहित मुदतीत अहवाल सादर न केल्यास कलम ७५ (५) नुसार संचालक मंडळ बरखास्तीची कारवाई होऊ शकते, असा स्पष्ट इशारा नोटिशीत देण्यात आला आहे. यापूर्वीही प्रादेशिक सहसंचालक कार्यालयात लेखापरीक्षण अहवाल सादर करण्यात आलेला नसल्याची बाब नोटिशीत नमूद करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, १८ नोव्हेंबर रोजी या प्रकरणाची सुनावणी प्रादेशिक सहसंचालकांसमोर होणार आहे. या सुनावणीस कार्यकारी संचालकांनी स्वतः उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे या सुनावणीत कारखाना प्रशासन काय खुलासा करणार, अहवाल सादर होणार का आणि सहकार विभाग पुढे कोणती भूमिका घेणार, याकडे सभासदांचे लक्ष लागले आहे.

सुमारे ३० हजार सभासदांच्या कारखान्याचा आर्थिक लेखाजोखा जाणून घेण्यासाठी एका सभासदाला थेट सहकार विभागाचे दरवाजे ठोठावावे लागत असतील, तर ही बाब निश्चितच चिंताजनक आहे. लेखापरीक्षण अहवालात नेम के काय निष्कर्ष आहेत, आर्थिक व्यवहारांबाबत कोणते आक्षेप आहेत आणि अहवाल देण्यास विलंब का झाला, या प्रश्नांची उत्तरे आता कारखाना प्रशासनाला द्यावी लागणार आहेत. मात्र, केवळ संशय व्यक्त झाल्याने गैरव्यवहार सिद्ध होत नाही. प्रत्यक्ष लेखापरीक्षण अहवाल आणि प्रशासनाचा खुलासा समोर आल्यानंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.

माहिती दिली जात नाही, लढा सुरूच ठेवणार : ॲड. पवार

नागवडे कारखाना प्रशासनाकडे रीतसर मागणी करूनही सभासदांना कोणतीही माहिती उपलब्ध करून दिली जात नाही. वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्यांनाही कारखान्याचे व्यवस्थापन आणि प्रशासन जुमानत नसल्याचे वारंवार दिसून आले आहे. कारखान्याच्या कारभारासंदर्भातील आक्षेप आणि तक्रारींना केराची टोपली दाखवली जाते. मात्र, सभासदांच्या हक्काच्या माहितीसाठी आमचा लढा सुरूच राहील. प्रसंगी न्यायालयातही लढा देऊ, असा निर्धार ॲड. भाऊसाहेब पवार यांनी व्यक्त केला.

सहकाराच्या नव्या पर्वाचे शिल्पकार !

सुजय विखे पाटील आणि रणजितसिंह देशमुख यांच्या नेतृत्वाकडे जिल्ह्याच्या अपेक्षा; राजकीय मतभेद बाजूला ठेवून सहकाराच्या विकासासाठी एकजुटीची गरज

अहिल्यानगर जिल्ह्याला सहकाराचा समृद्ध वारसा लाभला आहे. महाराष्ट्रातील सहकार चळवळीची पायाभरणी करणारे पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्यापासून सुरू झालेला सहकाराचा प्रवास आज अनेक पिढ्यांच्या योगदानाने विस्तारला आहे. सहकार ही केवळ आर्थिक उलाढालीची व्यवस्था नसून ग्रामीण अर्थकारणाला बळ देणारी, शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवणारी आणि सामाजिक विकासाला दिशा देणारी चळवळ आहे. याच ऐतिहासिक परंपरेला पुढे नेण्याची जबाबदारी आता अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या नवनिर्वाचित नेतृत्वावर आली आहे. डॉ. सुजय विखे पाटील यांची अध्यक्षपदी, तर रणजितसिंह देशमुख यांची उपाध्यक्षपदी झालेली निवड ही जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रातील नव्या पर्वाची सुरुवात मानावी लागेल.

अहिल्यानगर जिल्ह्याच्या सहकार क्षेत्राला राजकीय नेतृत्वाची मोठी परंपरा आहे. पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी सहकार, कृषी, ग्रामीण विकास आणि राजकारण या क्षेत्रांत आपल्या कार्याचा ठसा उमटवला. दुसरीकडे माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी संगमनेरच्या सहकार चळवळीला वेगळी उंची दिली. कोपरगाव परिसरातील कोल्हे कुटुंबीयांचे सहकारातील योगदान, राहुरीतील सहकारी संस्थांची परंपरा, तसेच जिल्ह्याच्या विविध भागांत उभ्या राहिलेल्या साखर कारखान्यांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ दिले. या सगळ्या प्रवासात अनेक नेत्यांनी आपापल्या परीने योगदान दिले. अर्थात, सहकारातील राजकारणही अनेकदा संघर्ष, मतभेद आणि सत्तास्पर्धेने गाजले. मात्र, जिल्हा बँकेच्या निवडीच्या निमित्ताने हे राजकीय मतभेद बाजूला ठेवून एकत्र येण्याची सकारात्मक भूमिका दिसून आली, ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे.

डॉ. सुजय विखे पाटील यांच्याकडे सहकाराची जबाबदारी येणे हा केवळ एका राजकीय घराण्याचा वारसा पुढे जाण्याचा विषय नाही. न्यूरोसर्जन म्हणून वैद्यकीय क्षेत्रात कारकीर्द घडविल्यानंतर त्यांनी सार्वजनिक जीवनात प्रवेश केला. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षपदापासून त्यांनी सहकारातील कामाला सुरुवात केली. अडचणीत असलेल्या राहुरी सहकारी साखर कारखान्याला सावरण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. गणेश सहकारी साखर कारखान्याला अडचणींतून बाहेर काढण्याच्या प्रक्रियेतही त्यांनी पुढाकार घेतला. मुळा-प्रवरा वीज संस्थेच्या अडचणीच्या काळात संस्थेची जबाबदारी सांभाळण्याचे आव्हान त्यांनी स्वीकारले. खासदार म्हणून काम करताना त्यांनी विकासकामांचा वेग आणि प्रशासनाशी समन्वय साधण्याची क्षमता दाखवून दिली.

लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतरही राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील त्यांची सक्रियता कायम राहिली. राजकारणात



यश-अपयश हे मतदारांच्या निर्णयावर अवलंबून असते. मात्र, पराभवाने खचून न जाता नव्या जबाबदाऱ्या स्वीकारत पुढे जाणे, हे नेतृत्वाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असते. जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारताना त्यांनी सहकारातील विविध विचारांच्या नेत्यांना एकत्र आणण्याची जी भूमिका बजावली, त्यातून त्यांची राजकीय समन्वयाची क्षमता अधोरेखित झाली आहे.

या निवडीत आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे बाळासाहेब थोरात यांनी दाखविलेला पुढाकार. त्यांच्या जावयाची, रणजितसिंह देशमुख यांची उपाध्यक्षपदी झालेली निवड ही केवळ कौटुंबिक किंवा राजकीय समीकरणापुरती मर्यादित न राहता जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील व्यापक समन्वयाचे प्रतीक ठरावी. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, माजी मंत्री शंकरराव गडाख, बिपिनदादा कोल्हे, आमदार मोनिका राजळे, आमदार आशुतोष काळे, माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्यासारख्या अनुभवी नेत्यांचा संचालक मंडळातील सहभाग या बँकेच्या नेतृत्वाला व्यापक अनुभवाची साथ देणारा आहे. राजकीय विचारधारा वेगवेगळ्या असल्या तरी जिल्ह्याच्या आर्थिक विकासासाठी एकत्र काम करण्याची ही संधी आहे.

मात्र, अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदाच्या निवडीने जबाबदारी संपत नाही, तर खऱ्या अर्थाने ती सुरू होते. अहिल्यानगर जिल्ह्यात सहकारी साखर कारखाने, दूध संस्था, पतसंस्था, विविध कार्यकारी सेवा सोसायट्या आणि इतर सहकारी संस्थांचे मोठे जाळे आहे. या संस्थांच्या आर्थिक अडचणी, वाढती थकबाकी, शेतकऱ्यांची कर्जाची गरज, शेतीमालाला मिळणारा अपुरा भाव, नैसर्गिक संकटे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेतील बदल ही मोठी आव्हाने आहेत. जिल्हा बँकेने केवळ कर्जवाटप आणि वसुलीपुरती भूमिका न ठेवता सहकारी संस्थांना सक्षम करण्यासाठी मार्गदर्शक आणि आधारवड म्हणून काम करणे गरजेचे आहे.

बँकेचा आर्थिक कारभार पारदर्शक, शिस्तबद्ध आणि व्यावसायिक पद्धतीने चालविणे, थकित कर्जाचे प्रमाण कमी करणे, शेतकऱ्यांना वेळेत कर्जपुरवठा करणे, सहकारी संस्थांचे आधुनिकीकरण करणे आणि नव्या पिढीला सहकाराकडे आकर्षित करणे ही काळाची गरज आहे. शासनदरबारी जिल्ह्याच्या प्रश्नांचा प्रभावी पाठपुरावा करून शेतकरी आणि सहकारी संस्थांना न्याय मिळवून देण्याचे कामही या नेतृत्वाला करावे लागणार आहे.

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी सहकारातून ग्रामीण विकासाचे स्वप्न पाहिले. पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी त्या विचारांना व्यापक दिशा दिली. आता डॉ. सुजय विखे पाटील आणि रणजितसिंह देशमुख यांच्यासमोर या वारशाला आधुनिक काळाशी जोडण्याचे आव्हान आहे. राजकीय मतभेदांपेक्षा जिल्ह्याचे हित मोठे मानून सहकारातील सर्व घटकांना सोबत घेण्याची भूमिका त्यांनी कायम ठेवली, तर जिल्हा बँक विकासाचे प्रभावी केंद्र ठरू शकते.

सहकाराचा इतिहास केवळ गौरवशाली भूतकाळ सांगण्यासाठी नसतो, तर त्यातून भविष्याची दिशा ठरवायची असते. त्यामुळे नव्या नेतृत्वाने पदांचा सन्मान राखण्याबरोबरच जबाबदारीचे भान ठेवून काम करावे. राजकीय समन्वयातून निर्माण झालेली ही एकजूट शेतकऱ्यांच्या हितासाठी आणि जिल्ह्याच्या आर्थिक समृद्धीसाठी उपयोगात आली, तरच या निवडीचे खरे सार्थक होईल. अहिल्यानगरच्या सहकाराचा इतिहास उज्ज्वल आहे; आता या इतिहासाला साजेसे नवे पर्व घडविण्याची संधी डॉ. सुजय विखे पाटील आणि रणजितसिंह देशमुख यांच्यासमोर आहे. त्यांच्या नेतृत्वातून जिल्हा बँक अधिक सक्षम होवो आणि सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी उभारी मिळो, हीच अपेक्षा!

गणेशच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडवल्याने अँड. काळे यांचा सत्कार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



टाकळीभान : गणेश सहकारी साखर कारखाना लिमिटेड गणेश नगर येथील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या प्रशासनाकडे बरेच वर्ष प्रॉव्हिडंट फंड, ग्रॅच्यूटी ,रजेचे पगार इत्यादी मिळवण्यासाठी प्रशासनकडे बारा अर्ज दिले होते. त्याची दखल घेतली गेली नाही शेवटी कामगारांनी उपोषणाचा मार्ग घेऊन ११ /९/२०२६ पासून आमरण उपोषण सुरू केले होते. शेवटी कामगारांनी अँड अजित काळे यांच्यामार्फत प्रशासनाशी चर्चा करून सेवानिवृत्त कामगारांचे प्रॉव्हिडंट फंड १.५७ लाख ग्रॅज्युटी व रजेचे पगार १.७५ लाख असे एकूण ३ कोटी ३२ लाख देण्याचे प्रशासनाकडून लेखी मान्य करून दि.२२ /९/३०२६ रोजी कामगारांचे उपोषण सोडवले, याची प्रशासनाने दखल घेऊन दि.३१/१०/२००० रोजी कामगारांची देणी जमा करण्यात आली. याबद्दल सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी ६/११/२०२६ रोजी अँड अजित काळे यांचा कर्मचाऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. सत्कारला उत्तर देताना अँड अजित काळे म्हणाले की कामगारांनी इथून पुढे शेतकरी संघटनेला वेळोवेळी सहकार्य करावे. तसेच त्यांनी कारखान्याचे चेअरमन व संचालक मंडळाचे देखील आभार मानले.व कामगारांचे आभार मानले. याप्रसंगी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष विठ्ठल शेळके, सचिव रुपेंद्र काले, कार्लस साठे सर प्रभारी व प्रवक्ते कार्लस साठे सर, युवा तालुकाध्यक्ष शरद आसने, खिर्डीचे सरपंच प्रभाकर कांबळे यांचा देखील सत्कार करण्यात आला. यावेळी सतीश नाईक, अँड प्रशांत कापसे,रमेश देशमुख,संदीप उघडे,अरविंद साळवे,भाऊसाहेब गव्हाणे,सोपान नाईक सर, बाबुराव जाधव, दीपक धनवटे, विठ्ठलराव घुले, बाळासाहेब पवार, दिलीप चौधरी, गणेश आग्रे, ज्ञानेश्वर धनवटे, सुनील डोके, बाबासाहेब बोर्डे,अमोल झिने, वेणुनाथ शेळके, साहेबराव फंड, ज्ञानेश्वर बडाख,अजित बडाख,सुनील लोहकरे, आदी सह बहुसंख्या कर्मचारी उपस्थित होते.

फटाक्यांच्या ठिणगीतून जुन्या बिडी कारखान्याच्या मागील बाजूस आग

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



नेवासा : दिवाळीच्या उत्साहात फटाक्यांची ठिणगी पडल्याने नेवासा शहरातील एकता सायकल मार्टसमोर असलेल्या जुन्या बिडी कारखान्याच्या मागील बाजूस आग लागल्याची घटना सोमवारी सायंकाळी घडली. आगीने काही काळ उग्र स्वरूप धारण केल्याने परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, स्थानिक नागरिकांनी दाखविलेल्या प्रसंगावधानामुळे संभाव्य मोठा अनर्थ टळला.

आगीची माहिती मिळताच परिसरातील इंजिनिअर बाळासाहेब वाघ याच्य परिवाराने बोअरवेल सुरू करून पाण्याची व्यवस्था उपलब्ध करून दिली. त्यानंतर पत्रकार सुधीर चव्हाण यांचे चिरंजीव आदित्य सुधीर चव्हाण, माजी सरपंच सतीश गायके आणि ज्ञानेश्वर वाघ यांनी तत्परतेने पुढाकार घेत आग विझविण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे आग आटोक्यात आणण्यात यश आले.

विशेष म्हणजे, आग पूर्णपणे विझल्यानंतर नगरपंचायतीचे अग्निशमन वाहन घटनास्थळी दाखल झाले. 'वरातीमागून घोडे' या म्हणीची आठवण करून देणारी ही परिस्थिती असली, तरी अग्निशमन वाहनाने विझविलेल्या आगीच्या ठिकाणी पाण्याचा मारा करून परिसर ओलसर ठेवण्याची खबरदारी घेतली.

या घटनेत वेळीच धावून जात मदतीचा हात देणारे बाळासाहेब वाघ व त्यांचा परिवार, सतीश गायके, ज्ञानेश्वर वाघ आणि आदित्य सुधीर चव्हाण यांच्या तत्परतेचे परिसरातील नागरिकांनी कौतुक करून त्यांचे आभार मानले.

धनगर विद्यार्थ्यांच्या स्वयंम योजनेत वार्षिक ८० हजार रुपयांपर्यंत लाभ; शैक्षणिक पात्रतेची अट ५० टक्के

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

संगमनेर : धनगर समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेताना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागू नये, तसेच त्यांना शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने राज्य शासनाने 'पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजने'त महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या आहेत. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांच्या भोजन, निवास आणि निर्वाह भत्त्यात वाढ होण्याबरोबरच शैक्षणिक पात्रतेची किमान अट ५० टक्के करण्यात आली आहे.



मुंबई येथे झालेल्या विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात आ. अमोल खताळ यांनी स्वाधार योजनेच्या धर्तीवर धनगर तसेच विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील सर्वच विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शैक्षणिक सुविधांचा प्रश्न उपस्थित केला होता. शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना स्वयंम योजनेच्या माध्यमातून आर्थिक मदत मिळत असली, तरी बारावीनंतर पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेताना असलेली ६० टक्के गुणांची अट अनेक गरजू विद्यार्थ्यांसाठी अडथळा ठरत असल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले होते. त्यामुळे ही पात्रता अट ५० टक्के करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली होती.

> आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे उच्च शिक्षण अर्धवट राहू नये, ही आपली भूमिका आहे. विधान सभेमध्ये विद्यार्थ्यांच्या अडी अडचणी मांडताना पात्रतेची अट कमी करण्या बाबतची मागणी केली होती.शासनाने योजनेतील लाभ वाढवून व पात्रतेच्या निकषांत सुधारणा करून विद्यार्थ्यांना दिलासा दिला आहे. या निर्णयामुळे ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी अधिक सुलभ होईल.
>
> **अमोल खताळ**
> **आमदार संगमनेर**

या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने ६ नोव्हेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार स्वयंम योजनेतसुधारणा जाहीर केल्या आहेत. आता शहरांच्या वर्गवारीनुसार विद्यार्थ्यांना वार्षिक ५० हजार ते ८० हजार रुपयांपर्यंत भोजन, निवास व निर्वाह भत्ता मिळणार आहे. याशिवाय वैद्यकीय व अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यासाठी ८ हजार रुपये, तर अन्य शाखांतील विद्यार्थ्यांना ४ हजार रुपये अतिरिक्त देण्यात येणार आहेत. या सुधारणा शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून लागू होणार आहेत. या निर्णयाबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे यांचे आभार मानतो असे आमदार खताळ पाटील यांनी सांगितले

गोमातेला राष्ट्रीय दर्जा मिळवण्यासाठी संतांच्या नेतृत्वाखाली स्वाक्षरी मोहीम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



नेवासा : गोहत्या बंदी लागू करावी तसेच गोमातेला राष्ट्रीय दर्जा मिळावा, या मागणीसाठी संत-महंतांच्या नेतृत्वाखाली जनजागृती व स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येत आहे. श्री क्षेत्र पैठण येथील शांतिब्रह्म संत एकनाथ महाराज मंदिरातून या मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला असून, संकलित स्वाक्षऱ्यांचे पुस्तकरूप तयार करून दिल्ली येथील जंतरमंतरवर केंद्र सरकारकडे कायदा करण्याची विनंती करण्यात येणार आहे.

दिवाळी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर या मोहिमेच्या अंतर्गत ज्येष्ठ समाजसेवक व महाराष्ट्र भूषण अरुणजी देऊळगावकर, ज्येष्ठ समाजसेवक मधुकररावजी गोरे, महाराष्ट्र भूषण भाऊसाहेब धोंगडे, निर्मल वाले, लक्ष्मण महाराज गोलांडे आणि विठ्ठल गोलांडे यांनी स्वाक्षरी करूनमोहिमेला पाठिंबा दर्शविला. यावेळी उपस्थितांना मोहिमेचे महत्त्व पटवून देत जनजागृती करण्यात आली.

या उपक्रमाला विविध स्तरांतून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून आपल्या परिसरातून देवगड देवस्थानचे महंत राष्ट्र संत गुरुवर्य श्री भास्करगिरी महाराज,महंत श्री रामगिरीजी महाराज यांच्यासह अनेक संत-महंतांनीही या मोहिमेला पाठिंबा दर्शविला आहे. गोहत्या बंदी आणि गोमातेला राष्ट्रीय दर्जा मिळावा या मागणीला व्यापक जनसमर्थन मिळविण्यासाठी स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येत आहे. नागरिकांनी या मोहिमेत सहभागी होऊन स्वाक्षरी करावी व आपला मोबाईल क्रमांक नोंदवून सहकार्य करावे, असे आवाहन ज्येष्ठ समाजसेवक महाराष्ट्र भूषण अरुण देऊळगावकर तसेच आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे. शांतिब्रह्म संत एकनाथ महाराजांच्या चरणी प्रार्थना करून सर्वांना दिवाळीच्या सुख, समाधान, आनंद व आरोग्यदायी शुभेच्छाही यावेळी देण्यात आल्या.

फटाक्यांमुळे भांड्याच्या गोदामाला भीषण आग

लाखोंचे साहित्य जळून खाक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



कोल्हार : फटाक्यांमुळे लागलेल्या आगीत कैलास पांडुरंग कोळपकर यांच्या मालकीच्या भांडयाच्या गोदामाला आज सायंकाळी भीषण आग लागली. या भीषण दुर्घटनेत गोदामातील लाखो रुपयांची भांडी आणि इतर शेतीपयोगी साहित्य जळून खाक झाले आहे. अग्निशमन दलाच्या दोन तासांच्या अथक परिश्रमानंतर या आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले.सविस्तर वृत्त असे की, आज (दि. ९) सायंकाळी ६:४५ वाजेच्या सुमारास कैलास पांडुरंग कोळपकर यांच्या मालकीच्या भांडी गोदामाला फटाक्यामुळे अचानक आग लागली. या गोदामामध्ये भांड्यांसोबतच ताडपत्री, शेडनेट आणि मुरघास बॅगा यांसारख्या साहित्याचा मोठ्या प्रमाणावर साठा होता. या ज्वलनशील साहित्यामुळे आगीने अल्पावधीतच रौद्ररूप धारण केले आणि संपूर्ण गोदाम आगीच्या भक्ष्यस्थानी पडले.आगीने भीषण रूप घेतल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली होती. घटनेची माहिती मिळताच प्रवरा सहकारी साखर कारखाना आणि राहाता नगर परिषदेच्या अग्निशमन दलाच्या बंबांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जवानांनी पाण्याचा मारा करत आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले. तब्बल दोन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर या भीषण आगीवर नियंत्रण मिळवण्यात अग्निशमन दलाला यश आले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी, आग वेगाने पसरल्यामुळे कैलास कोळपकर यांच्या मालकीचे लाखो रुपयांचे साहित्य जळून मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

दक्षिण कोरियातील आंतरराष्ट्रीय सीइओ क्लब कन्व्हेंशनसाठी तनपुरे यांची निवड

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



राहुरी : स्टार हेल्थ अँड अलाइड इन्शुरन्स कंपनी लिमिटेडच्या वतीने दक्षिण कोरिया येथे आयोजित करण्यात येणाऱ्या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय सीईओ क्लब कन्व्हेंशनसाठी राहुरी येथील संतोष एन. तनपुरे यांची निवड झाली आहे. अहिल्यानगर शाखेतून या कन्व्हेंशनसाठी निवड झालेल्या केवळ तीन विमा प्रतिनिधींमध्ये त्यांनी स्थान मिळवले असून, राहुरी तालुक्यातील एकमेव सीईओ क्लब क्वालिफायर होण्याचा मान त्यांनी संपादन केला आहे. संतोष तनपुरे हे गेल्या दहा वर्षांपासून आरोग्य विमा क्षेत्रात कार्यरत आहेत. या कालावधीत त्यांनी सातत्यपूर्ण मेहनत, उत्कृष्ट व्यावसायिक कामगिरी आणि ग्राहकाभिमुख सेवेतून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. आरोग्य विम्याचे महत्त्व नागरिकांना पटवून देणे, कुटुंबांना आर्थिक सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन करणे, त्यांच्या गरजेनुसार योग्य विमा पॉलिसी निवडण्यास मदत करणे, तसेच पॉलिसीधारकांना क्लेम प्रक्रियेत आवश्यक सहकार्य करणे, या माध्यमातून त्यांनी ग्राहकांचा विश्वास संपादन केला आहे. वाढत्या वैद्यकीय खर्चाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विम्याबाबत जनजागृती करण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले आहेत.

विवाहितेच्या छळ प्रकरणी आरोपीला सहा महिन्याचा कारावास

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

राहुरी : माहेरहून जे.सी.बी. खरेदी करण्यासाठी दहा लाख रूपये आणून दे या मागणीसाठी विवाहितेचा मानसिक व शारिरीक छळ केल्याप्रकरणी पती शेखर गोपाळ गायकवाड रा. लाख, ता. राहुरी यांना राहुरी न्यायालयाने सहा महिन्यांचा कारावास व एक लाख फिर्यादीस नुकसान भरपाई अशी शिक्षा सुनावत महत्वपूर्ण निकाल दिला आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, राहुरी तालुक्यातील मौजे राहुरी खुर्द येथील पिडीत विवाहित महिला हर्षदा शेखर गायकवाड यांचा विवाह लाख येथील शेखर गोपाळ गायकवाड यांच्याशी झाला. लग्नाच्या चार महिन्यानंतर पती शेखर गोपाळ गायकवाड व सासू विजया गोपाळ गायकवाड यांनी जे.सी.बी. आणण्याकरिता माहेरहून दहा लाख रूपये आणावे करिता फिर्यादी पिडीत महिलेचा मानसिक व शारिरीक छळ सुरू केला. या सततच्या होणार्या छळास कंटाळून पिडीत महिलेने राहुरी पोलीस ठाणे गाठत पती शेखर व सासू विजया गायकवाड यांच्या विरोधात गुन्हा रजिस्टर नं. ५८८/२०२१ भादंवि कलम ४९८ (अ),३२३, ५०४ व ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपीविरूद्ध राहुरी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर सदरच्या खटल्याचा निकाल सिनिअर डिव्हिजन न्यायमूर्ती श्रीमती .अनुपमा सी. पारशेट्टी यांचे कोर्टात सुमारे पाच वर्ष चालला. सदर खटल्यामध्ये दोन्ही बाजूकडील साक्षी पुरावे व युक्तीवादाचा विचार करून आरोपी पती शेखर गोपाळ गायकवाड याला भादंवि कलम ४९८ (अ) अन्वये गुन्ह्यासाठी दोषी ठरवून सहा महिन्यांचा कारावास व फिर्यादीस एक लाख नुकसान भरपाई सुनावण्यात आली तसेच फिर्यादीस एक लाख नुकसान भरपाई न दिल्यास सहा महिने साध्या कारावासाची शिक्षा भोगावी लागेल, असेही न्यायालयाने सांगितले. सासू विजया गायकवाड यांची या खटल्यातून निर्दोष मुक्तता करण्यात आली. सरकार तर्फे सरकारी अधियोक्ता अॅड. रवींद्र गागरे, तर मुळ फिर्यादीचे वतीने अॅड. संदिप भोंगळ यांनी काम पाहिले.

मराठी शाळा टिकविण्यासाठी समाजाने एकत्र यावे : विवेकानंद पाटील

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



आधी : संगमनेर तालुक्यातील खळी येथील सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात विद्यालयात आयोजित माजी विद्यार्थी मेळाव्यात विवेकानंद पाटील यांनी शिक्षण व्यवस्था, राजकारण आणि सामाजिक परिस्थितीवर परखड भाष्य केले. मराठी शाळांचे अस्तित्व टिकविण्यासाठी समाजाने एकत्र येण्याची गरज असून, समाज बदलण्याच्या केवळ गप्पा न मारता प्रत्येकाने प्रत्यक्ष काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

मराठी शाळा या गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची मंदिरे आहेत. मात्र, इंग्रजी माध्यमांकडे वाढता कल आणि शिक्षणाचे बाजारीकरण यामुळे मराठी शाळांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. त्यामुळे माजी विद्यार्थ्यांनी ज्या शाळेत शिक्षण घेतले, त्या शाळेच्या विकासासाठी योगदान द्यावे, असे ते म्हणाले. इंग्रजी माध्यमातील मुले सोन्याच्या पिंजऱ्यातील पोपट, तर मराठी शाळांमधील मुले गगनभरारी घेणारे गरुड आहेत, असे सांगत त्यांनी मातृभाषेतील शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले.

राजकीय व्यवस्थेवर टीका करताना त्यांनी यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील यांच्या समाजकारणाच्या परंपरेचा उल्लेख केला. पूर्वी २० टक्के राजकारण आणि ८० टक्के समाजकारण होते; मात्र आता राजकारणाला अधिक महत्त्व मिळत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. जातीय तेढ, पक्षांतर आणि राजकीय एकनिष्ठतेचा अभाव यावरही त्यांनी भाष्य केले.

मोबाईलच्या वाढत्या वापराबाबत पालकांनीही आत्मपरीक्षण करावे. मुले मोठ्यांचे अनुकरण करतात, त्यामुळे बदलाची सुरुवात स्वतःपासून करावी. हुशार विद्यार्थ्यांबरोबरच विवेकी आणि सामाजिक जाणीव असलेले नागरिक घडविणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी पदवीधर आ. सत्यजित तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात, राजेंद्र चकोर, विक्रमराजे थोरात यांच्यासह अनेक मान्यवर व माजी विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. जयश्रीताई थोरात यांच्यासह माजी विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. जुन्या आठवणींना उजाळा देतानाच शाळेच्या संवर्धनाचा आणि सामाजिक परिवर्तनाचा संकल्प या मेळाव्यात व्यक्त करण्यात आला

दोन बिबट्यांमध्ये पाणी पिण्यावरून संघर्ष; एका बिबट्याचा मृत्यू!

गौरव डेंगळे | राष्ट्र सह्याद्री



खंडाळा | श्रीरामपूर तालुक्यातील खंडाळा गावाच्या बारा जांभळी परिसरात दोन बिबट्यांमध्ये पाणी पिण्यावरून झालेल्या संघर्षात एका बिबट्याचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. पहाटेच्या सुमारास घडलेल्या या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून वन्यजीवांच्या वावराचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार,खंडाळा येथील बारा जांभळी परिसरात मेंढ्यांना पाणी पिण्यासाठी स्थानिक नागरिकांकडून एक छोटेसे टाकीवजा तळे तयार करण्यात आले आहे. या तळ्यामध्ये मेंढ्यांसाठी पाण्याची व्यवस्था करण्यात येते. याच ठिकाणी काल पहाटेच्या सुमारास दोन बिबटे पाणी पिण्यासाठी आले होते. मात्र, पाणी पिण्यावरून त्यांच्यामध्ये अचानक संघर्ष सुरू झाला. दोन्ही बिबट्यांमध्ये जोरदार झटापट झाली. या संघर्षात मोठ्या बिबट्याने लहान बिबट्यावर हल्ला केला. या हल्ल्यात लहान बिबट्याला गंभीर दुखापत होऊन त्याचा मृत्यू झाला. सकाळी ही घटना ग्रामस्थांच्या निदर्शनास आल्यानंतर परिसरात एकच चर्चा सुरू झाली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन ग्रामस्थांनी तातडीने वनविभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून माहिती दिली. माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. वनाधिकारी कानडे यांनी घटनास्थळाची पाहणी केली. त्यानंतर मृत बिबट्याचा पंचनामा करून पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी त्याला वनविभागाच्या ताब्यात घेण्यात आले. या संपूर्ण मदतकार्यात खंडाळा गावातील सुजित डेंगळे, तुषार सदाफळ, अविनाश सदाफळ, प्रतीक सदाफळ, तेजस सदाफळ यांच्यासह स्थानिक ग्रामस्थांनी वनविभागाला सहकार्य केले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26)

निमगाव जाळीत ४० कोटींचे बिबट सफारी पार्क उभारणार : डॉ. सुजय विखे पाटील

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

आधी : निमगाव जाळी येथील दुधेश्वर डोंगरावर ४० कोटी रुपये खर्चून महाराष्ट्रातील पहिले बिबट सफारी पार्क उभारण्यात येणार असल्याची घोषणा माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी केली. पिंप्री लौकी आझमपूर येथे पाडव्याच्या शुभमुहूर्तावर आश्विनी पतसंस्थेच्या नूतन शाखेचा उद्घाटन समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मांची हिल शैक्षणिक संकुलाचे संस्थापक ड. शालिग्राम होडगर होते.



डॉ. विखे पाटील म्हणाले, पतसंस्था आणि बँकांचा कारभार संवेदनशील असतो. राजकारणापासून अलिप्त राहून व्यावसायिक शिस्त आणि पारदर्शकता जपल्यासच या संस्था प्रगती करू शकतात. ३ ऑक्टोबर १९९५ रोजी लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या हस्ते संस्थेच्या पहिल्या शाखेचे उद्घाटन झाले होते. सांगळे परिवार आणि संचालक मंडळाने सभासदांचा विश्वास जपत संस्थेचा विस्तार केला आहे. चांगल्या काळात संयम आणि कठीण काळात जिद्द ठेवून काम केल्यास यश निश्चित मिळते, असेही त्यांनी सांगितले.

निमगाव जाळीत बिबट सफारी पार्क

संगमनेर परिसरातील पर्यटनाला चालना देण्यासाठी निमगाव जाळी येथील दुधेश्वर डोंगरावर सुमारे ५० एकर क्षेत्रात ४० कोटी रुपये खर्चून बिबट सफारी पार्क उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पाला केंद्र शासनाची मंजुरी मिळाली असून, पर्यटकांना सुरक्षित बंद वाहनातून बिबट्यांचे दर्शन घेता येणार आहे. येत्या १५ दिवसांत महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व वनमंत्र्यांच्या उपस्थितीत भूमिपूजन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकल्पामुळे स्थानिक तरुणांना पर्यटन आणि व्यवसायाच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. तसेच ५० कोटी रुपये खर्चाच्या प्राणिसंग्रहालयाचा प्रस्तावही विचाराधीन असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

निळवंडेचे पाणी या भागात पोहोचविण्यासाठी ४० वर्षे संघर्ष करावा लागला. पुढील तीन वर्षांत पाईपलाईनद्वारे प्रत्येक भागाला पाणी उपलब्ध करून देणार असून एकही गाव वंचित राहणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. अध्यक्षीय भाषणात ड. शालिग्राम होडगर म्हणाले, राज्यातील अनेक पतसंस्था गैरव्यवस्थापनामुळे अडचणीत असताना आश्विनी पतसंस्थेने शून्य टक्के थकबाकी राखत सभासदांना सातत्याने १५ टक्के लाभांश दिला आहे. शेतकरी आणि छोट्या व्यावसायिकांना आर्थिक पाठबळ देणारे संस्थेचे कार्य सहकार क्षेत्रासाठी दिशादर्शक आहे.

यावेळी महंत दत्तगिरीजी महाराज, कैलासनाना तांबे, मेजर संपतराव सांगळे, भाऊसाहेब लावरे, सागर गिते यांच्यासह संस्थेचे संचालक, पदाधिकारी, सभासद आणि ग्रामस्थ उपस्थित होते. प्रास्ताविक व्यवस्थापक बाळासाहेब डहाळे यांनी केले. सूत्रसंचालन संजय उंबरकर यांनी केले, तर आभार मेजर संपतराव सांगळे यांनी मानले.

द•ख•ल

शेती महामंडळ कामगारांचा १५ नोव्हेंबरला श्रीरामपुरात मेळावा

शिरसगाव : शेती महामंडळाच्या टिळकनगर मळ्यावरील कामगारांचा जाहीर मेळावा रविवार, दि. १५ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजता श्रीरामपूर येथील नेवासा रोडवरील साखर कामगार रुग्णालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती कामगार नेते सुभाष कुलकर्णी यांनी दिली. शेती महामंडळाच्या कामगारांना हक्काची दोन गुंठे जागा मिळावी, कायम कामगारांना वेतन आयोगाचे लाभ मिळावेत, रोजंदारी कामगारांना सेवाउपदान मिळावे, तसेच रोजंदारी कामगारांना कायम सेवेत सामावून घ्यावे, या प्रमुख मागण्या आहेत. या मागण्यांसाठी न्यायालयीन लढा सुरू असून काही प्रकरणे उच्च न्यायालयात प्रलंबित आहेत. हरेगाव मळ्याची हजारो एकर जमीन खासगी कंपन्यांना भाडेतत्त्वावर देताना कामगारांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही संघटनेने केला आहे. कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांची माहिती देऊन आंदोलनाची पुढील दिशा निश्चित करण्यासाठी हा मेळावा होणार आहे. यावेळी कामगार नेते अविनाश आपटे, सुभाष कुलकर्णी, भिकन शिंदे, भालचंद्र कोल्हटकर यांच्यासह पदाधिकारी मार्गदर्शन करणार आहेत. कामगारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

रास दांडिया रिल्स स्पर्धेतील विजेत्यांचा शनिवारी गौरव सोहळा

श्रीरामपूर : नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या रास दांडिया रिल्स स्पर्धेतील विजेत्यांचा बक्षीस वितरण समारंभ शनिवारी (दि. १४) श्रीरामपूर येथे होणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय महासचिव अविनाश आदिक यांच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांचा गौरव करण्यात येणार असून, माजी लोकनियुक्त नगराध्यक्ष अनुराधाताई आदिक यांच्या पुढाकारातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र कृषक समाज व आदिक परिवाराच्या वतीने आयोजित हा 'स्नेहभेट' कार्यक्रम शहरातील स्वयंवर मंगल कार्यालय येथे सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत होणार आहे. रास दांडिया रिल्स स्पर्धेतील सर्व विजेत्या स्पर्धकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या वेळी स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक बक्षिसांचे वितरण करण्यात येणार आहे. तसेच 'लाडकी लेक' हे विशेष बक्षीस माजी खासदार गोविंदराव आदिक यांच्या स्मरणार्थ, तर 'लाडकी बहीण' हे विशेष बक्षीस उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या स्मरणार्थ देण्यात येणार आहे.

ऊस व बांबूच्या शेतीला भीषण आग ; १५ गुंठे ऊस जळून खाक



कोल्हार : कोल्हार येथील गट क्रमांक ५२३ मधील ऊस व बांबूच्या शेतीला बुधवारी दुपारी एक वाजेच्या सुमारास अचानक आग लागल्याची घटना घडली. या आगीत शिरीष तात्या खर्डे यांची सुमारे २० गुंठे ऊस शेती आणि डॉ. सुनील खर्डे यांची २० गुंठे बांबूची शेती आगीच्या भक्ष्यस्थानी आली असून, यात १५ गुंठे ऊस संपूर्णपणे जळून खाक झाला आहे. लक्ष्मीबाई कुंकूलोळ संकुलातील रहिवाशांच्या निदर्शनास ऊसाच्या शेताच्या मध्यभागातून अचानक आगीचे लोळ उठत असल्याचे आले. त्यांनी प्रसंगावधान राखून तातडीने पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याच्या अग्निशमन दलाशी संपर्क साधला. माहिती मिळताच काही मिनिटांतच अग्निशमन दलाचे वाहन घटनास्थळी दाखल झाले. स्थानिक नागरिकांच्या सहकार्याने अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळविले. मात्र, तोपर्यंत सुमारे १५ गुंठे ऊस जळून खाक झाला होता. तसेच शेजारील बांबूच्या शेतीलाही आगीची मोठी झळ बसल्याने नुकसान झाले आहे. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. अग्निशमन दल, आपदा मित्र व स्थानिक नागरिकांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे आग वेळेत आटोक्यात आल्याने पुढील मोठा अनर्थ टळला.

बहिणीचे संरक्षण व सन्मान करणे हे प्रत्येक भावाचे कर्तव्य; आ. खताळ



संगमनेर : भारतीय संस्कृतीमध्ये भाऊबीज या सणाला विशेष महत्त्व आहे. बहीण-भावाच्या प्रेमाचे, विश्वासाचे आणि अतूट नात्याचे प्रतीक म्हणून हा सण देशभरात उत्साहात साजरा केला जातो. बहिणीने भावाच्या दीर्घायुष्या साठी आणि सुखसमृद्धीसाठी प्रार्थना करणे, तर भावाने बहिणीच्या सुख-दुःखात कायम तिच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे, ही या सणाची खरी शिकवण आहे. बहिणीचे हे पवित्र नाते आयुष्यभर जपले पाहिजे. तिचे संरक्षण करणे, तिला सन्मानाची वागणूक देणे आणि तिच्या स्वप्नांना बळ देणे, हे प्रत्येक भावाचे कर्तव्य आहे, असा संदेश आमदार अमोल खताळ यांनी भाऊबीज सणानिमित्त दिला. शहरातील घुलेवाडी रोड येथील आमदार खताळ यांच्या निवासस्थानी कुटुंबीयांसमवेत भाऊबीज सण साजरा करण्यात आला. यावेळी माध्यमांशी संवाद साधताना आमदार खताळ म्हणाले की, भाऊबीज हा केवळ पारंपरिक सण नसून आदर, कौटुंबिक जिव्हाळा आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा दिवस आहे. बहिणीच्या आयुष्यात सुरक्षितता, स्वाभिमान आणि आनंद निर्माण करण्यासाठी प्रत्येक भावाने प्रयत्नशील राहिले पाहिजे. बहिणीला केवळ सणाच्या दिवशी शुभेच्छा देण्यापुरते हे नाते मर्यादित न ठेवता, तिच्या प्रत्येक अडचणीत आणि आयुष्यातील महत्त्वाच्या टप्प्यांवर तिच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे आवश्यक आहे. हाच भाऊबीज सणाचा खरा संदेश असल्याचेही त्यांनी सांगितले.

श्रीरामपूर बसस्थानकाच्या बांधकामाचे भिजत घोंगडे

आ. ओगले यांच्या हस्ते ९ कोटींच्या कामाचा थाटात शुभारंभ

शफीक बागवान । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर येथील बस स्थानकाच्या पुनर्बांधणीचा सुमारे ९ कोटी ८१ लक्ष रुपयांच्या कामाचा शुभारंभ आमदार हेमंत ओगले यांच्या हस्ते तीन महिन्यापूर्वी झाल्यानंतर देखील या कामास अद्यापही मुहूर्त मिळाला नाही. निधी मंजूर होऊन तीन महिने उलटले तरी देखील काम सुरू न झाल्याबद्दल सर्वसामान्य जनतेने नाराजी व्यक्त केली आहे.

या खर्चातून नवीन बसस्थानकात १३ फलाट, वाहनतळाचे कॉंक्रीटीकरण व आगार कार्यशाळेमध्ये ४ गाळे व १ यु पिट, १ लॉगपिट, प्रशासकीय इमारत, आगार व्यवस्थापक निवास स्थान, टायर रूम, ऑइल रुम, आगार व्यवस्थापक कॅबीन, सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक कॅबिन, भांडार शाखा अशी विकासात्मक कामे केली जाणार आहेत. गेल्या दिड वर्षांपासून श्रीरामपूर बस स्थानकाच्या पुनर्बांधणीच्या कामाचा पाठपुरवा शासन दरबारी सुरु होता. त्यासाठी अनेक अडचणी आल्या. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या दालनात देखील या विषयासंदर्भात बैठका झाल्या आणि या सगळ्या पाठपुराव्याला यश आले असल्याचे सांगून या बसस्थानकाचे काम चांगल्या प्रकारे होईल असा विश्वास आमदार ओगले यांनी त्यावेळी सर्वसामान्य जनतेला दिला होता. मात्र अद्यापही बांधकाम सुरु न झाल्यामुळे तो फोल ठरला आहे. सर्वसामान्य जनता त्याची ठीकठिकाणी चर्चा करत आहे. ओगले यांनी विधानसभा निवडणुकीनंतर



श्रीरामपूर बस स्थानकाचा विषय लावून धरला अधिवेशन आणि मंत्रालयात सातत्याने पाठपुरावा केल्याने या कामाला मंजुरी मिळाली आहे. या बस स्टँडच्या विकासामुळे श्रीरामपूरच्या वैभवात भर पडणार असल्याचे नगराध्यक्ष करण ससाणे यांनी बसस्थानक बांधकाम शुभारंभाच्या कार्यक्रमावेळी सर्वांच्या निदर्शनास आणून दिले होते. मात्र ते आता स्वप्न ठरू लागले आहे.

या बसस्थानकाच्या पुनर्बांधणीच्या कामास कोणतीही गती मिळाली नाही. याबाबत तालुक्यातील आम जनतेत नाराजी आहे. निवडून आल्यापासून आमदार ओगले यांचे अद्यापपर्यंत या तालुक्यात एकही मोठे असे काम कुणाच्याही नजरेस पडले नाही, अशी सर्वसामान्य जनता चर्चा करीत आहे.

गोदावरी कालव्यांना २० नोव्हेंबरला पाणी सोडणार !

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कोपरगाव : रब्बी हंगामातील पिकांच्या सिंचनासाठी गोदावरी कालव्यांचे आवर्तन वेळेत सुरू व्हावे आणि कालव्यांच्या शेवटच्या टोकापर्यंतच्या शेतकऱ्यांना पुरेसे पाणी मिळावे, यासाठी कोपरगाव तालुका शेतकरी कृती समितीने केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे.

शेतकऱ्यांच्या मागणीची दखल घेत नाशिक पाटबंधारे विभागाने २० नोव्हेंबर रोजी गोदावरी कालव्यांना पाणी सोडण्याचे आश्वासन दिले आहे. त्यासाठी १८ नोव्हेंबरपासून धरणातून पाणी सोडण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर समितीने प्रस्तावित बेमुदत आमरण उपोषण स्थगित केले आहे.

गोदावरी कालव्यांच्या लाभक्षेत्रातील कोपरगावसह तीन तालुक्यांतील सुमारे २०० ते २५० गावांमधील शेतकऱ्यांना रब्बी हंगामासाठी वेळेत पाणी मिळावे, कालव्यांच्या शेवटच्या टोकापर्यंत पुरेशा दाबाने पाणी पोहोचावे तसेच सिंचन आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागावा, यासाठी समितीने जलसंपदा विभाग आणि महसूल प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. २४ ऑक्टोबर रोजी राहाता येथे झालेल्या कालवा सल्लागार समितीच्या बैठकीतही १५ नोव्हेंबरपूर्वी पहिले आवर्तन देण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानंतर ३० ऑक्टोबर रोजी कोपरगाव तहसील कार्यालयासह संबंधित पाटबंधारे अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. मागण्यांवर १० नोव्हेंबरपर्यंत सकारात्मक निर्णय न झाल्यास ११ नोव्हेंबरपासून कोपरगाव तहसील कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशाराही समितीने दिला होता.शेतकरी हिताच्या या मागणीप्रमाणे मा.आ.स्नेहलताताई कोल्हे यांनी यापूर्वी कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत आग्रही भूमिका मांडली होती. या पार्श्वभूमीवर कोपरगाव तालुका शेतकरी कृती समितीच्या वतीने पद्मकांत कुदळे यांनी तालुक्यातील सर्व शेतकरी आणि गोदावरी कालव्यांच्या लाभार्थ्यांच्या वतीने नाशिक पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सोनाली शहाणे यांच्याशी व्हिडिओ कॉलद्वारे संपर्क साधला. यावेळी शेतकऱ्यांच्या सिंचनाच्या प्रश्नासह पुढील आवर्तनाबाबतही सविस्तर चर्चा करण्यात आली. शहाणे यांनी २० नोव्हेंबर रोजी गोदावरी कालव्यांना पाणी सोडण्यात येणार असून, त्याच्या दोन दिवस अगोदर म्हणजेच १८ नोव्हेंबरपासून धरणातून पाणी सोडण्याची प्रक्रिया सुरू केली जाईल, असे स्पष्ट केले. हे पाणी शेतीच्या सिंचनासाठी तसेच पिण्याच्या पाण्यासाठी संयुक्त पद्धतीने उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी यापूर्वी १ डिसेंबर रोजी नियोजित असलेले आवर्तन २० डिसेंबरला घेण्यात येणार असल्याची माहिती शहाणे यांनी दिली.

गणेशच्या आठमुठे धोरणामुळे सभासद साखरेपासून वंचित : बाळासाहेब चव्हाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणतांबा : कार्यक्षेत्रातील कामधेनू समजल्या जाणाऱ्या गणेश सहकारी साखर कारखान्याच्या व्यवस्थापनाच्या आठमुठ्या धोरणामुळे पुणतांबा परिसरातील अनेक सभासदांना दिवाळीनिमित्त साखर मिळाली नाही. यामुळे सभासदांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, या प्रकाराचा जाब व्यवस्थापनाला विचारणार असल्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब चव्हाण यांनी दिला. पुणतांबा रेल्वे स्थानकाच्या पूर्वेकडील परिसरातील अनेक शेतकरी गणेश कारखान्याचे सभासद असून, त्यांनी शेतकी विभागाकडे उसाची रीतसर नोंदणी केलेली आहे. मात्र, भुयारी पुलामुळे ऊसतोडणी मजूर व वाहतुकीला अडचणी येत असल्याचे कारण देत ऊसतोडणीस टाळाटाळ केली जाते. कारखान्याची कमी गाळप क्षमता आणि तांत्रिक अडचणींमुळे हंगाम लवकर बंद होत असल्याने सभासदांना नाइलाजाने इतर कारखान्यांना ऊस द्यावा लागतो. सभासदांनी इतर कारखान्यांना ऊस दिल्याची कारणे समजून घेण्याऐवजी साखर वाटपाच्या यादीत 'विल्हेवाट' असा शेरा मारून त्यांना साखरेपासून वंचित ठेवण्यात आले. हा सभासदांचा अपमान असल्याची भावना चव्हाण यांनी व्यक्त केली. चालू हंगामातही पुरेशा ऊसतोडणी टोळ्या उपलब्ध नसल्याने सभासदांचा ऊस वेळेत तोडला जात नाही. पदाधिकारी व अधिकाऱ्यांकडे तक्रारी मांडल्यानंतरही ठोस मार्ग काढण्याऐवजी अडचणींची कारणे सांगितली जातात. कारखान्याच्या कारभारावर कोपरगावातून नियंत्रण ठेवले जात असल्याने स्थानिक पदाधिकारी निर्णय घेत नसल्याचा आरोपही त्यांनी केला. व्यवस्थापनाने आपल्या धोरणात बदल करून सभासदांच्या अडचणी सोडवाव्यात, अन्यथा गणेश कारखान्यासमोर धडक आंदोलन करण्यात येईल, असा इशारा चव्हाण यांनी दिला.

राहात्यात अज्ञात युवकाचा मृतदेह आढळल्याने खळबळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिर्डी : शहरातील युनियन बँकेसमोर आज सकाळी एका अज्ञात युवकाचा मृतदेह आढळून आल्याने शहरात मोठी खळबळ उडाली आहे. भरवस्तीत घडलेल्या या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, विविध तर्कवितर्क लावले जात आहेत. हा प्रकार काल रात्रीच्या सुमारास घडला असावा, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. आज सकाळी नेहमीप्रमाणे वर्दळ सुरू झाल्यानंतर युनियन बँकेसमोर सदर युवक निपचित अवस्थेत पडून असल्याचे स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास आले.

जवळ जाऊन पाहणी केली असता त्याचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. घटनेची माहिती मिळताच नागरिकांनी तात्काळ राहता पोलीस ठाण्याशी संपर्क साधला. घटनेचे गांभीर्य ओळखून राहता पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत परिसराची पाहणी केली. यावेळी आजूबाजूच्या नागरिकांकडे चौकशी करून मयत युवकाची ओळख पटवण्याचा प्रयत्न करण्यात आला. नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, सदर युवक रात्री दारूच्या नशेत अशाच अवस्थेत पडलेला होता.

मात्र, अद्याप त्याची कोणतीही ओळख पटू शकलेली नाही. पोलिसांनी पंचनामा पूर्ण केल्यानंतर मृतदेह ताब्यात घेऊन पुढील वैद्यकीय प्रक्रियेसाठी व शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतरच युवकाच्या मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. मयताची ओळख पटवण्यासाठी राहता पोलीस पुढील तपास करीत आहेत.

जाहिरनामा

ॲड. व्हि. व्हि. डांगे
कोर्ट नं १ में मिरगावकर साहेब
राहाता येथील मे. ज्यु.डि. मेजि. साहेब वर्ग १ यांचे कोर्टात..
कि.चौ. अर्ज नं. ३६७/२०२६

ने. ता. २६/११/२०२६

श्री. उमेश गिरिधर वडगुजर - अर्जदार
विरूद्ध-मा. मुख्याधिकारी,
सामनेवाला

ज्या अर्थी अर्जदार हे वर नमूद पात्याबरील कायमस्वरुपी रहिवासी असून आर्जदार यांची मुलगी नामे विजया उमेश वडगुजर मौजे लक्ष्मीनगर शिर्डि ता. राहाता अहिल्यानगर येथे राहत्या घरी दिनांक ०६/१०/२०११ रोजी जन्मलेली आहे अर्जदार यांची मुलगी नामे विजया उमेश वडगुजर हिचे जन्माची नोंद सामनेवाले यांच दप्तरी झालेली नाही. अर्जदार हे अपंग आहेत. अडाणी व अशिक्षित असल्याने व मुलीची जन्म नोंद करणे अनभिज्ञ असल्याने जन्म नोंद वेळेत सामनेवाले यांचेकडे करता आलेली नाही. अर्जदाराची मुलगी ही श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर कनिष्ठ महाविद्यालय येथे इयत्ता ९ वी मध्ये शिक्षण घेत आहे तिस महाराष्ट्र शासनाच्या क्रिडा स्पर्धेत सहभागी व्हायचे असल्याने महाविद्यालयामार्फत जन्म दाखल्याची मागणी करण्यात आल्याने त्याबाबत सबंधित कार्यालयात सन २०११ चे जन्म नोंद रजिस्टरला कु. विजया उमेश वडगुजर जन्म नोंद आढळून आलेली नाही. व तसा दि. १६/०९/२०२६ रोजी जन्म नोंद प्रमाणपत्र दिल्याने महाविद्यालयीन कामकाजाकरीता सदरची जन्मनोंद घेणे कामी अर्जदार यांना मुलीचे जन्म दाखल्याची गरज व आवश्यकता असल्यामुळे सदर अर्ज करणे भाग पडले आहे.

त्याअर्थी त्याबाबत कोणाचीही कोणतीही हरकत असल्यास दि २६/११/२०२६ रोजी ११.०० वाजता स्वतः जातीने अथवा आपले वकिलामार्फत हजर राहुन आपले म्हणने दाखल करावे अन्यथा पुढिल हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी आज दि. ०६/११/२०२६ रोजी माझे सहिनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले असे

न्यायालय

हुकुमावरुन
शिक्का दिवाणी व फौजदारी न्यायालय
क. स्तर राहाता

CHANGE OF NAME

I Have Change
My Old Name
Shirsath Minabai Jagannath
(Before Name)
To New Name As
(After Marriage)
Mina Kishor Jojar
(Aadhaar No.- 8992-0626-6477)
From Vide Affidavit Before Notary Public Newasa
Place : Newasa
Date : 12/11/2026

CHANGE OF NAME

I, **Bhayya Abbasbhai Pathan**, Address: Chinchvihire, Po: Rahuri Factory, Taluka -Rahuri, District -Ahmadnagar, Maharashtra – 413706.
Hereby Declare That My Old Name Was **Bhayyasaheb Abbasbhai Pathan**, As Mentioned In My School Leaving Certificate.
I Have Changed My Name From **Bhayyasaheb Abbasbhai Pathan** To **Bhayya Abbasbhai Pathan**.
Henceforth, I Shall Be Known As **Bhayya Abbasbhai Pathan** For All Purposes.

ऊसतोड कामगारांच्या झोपडीत अनिल ताके यांनी साजरी केली दिवाळी



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : दिवाळी म्हणजे आनंदाचा, उत्साहाचा आणि आपुलकीचा सण! मात्र आपल्या कुटुंबापासून शेकडो किलोमीटर दूर राहून ऊसाच्या फडात कष्ट करणाऱ्या ऊसतोड कामगारांच्या आयुष्यात दिवाळीचा आनंद अनेकदा पोहोचत नाही. अशा कष्टकरी कुटुंबांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्यासाठी भाजपचे युवा नेते अनिलराव ताके पाटील यांनी ऊसतोड कामगारांच्या झोपडीत जाऊन त्यांच्यासोबत दिवाळी साजरी केली. सलग सहाव्या वर्षी त्यांनी हा माणुसकीचा उपक्रम राबविला.

दीपावली व भाऊबीजेच्या निमित्ताने ऊसतोड कामगार आणि त्यांच्या लहानग्या मुलांना फराळ, मिठाई व फटाक्यांचे वाटप करण्यात आले. एवढेच नव्हे, तर त्यांच्या झोपडीत स्वतः पणती लावून कामगार कुटुंबांसोबत दिवाळीचा आनंद द्विगुणित केला.

यावेळी बोलताना अनिल ताके पाटील म्हणाले की, ऊसतोड कामगार आपले गाव, जिल्हा आणि प्रांत सोडून आपल्या घरापासून शंभर ते दीडशे किलोमीटर दूर येतात. ऊन, वारा, पाऊस आणि थंडीची पर्वा न करता केवळ आपल्या मुलाबाळांच्या पोटासाठी आणि कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी ते अहोरात्र कष्ट करतात. आपले सुख-दुःख, सण-वार आणि माणसं मागे ठेवून ही कुटुंबे ऊसतोडणीसाठी स्थलांतरित होतात.

दिवाळी आली की प्रत्येकाला आपल्या घरी जाऊन कुटुंबीयांसोबत सण साजरा करावा असे वाटते. मात्र ऊसतोड कामगारांची दिवाळी ऊसाच्या फडात आणि पत्र्याच्या झोपडीतच जाते. त्यांच्या लहान मुलांनाही नवीन कपडे, फटाके आणि मिठाईचा आनंद मिळावा, त्यांच्याही आयुष्यात दिवाळीचा प्रकाश पोहोचावा, या भावनेतून हा उपक्रम सुरू केल्याचे त्यांनी सांगितले.

माणुसकी जपत कष्टकरी शेतमजूर बांधवांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे आणि आपणही समाजाचे काहीतरी देणे लागतो, या भावनेतून हा उपक्रम राबविला जातो. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या 'हे विश्वची माझे घर' या उदात्त विचारातून प्रेरणा घेऊन दरवर्षी न चुकता हा उपक्रम राबवत असल्याचेही अनिल ताके पाटील यांनी नमूद केले.

यावेळी ताके पाटील यांनी कामगारांच्या झोपडीत जाऊन फराळ, मिठाई व फटाक्यांचे वाटप केले आणि झोपडीत पणती प्रज्वलित केली. त्या एका पणतीने केवळ झोपडीच उजळली नाही, तर चिमुकल्यांच्या डोळ्यांतील आनंदही उजळून निघाला. 'आपली दिवाळी तर आपण दरवर्षी साजरी करतोच; पण ज्यांची दिवाळीच विसरली गेली आहे, त्यांच्या झोपडीत जाऊन दिवाळी साजरी केली की तोच खऱ्या अर्थाने सणाचा आनंद असतो,' अशी भावना या उपक्रमातून व्यक्त झाली.अनिल ताके पाटील यांच्या या सामाजिक उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.

जाहिर नोटीस

ॲड. टी. के. शिंदे
नेवासा कोर्ट

दिनांक ०५/११/२०२६
नेमलेली तारीख: १७/१२/२०२६
नेवासा येथील मे. ज्युडी. मॅजि. साहेब वर्ग १ यांचे कोर्टात...
किरकोळ चौकशी अर्ज नं. २४९/२०२६

अर्जदार-दिपक जालिंदर जामदार वय-२४, धंदा शिक्षण रा. मक्तापुर, ता. नेवासा जि. अहिल्यानगर

सामनेवाले-निबंधक तथा ग्रामसेवक साहेब, ग्रामपंचायत मक्तापुर, ता. नेवासा जि. अहिल्यानगर

वरील अर्जदार यांनी सदरचा अर्ज या मे. न्यायालयात जन्म अणि मृत्यु अधिनियम कायदा १९६९ चे कलम १३ (३) नुसार अर्ज अर्जदाराच्या जन्माची नोंद होऊन मिळणेसाठी दाखल केलेला असुन अर्जदार हा वरील ठिकाणचा कायम स्वरुपी रहिवाशी आहे. अर्जदाराचा जन्म दिनांक १२/०२/२००२ रोजी मौजे मक्तापुर ता. नेवासा येथे घरी झाला आहे. अर्जदाराचा जन्म दवाखान्यात झालेला नाही. सदर अर्जदार याचे आई वडिल हे अशिक्षीत असल्याने त्यांना जन्माच्या नोंदीबाबत माहिती नसल्याने त्यांनी अर्जदाराचे जन्माची नोंद कोणत्याही सरकारी कार्यालयात नोंद दिलेली नव्हती व नाही. अर्जदार यास शैक्षणिक कामासाठी सदर दाखल्याची आवश्यकता असल्याने अर्जदार हा मौजे मक्तापुर, ता. नेवासा येथील ग्रामपचांयत कार्यालयात जन्म दाखला मिळण्यासाठी विचारपुस केली असता, सा.वाला ग्रामपंचायतीचे जन्म रजिस्टरला अर्जदाराचे जन्माची नोंद आढळून आली नाही.

त्याबाबत अर्जदार याने ग्रामपंचायत मक्तापुर ता. नेवासा येथे जन्माच्या दाखल्याची मागणी केली मात्र ग्रामपंचायत मक्तापुर यांचे रेकॉर्डला अर्जदार याचे जन्माची नोंद आढळून आली नाही व तसा दाखला त्यांना मिळाला नाही. तसेच ग्रामपंचायत मक्तापुर तसेच पंचायत समिती, तहसिलदार साहेब नेवासा यांचेकडे अर्जदाराचे जन्माची नोंद आढळून आली नाही म्हणुन त्यांनी जन्माचा दाखला देण्यास नकार दिला व ग्रामपंचायत मक्तापुर यांनी जन्माची नोंद नसल्याचा दाखला अर्जदार यांना दि. ०७/१०/२०२६ रोजी दिला. त्यामुळे अर्जदार यांना जन्माचा दाखला मिळण्यासाठी सदरचा अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला होता व आहे.

त्या अर्थी सदरील वादासंबंधीत कोणाचेही काही एक म्हणणे किंवा कोणाची काही एक हरकत असेल तर या जाहिर नोटीस प्रसिध्द झाले तारखेपासुन एक महिण्याच्या आत दि. १७/१२/२०२६ पर्यंत या न्यायालयात स्वतः अगर वकिलांमार्फत सर्व कागदपत्रांनिशी उपस्थित रहावे अन्यथा उपस्थित राहण्यास कसुर केल्यास सदरील अर्जाची सुनावणी होवून योग्य तो हुकुम केला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ५/११/२०२६ रोजी माझी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी नोटीस दिली असे.

नेवासा
नेमलेली तारीख : १७/१२/२०२६

तयार करणार
कनिष्ठ लिपीक
सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर
नेवासा

शिक्का

हुकुमावरुन
सहा. अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क स्तर नेवासा

पान १ वरुन

पाणी मिळेपर्यंत उपचार घेणार नाही

पिण्याच्या व जनावरांच्या पाण्याची गरज या प्रमुख मागण्यासाठी, शेतकरी संघटना तालुका अध्यक्ष गणेश तांबे, वाल्मिक गिरी, सुभाष तांबे, वैभव सावंत, महेश तांबे, डॉ.गणेश बाहुले,नारायण कनसे, माजी उपसरपंच नारायण पवार, हरीभाऊ खुरुद, दादासाहेब भराडे,गंगाधर देसाई, सुरेश भडांगे, जनार्दन गागरे, सुभाष खुरुद, बाळू घोगरे, दत्ता नरहारे, रोहित साबदे, प्रसाद खुरुद, प्रितेश देसाई, मथुराम पवार, नामदेव तागड, भिमराज चव्हाण, संतोष चौधरी, जयराम खपके, गणेश आदीक, सुभाष भराडे, दादासाहेब तोडमल, रविंद्र मुरकुटे, यांच्यासह असंख्य शेतकरी उपोषण कर्त्या समवेत बसलेले आहे. उपविभागीय अधिकारी वैजापूर जऱ्हाड, तहसीलदार सावंत, पाटबंधारे विभाग श्रीरामपूरचे उप अभियंता कल्हापुरे, एन बी कॅनॉल शाखा अभियंता शेख यांनी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. विरगांव पोलीस ठाण्याचे सहा पोलीस निरीक्षक संदिप भिवसाने यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला. सायंकाळी ७ वाजता श्रीराम पूर तालुका पोलीस ठाण्याच्या प्राशिक्षणार्थी डि वाय एस पी कल्पना पवार यांनी उपोषणस्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला.

देवळाली प्रवरात भर लोकवस्तीतील भंगार दुकानाला आग

जात आहे. याबाबत काँग्रेसचे नगरसेवक दासू उर्फ तुकाराम पठारे यांनी नगरपरिषद प्रशासनावर जोरदार टीका केली. प्रशासन कोणाच्या दबावाखाली काम करीत आहे? या भंगार दुकानदाराला कोणाचा राजकीय वरदहस्त आहे? २०२३ मध्ये नोटीस देऊनही दुकान बंद का करण्यात आले नाही? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. लोकवस्तीतील भंगार दुकान तातडीने बंद करण्याची मागणी करण्यात येणार आहे. प्रशासनाने योग्य कारवाई न केल्यास लवकरच नगरपरिषदेवर मोर्चा काढण्यात येईल, असा इशाराही नगरसेवक दासू पठारे यांनी दिला आहे. आता या घटनेनंतर तरी नगरपरिषद प्रशासन जागे होऊन नागरिकांच्या जीवित आणि आरोग्याच्या सुरक्षिततेसाठी ठोस पावले उचलणार का, याकडे देवळाली प्रवरा शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

सहकाराच्या सत्तेवर डॉ. सुजय विखेंची मोहोर!

मंत्री शंकरराव गडाख आणि विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे या चार महत्त्वाच्या नेतृत्वांमध्ये समन्वयाची भूमिका डॉ. सुजय विखे यांनी प्रभावीपणे पार पाडली.

जिल्हा बँकेच्या २१ संचालकांच्या निवडणुकीत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री बाळासाहेब थोरात आणि शंकरराव गडाख यांच्या सहमतीतून उभ्या राहिलेल्या सहकार विकास आघाडीने १७ जागांवर विजय मिळविला. निवडणुकीनंतर अकोले येथील अपक्ष संचालिका संजीवनी शिंदे यांनीही आघाडीला पाठिंबा दिल्याने हे संख्याबळ १८ वर पोहोचले. त्यानंतर सभापती प्रा. राम शिंदे यांच्या गटातील सचिन घुमरे आणि ज्योती प्रकाश शिंदे यांनीही डॉ. विखे आणि रणजितसिंह देशमुख यांना पाठिंबा दिला. त्यामुळे अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदाच्या निवडीसाठी आवश्यक असलेले बहुमत अधिक भक्कम झाले. वेगवेगळ्या राजकीय प्रवाहांतील संचालकांना एकत्र ठेवण्याचे कसब या प्रक्रियेतून दिसून आले.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत केवळ जागांचे गणित मांडण्याऐवजी जिल्ह्यातील सहकार क्षेत्राचे प्रतिनिधित्व आणि विविध भागांतील राजकीय समीकरणांचा विचार करण्यात आला. स्थानिक पातळीवरील मतभेद, राजकीय आग्रह आणि स्वतंत्र भूमिका यांमधून मार्ग काढण्यासाठी डॉ. सुजय विखे यांनी संवाद आणि समन्वयावर भर दिला. प्रत्येक घटकाला विश्वासात घेणे, संचालकांमधील गैरसमज दूर करणे आणि सामूहिक निर्णय प्रक्रियेला प्राधान्य देणे, या भूमिकेमुळे सहकार विकास आघाडीची बांधणी अधिक मजबूत झाली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनातून जिल्ह्याच्या राजकारणात वेगवेगळ्या विचारांचे नेतृत्व सहकाराच्या व्यासपीठावर एकत्र येण्याची प्रक्रिया अधिक व्यापक झाली. विखे, थोरात आणि गडाख या प्रमुख नेतृत्वांसोबत प्रा. राम शिंदे यांचाही सहभाग या नव्या समीकरणात महत्त्वाचा ठरला. राजकीय स्पर्धा असतानाही सहकाराच्या हितासाठी एकत्र येण्याची भूमिका या निवडणुकीतून पुढे आली आहे.

डॉ. सुजय विखे पाटील यांच्यासाठी सहकार क्षेत्र नवे नाही. विखे पाटील सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळताना त्यांना सहकारी संस्थांचे व्यवस्थापन, सभासदांचे प्रश्न, शेतकऱ्यांशी संबंधित आर्थिक व्यवहार आणि संस्थात्मक कामकाजाचा अनुभव मिळाला आहे. भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष म्हणून पक्ष संघटनेतील जबाबदारी सांभाळतानाच जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातही त्यांनी आपला प्रभाव वाढविला आहे. आता जिल्ह्यातील सर्वांत महत्त्वाच्या सहकारी वित्तीय संस्थांपैकी एक असलेल्या जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी त्यांच्याकडे आली आहे. जिल्ह्याच्या राजकारणातील वेगवेगळ्या प्रवाहांना एकत्र आणण्याचे आव्हान यशस्वीपणे पेलल्यानंतर आता डॉ. सुजय विखे पाटील यांच्यासमोर जिल्हा बँकेच्या कारभाराची मोठी जबाबदारी आहे. राजकीय समन्वयातून मिळालेल्या नेतृत्वाला आर्थिक व्यवस्थापन, शेतकऱ्यांचे हित आणि सहकारी संस्थांचे प्रश्न सोडविण्याच्या कामातून सिद्ध करावे लागणार आहे. अध्यक्षपदी सुजय विखे आणि उपाध्यक्षपदी रणजितसिंह देशमुख यांच्या निवडीमुळे जिल्हा बँकेच्या नेतृत्वाला नवी दिशा मिळाली असून, या नव्या नेतृत्वाच्या माध्यमातून जिल्ह्यातील सहकार क्षेत्राची वाटचाल कोणत्या दिशेने होते, याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवारी निवड प्रक्रिया पार पडली. यावेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्यासह नवनिर्वाचित संचालक डॉ. सुजय विखे पाटील, शंकरराव गडाख, रणजितसिंह देशमुख, आमदार अक्षय कर्डिले, बिपीन कोल्हे, आमदार मोनिका राजळे, राजश्री घुले, करण ससाणे, दत्ता पानसरे, सचिन जगताप, ज्योती प्रकाश शिंदे, आमदार प्राजक्त तनपुरे, आमदार आशुतोष काळे, अनुराधा नागवडे, संगीता जयंत वाघ, कारभारी जावळे, गणपतराव सांगळे, वैभव पिचड, संजीवनी शिंदे, सचिन घुमरे आदी उपस्थित होते.

पिंपरी अवघड ग्रामपंचायतीत आगीचा भडका

नोंदवह्या आणि संपूर्ण दप्तर याच ठिकाणी सुरक्षित ठेवण्यात आले होते. मात्र, सोमवारी रात्री अचानक आग लागल्याने या सर्व दस्तऐवजांची राख झाली. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या प्रशासकीय कामकाजासमोरही मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.मंगळवारी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास कर्मचारी संजय वाघमारे हे ग्रामपंचायत

गावात पाणी सोडण्यासाठी आले असता त्यांना आगीची घटना निदर्शनास आली. त्यांनी तातडीने ग्रामस्थांना माहिती दिली. घटनेची वार्ता समजताच माजी सरपंच सुरेश लांबे, कमलेश लांबे, रावसाहेब गायकवाड, अनिल गायकवाड, जेम्स गायकवाड यांच्यासह ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. पाणी टाकून आग आटोक्यात आणण्यात आली.

दरम्यान, राहुरी पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार भाऊसाहेब शिरसाठ व अर्जुन दारकुंडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. मात्र, ग्रामपंचायतीचे संपूर्ण दप्तर आगीत नष्ट झाल्याने या घटनेचे गांभीर्य अधिक वाढले आहे. ही आग अपघाताने लागली की यामागे अन्य काही कारण आहे, याबाबत गावात तर्कवितर्क सुरू आहेत. सरकारी दस्तऐवज जळून खाक होण्यामागील नेमके कारण स्पष्ट व्हावे, यासाठी संबंधित यंत्रणेने सखोल चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

गावोगावी कारखानदारांची पुतळे जाळून निषेध करणार : रवींद्र मोरे

ऊस भावाचे आंदोलन चिघळण्याची चिन्हे

राजेंद्र परदेशी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर येथील भाऊसाहेब संतुजी थोरात या कारखान्याने ३२०० रुपयांचा भाव जाहीर करून शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसल्याचा आरोप करून शिवसेना शेतकरी सेनेच्या वतीने जाहीर निषेध करण्यात आला असल्याचे शेतकरी सेनेचे नेते रवींद्र मोरे यांनी सांगितले. नुकताच काल भाऊसाहेब संतुजी थोरात सहकारी साखर कारखान्याने ऊसाला प्रतिटन ३२०० रुपये भाव जाहीर करून ऊस उत्पादक शेतकऱ्यांची मोठी निराशा केली आहे. कारखानदारांच्या या निर्णयाचा शिवसेना शेतकरी सेनेच्या वतीने तसेच समस्त ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने आम्ही तीव्र शब्दांत जाहीर निषेध करीत असल्याचे रवींद्र मोरे यांनी सांगितले. ते पुढे बोलताना म्हणाले की, मागील वर्षी साखरेचे दर प्रतिकिलो ३५ रुपये असतानाही कारखान्याने शेतकऱ्यांना प्रतिटन ३१०० रुपये भाव दिला होता. मात्र यावर्षी साखरेचे दर प्रतिकिलो ५१ ते ५२ रुपयांपर्यंत पोहोचलेले असताना केवळ ३२०० रुपये भाव जाहीर करणे म्हणजे शेतकऱ्यांच्या कष्टाची थट्टा करण्यासारखे आहे. साखरेच्या दरामध्ये मोठी वाढ झालेली असताना ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या भावात केवळ १०० रुपयांची वाढ कशी? साखरेच्या दरवाढीचा फायदा नेमका कोणाला मिळत आहे? शेतकऱ्यांच्या घामाचा मोबदला देताना कारखानदारांच्या हाताला काय झाले आहे? शेतकरी दिवसरात्र मेहनत करतो, कर्ज काढतो, खतांचा आणि औषधांचा वाढता खर्च सहन करतो. मात्र ऊसाला योग्य भाव देण्याची वेळ आली की कारखानदार हात आखडता घेत आहेत. ही शेतकऱ्यांची आर्थिक लूट असून ती आम्ही कोणत्याही परिस्थितीत सहन करणार नाही.शिवसेना शेतकरी सेनेच्या वतीने उद्यापासून गावोगावी शेतकऱ्यांना एकत्र येण्याचे आवाहन करण्यात येत आहे. कारखानदारांच्या या अन्यायकारक निर्णयाविरोधात लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारण्यात येईल. येणाऱ्या काळात मोठे जनआंदोलन छेडण्यात येणार असून शेतकऱ्यांना न्याय्य ऊसदर मिळेपर्यंत आमचा संघर्ष थांबणार नाही. कारखानदारांनी तातडीने आपल्या निर्णयाचा फेरविचार करून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य आणि रास्त भाव जाहीर करावा, अन्यथा या आंदोलनाची तीव्रता वाढवण्यात येईल.शेतकऱ्यांच्या घामाला योग्य दाम मिळालाच पाहिजे अन्यथा प्रत्येक गावोगावी कारखानदारांचे पुतळे जाळून निषेध व्यक्त करण्याचा निर्धार शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आला. उसाला योग्य तो भाव मिळेपर्यंत आम्ही शांत बसणार नसल्याचा निर्धार शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे.

दीपावलीनिमित्त यशवंतनगर येथे गरजू कुटुंबांना शिधावाटप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिंगणापूर : दीपावलीचा सण सर्वांच्या जीवनात आनंद, उत्साह आणि समाधान घेऊन यावा, या सामाजिक भावनेतून नेवासा तालुक्यातील वंजारवाडी परिसरातील यशवंतनगर येथील जिल्हा परिषद शाळेत गरजू लाभार्थ्यांसाठी शिधावाटपाचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत परिसरातील तब्बल १५० गरजू कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंच्या शिध्याचे वाटप करण्यात आले.

समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू कुटुंबांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी, तसेच त्यांच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी हातभार लागावा, या उदात्त हेतूने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना शिध्याचे वाटप करण्यात आले. सणासुदीच्या काळात मिळालेल्या या मदतीमुळे गरजू कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला असून त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव उमटले.यावेळी अहिल्यानगर जिल्ह्याचे वरिष्ठ डाक अधीक्षक विकास पालवे, भाऊसाहेब निमसे, नाथा शंकर दराडे, भाऊसाहेब आदमाने, बारगळ काका, सानप मेजर, येळवंडे साहेब, सुनील सरोदे, काकडे गुरुजी आणि पालवे बाळासाहेब यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. केवळ सण साजरा करण्यापुरते मर्यादित न राहता समाजातील वंचित व गरजू घटकांच्या आनंदात सहभागी होणे, हीच खरी सामाजिक बांधिलकी असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. गरजूंच्या मदतीसाठी पुढाकार घेणाऱ्या या सेवाभावी उपक्रमाचे परिसरातून सर्वत्र कौतुक होत आहे.

मदतीचा हात, आनंदाची दिवाळी!समाजातील प्रत्येक घटकाला सणाचा आनंद घेता यावा, या भावनेतून राबविण्यात आलेला १५० कुटुंबांचा हा शिधावाटप उपक्रम सामाजिक एकोपा, माणुसकी आणि सेवाभावाचे दर्शन घडविणारा ठरला.

निधनवार्ता

कस्तुरबाई जाधव



नेवासा तालुक्यातील घोडेगाव येथील दीपक हिंदू खानावळअ फर्मच्या संचालिका श्रीमती कस्तुरबाई रंगनाथ नाना जाधव (वय ८५) यांचे अल्पशा आजाराने पाडव्याच्या दिवशी निधन झाले. यांच्या पश्चात तीन मुले, मुली, सूना,नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.दीपक हिंदू खानावळ फर्मचे मुख्य संचालक दीपक जाधव, माजी पंचायत समिती सदस्य अरुण जाधव, रमेश जाधव यांच्या त्या मातोश्री, एकनाथ जाधव यांच्या भावजाई, दादासाहेब जाधव,अमोल जाधव,अनिल जाधव,प्रेम जाधव,विनोद जाधव,गौरव जाधव यांच्या त्या आजी होत्या.

क्रांतिवीर भागोजी नाईकांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे गरजेचे : बाळासाहेब तोरणे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पढेगाव :आदिवासी समाजाच्या स्वाभिमानासाठी आणि हक्कांसाठी संघर्ष करणारे क्रांतिवीर भागोजी नाईक यांचे कार्य समाजाला नेहमीच प्रेरणा देणारे आहे. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन माजी पंचायत समिती सभापती बाळासाहेब तोरणे यांनी केले.

आदिवासी प्रबोधन सेवा संघाच्या वतीने पढेगाव (ता. श्रीरामपूर) येथे क्रांतिवीर भागोजी नाईक स्मृतिदिनानिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि क्रांतिवीर भागोजी नाईक यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. बाळासाहेब तोरणे म्हणाले, क्रांतिवीर भागोजी नाईक यांनी अन्यायाविरुद्ध संघर्ष करत समाजात स्वाभिमान, एकता आणि धैर्याची भावना निर्माण केली. त्यांचे कार्य केवळ एका समाजापुरते मर्यादित नसून संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी आहे. नव्या पिढीने त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन सामाजिक बांधिलकी जपली पाहिजे. यावेळी मराठा सेवा संघाचे डॉ. अरविंद बडाख, नेताजी फाउंडेशन पढेगावचे अध्यक्ष रंजीतदादा बनकर आणि मराठी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष प्रदीप आहेर यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी क्रांतिवीर भागोजी नाईक यांच्या कार्याला उजाळा देत अभिवादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकाश पवार यांनी केले. याप्रसंगी भाऊसाहेब खरूसे, गोपीनाथ बर्डे, महेश बर्डे, भागवत बेळे, के. टी. तोरणे, मुकुंद लबडे, संजय काळे, सलीम शेख, अशोक सहकारी कारखान्याचे संचालक वाय. जी. बनकर, ज्येष्ठ मान्यवर राजू मामा तोरणे, राजेंद्र तोरणे, बाबासाहेब तोरणे, तंट्या ब्रिगेडचे अध्यक्ष सुनील मोरे यांच्यासह ग्रामस्थ व मान्यवर उपस्थित होते.

वंचित शेतकऱ्यांना पिक कर्ज मिळवून देणार : संतोष जाधव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

गंगापूर : तालुक्यातील लासुर येथील सर्व राष्ट्रीयकृत बँक्सकडून दोन दोन महिने शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटपास टाळाटाळ करून शेतकऱ्यांना पीक कर्जापासून वंचित ठेवण्यात आले असून सर्व शेतकऱ्यांना पिक कर्ज मिळावे म्हणून बँक व्यवस्थापकांना भेटून शेतकऱ्यांचे पीक कर्जाचा प्रश्न मार्गी लावणार असल्याचे शेतकरी नेते संतोष जाधव यांनी सांगितले यगंगापूर तालुक्यात दुष्काळ जाहीर झालेला असताना तसेच शासनाने कर्ज माफी केली परंतु बँकांनी शेतकऱ्यांना मुदतीत पिक कर्ज देणे बंधनकारक आहे. मात्र लासुर येथील सर्व राष्ट्रीयकृत बँक्सकडून दोन दोन महिने शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटपास टाळाटाळ करून शेतकऱ्यांना पीक कर्जापासून वंचित ठेवून कुरिल डाव सर्व शाखेच्या व्यवस्थापकांनी आखला आहे, परंतु ऐन दुष्काळा सारख्या संकटात आणि दिवाळी सारख्या महत्वाच्या सणाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी प्रचंड अडचणीत असताना बँकेचे मनमानी व आडमुठे धोरण कदापी सहन करणार नसल्याचे इशारा संतोष जाधव यांनी दिला आहे. सर्व शेतकऱ्यांना हक्काचे पीक कर्ज मिळवून देण्यासाठी व बँकेची मनमानी मोडीत काढण्यासाठी आमदार प्रशांत बंब यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकरी नेते तथा अर्थ व बांधकाम सभापती संतोष जाधव, लासुर बाजार समिती संचालक सर्व बँकेत जाऊन शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करून घेण्यासाठी बँक अधिकाऱ्यांना प्रवृत्त करणार असून शेतकऱ्यांनी परिपूर्ण कागदपत्रासह १३ नोव्हेंबर रोजी सकाळी ठीक दहा वाजता लासुर स्टेशन मार्केट कमेटी कार्यालय येथे उपस्थित राहावे असे आवाहन शेतकरी नेते संतोष जाधव यांनी केले आहे.

शहापूरात शेतकऱ्यांचा चार एकर ऊस जळुन खाक

महावितरणकडुन नुकसान भरपाईची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

गंगापूर : तालुक्यातील शहापूर येथे विद्युत तारेचे घर्षण होऊन शेतकऱ्याचा जवळपास चार एकर उस जळून सहा लाख रुपयांचे नुकसान झाल्याने शेतकरी मोठा संकटात सापडला असून महावितरणने नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

गंगापूर तालुक्यातील शहापूर येथे परभत गवारे यांच्या गट नंबर १११ मध्ये उसाच्या शेतात विद्युत ट्रांसफार्मर असून १० नोव्हेंबर रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास वाऱ्यामुळे विद्युत तारेचे घर्षण झाल्याने उस पेटण्यास सुरुवात होऊन या शेतकऱ्याचे जवळपास चार एकर उस जळुन जवळपास सहा लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

> गंगापूर तालुक्यात ठीक ठीकाणी महावितरणच्या शेतात जाणाऱ्या पोलवरिल विद्युत तारेचे घर्षण होऊन आता पर्यंत अनेक ठीकाणी उस जळाले असून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे पहायला मिळत असुन नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना महावितरण कंपनीने नुकसान भरपाई द्यावी व तालुक्यातील लोंबकळलेल्या ताराची तसेच ट्रांसफार्मरची दुरुस्ती करावी परत अशा घटना घडू नये याची दक्षता घेण्याची मागणी शेतकरी करत आहे.

शेतकरी नेते संतोष जाधव यांनी पिडीत शेतकऱ्यांच्या जळालेल्या उसाच्या शेतात पाहणी करून शेतात असलेल्या विद्युत ट्रान्सफॉर्मर महावितरणने इतर ठीकाणी हलवून संबंधित शेतकऱ्यास नुकसान भरपाई द्यावी अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा देताच महावितरण कडुन त्वरित दखल घेऊन ट्रांसफार्मर इतर ठिकाणी हलवण्यात आले.



सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

नशिबाची परिक्षा

शुक्रवार दि. १३ नोव्हेंबर २०२६

मिलनम डे
उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

	१८०		१४९	१२८
९	२३४	४	२४८	१ २९०
	२२५		२००	१५५

९३-०९-४२-५४-१७-२१

कल्याण
उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

	१२०		१८९	१२९
३	२३८	८	२६०	२ ३४६
	३५५		२३३	२५५

३७-१३-८९-५८-२०-६२

मुंबैम (मेन)
उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

	१४०		१२३	१४५
५	२५८	६	२४०	० २३५
	३६६		४६६	२९९

५४-१५-६२-३६-०९-२०

माधुरी बाजार डे / नाईट			
१२४ २७८ ८९०	७-३	२४७ ४७० ५६७	७३-६८-८२- २६-५०
२ - ६ - ८			

dpbosssss.live

माधुरी बाजार डे	माधुरी बाजार नाईट
५९०	३७०
४५	०७
१५९	४६७

Mydpboss.com

निधनवार्ता

शंकरराव भुसारी



सोनई : सोनई- -लोहोगाव रोडवरील रहिवासी शंकर यादव भुसारी वय ७६ यांचे नुकतेच वृद्धप काळाने निधन झाले. त्यांच्या पाश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे. मुळा कारखान्यात कार्यरत असणारे बाळासाहेब भुसारी व लक्ष्मण भुसारी यांचे ते वडील होत.

कस्तुरीबाई जाधव



घोडेगाव - नेवासा तालुक्यातील घोडेगाव येथील गं.भा. कस्तुराबाई रंगनाथ जाधव (वय ७५) यांचे वृद्धपकाळाने निधन झाले, असुन त्यांच्या पाश्चात तीन मुलं सुना नातवंड असा मोठा परिवार असून त्या दीपक उद्योग समूह व हॉटेल दीपकचे मालक अरुण रंगनाथ जाधव तसेच दिपक रंगनाथ जाधव, रमेश रंगनाथ जाधव यांच्या मातोश्री होत.

विजयाबाई छाजेड



श्रीरामपूर : येथील जैन समाजातील जेष्ठ धार्मिक महिला विजयाबाई शांतीलाल छाजेड (वय ८४) यांचे बुधवार, दि. ११ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात २ मुले, सुना, दीर व नातू असा परिवार आहे. त्या विजया राईस या किराणा दुकानाचे मालक संजय, संतोष छाजेड यांच्या मातोश्री होत.

शांताबाई कोकरे



श्रीरामपूर : येथील वॉर्ड नं. ७, जवाहर कारखान्यामागे वास्तव्यास असलेल्या शांताबाई महादेव कोकरे (वय ७६) यांचे मंगळवार, दि. १० रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, ४ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्या महादेव धर्माजी कोकरे यांच्या पत्नी व अण्णासाहेब, राजेंद्र, सोमनाथ, रामचंद्र कोकरे यांच्या त्या मातोश्री होत.

धोंडीराम आंबरे गुरुजी



गणोरे - हिवरगाव आंबरे (ता.अकोले) येथील सेवानिवृत्त शिक्षक धोंडीराम आंबरे गुरुजी (वय ८५) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले व दोन मुली असा परिवार आहे. रामदास धोंडीराम आंबरे व सुधिर धोंडीराम आंबरे यांचे वडील होते. हिवरगांव आंबरे येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

गोपीनाथ पोटे



श्रीरामपूर : येथील दत्त किराणा अँड जनरल स्टोअर्सचे मालक सुभाष व संजय पोटे यांचे वडील गोपीनाथ त्रिंबक पोटे (वय ८४) यांचे बुधवार, दि. १० रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, २ मुली, सुना, जावई व नातवंडे असा परिवार आहे. ते श्रीरामपूर नगरपालिकेच्या नगरसेविका वैशाली पोटे यांचे ते सासरे होत.

कौसल्या साळवे



शिरसगाववार्ताहर : हरीगाव येथील कौसल्या पुंजाजी साळवे (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पती, ४ मुली, ३ मुले सुना नातवंडे जावई असा परिवार आहे. माजी मुख्याध्यापक पुंजा कचरू साळवे यांच्या त्या पत्नी होत.

खंडाळ्यात टँकर द्वारे पाणी पुरवठा सुरुवात

२५ हजार लिटरचे ५ टँकर मंजूर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

वैजापूर: गेल्या अनेक दिवसांपासून खंडाळा गावात दुष्काळामुळे निर्माण झालेल्या पाणीटंचाईचा प्रश्न सोडवण्यासाठी जिल्हा परिषद सदस्य संजय पाटील निकम व पंचायत समिती सदस्य हुसेनभाई शेख यांनी सातत्याने पाठपुरावा केला.सर्वसाधारण सभा असो किंवा दुष्काळ निवारण बैठक, प्रत्येक ठिकाणी या दोन्ही लोकप्रतिनिधींनी खंडाळा गावच्या पाणीप्रश्नाचा मुद्दा ठामपणे मांडला. वारंवार पाठपुरावा करून गावाला पाणी मिळावे यासाठी अथक प्रयत्न केले.अखेर त्यांच्या या जिद्दीला आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश आले असून, २५ हजार लिटर क्षमतेचे ५ पाण्याचे टँकर मंजूर झाले आहेत.या टँकरडरे आणण्यात येणारे पाणी गावातील ३ लाख लिटर क्षमता असलेल्या मुख्य पाण्याच्या टाकीत सोडण्यात येणार आहे. त्यामुळे गावात नियमित व नियोजनबद्ध पाणीपुरवठा होणार असून, नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.आज सोमवार दि. ९ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा परिषद सदस्य संजय पाटील निकम व पंचायत समिती सदस्य हुसेन शेख यांच्या हस्ते टँकरचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा परिषद सदस्य संजय पाटील निकम, पंचायत समिती सदस्य हुसेन शेख, चांद अमीर साहब, अशरफ खान, बाबू खासाब, मोहम्मद शेख, विलास पवार, नसिम जमीनदार, ताराचंद वेळंजकर, अक्रम पठाण, रहीम बागवान, साजिद खान, गफ्फार खान, अकील शेख, बाबुराव थोरात, मोबीन शेख, मोहसीन शेख, महेश जगदाळे, राजु आंबेकर, दिग्विजय पवार, पोपट बागुल, योगेश पवार, कैलास बागुल, मच्छिंद्र वेळंजकर, रामदास बागुल, मगन मस्के आदी उपस्थित होते.



> खंडाळ्यातील पाणीटंचाईचा प्रश्न आम्ही प्रत्येक बैठकीत लावून धरला होता. अखेर टँकर मंजूर झाले आहेत. गावातील एकही कुटुंब पाण्यावाचून वंचित राहणार नाही, याची काळजी घेतली जाईल.
>
> **-- संजय पाटील निकम, जिल्हा परिषद सदस्य**

> पाणी हा गावाचा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आज टँकर सुरू झाले आहेत. मुख्य टाकीत पाणी सोडल्यामुळे वितरणात सुसूत्रता येईल.सर्व ग्रामस्थांना पाणी मिळेल
>
> **-- हुसेन शेख, पंचायत समिती सदस्य**

क्रांतीसुर्य भगवान बिरसा मुंडा जयंतीनिमित्त जनजातीय गौरव सप्ताहाचे आयोजन : पालकमंत्री डॉ. विखे पाटील

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त १५ नोव्हेंबर रोजी संपूर्ण देशात 'जनजातीय गौरव दिन' साजरा करण्यात येणार असून, त्यानिमित्त अहिल्यानगर जिल्ह्यात ११ ते १८ नोव्हेंबर या कालावधीत विविध उपक्रमांनी जनजातीय गौरव सप्ताहाचे आयोजन करण्यात येणार आहे. आदिवासी समाजाचा गौरवशाली इतिहास, स्वातंत्र्यलढ्यातील योगदान, सांस्कृतिक अस्मिता, शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि आर्थिक विकासाच्या संधी याबाबत जनजागृती करण्याबरोबरच शासकीय योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यावर या सप्ताहात विशेष भर देण्यात येणार असल्याची माहीती जलसंपदा तथा पालकमंत्री डॉ राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून भगवान बिरसा मुंडा यांची जयंती केवळ औपचारिक उत्सवापुरती मर्यादित न ठेवता आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रेरणादायी पर्व म्हणून साजरी करण्याची भूमिका घेण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने २०२१ पासून १५ नोव्हेंबर हा दिवस 'जनजातीय गौरव दिवस' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात आदिवासी क्रांतिकारकांनी दिलेले योगदान राष्ट्रीय स्तरावर अधोरेखित करण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरला आहे असेही ते म्हणाले.

भगवान बिरसा मुंडा यांचे कार्य आणि विचार केवळ आदिवासी समाजापुरते मर्यादित नसून संपूर्ण देशासाठी प्रेरणादायी आहेत. ब्रिटिशांच्या अन्यायकारक आणि शोषणकारी राजवटी विरोधात त्यांनी आदिवासी समाजाला संघटित करून 'उलगुलान' अर्थात महान जनआंदोलन उभारले. जल, जंगल आणि जमीन या नैसर्गिक साधन संपत्तीवरील आदिवासी समाजाच्या अधिकारांसाठी त्यांनी संघर्ष केला. अवघ्या २५ वर्षांच्या आयुष्यात स्वाभिमान, स्वातंत्र्य, सामाजिक परिवर्तन आणि राष्ट्रभक्तीचा विचार त्यांनी



देशासमोर ठेवला. त्यांचे जीवन आजच्या तरुण पिढीसाठी संघर्ष, त्याग, नेतृत्व आणि देशप्रेमाचा आदर्श आहे असेही ते म्हणाले.

१३ नोव्हेंबर : शासकीय योजनांचे वितरण आणि आर्थिक स्वावलंबन जनजातीय गौरव सप्ताची सुरुवात धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचे मंजुरी आदेश व लाभ वितरित करून करण्यात येणार आहे. युवकांना स्वयंरोजगार, व्यवसाय, आर्थिक स्वावलंबन आणि कृषिपूरक व्यवसायांबाबत मार्गदर्शन करण्यात येईल. कृषी विभाग, बँका आणि संबंधित शासकीय यंत्रणांच्या माध्यमातून आदिवासी लाभार्थ्यांना विविध योजनांशी जोडण्यासाठी विशेष समन्वय साधण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील आदिवासी महापुरुषांच्या स्मारकांची स्वच्छता करण्यात येणार असून सायंकाळी दीपोत्सवाचे आयोजन केले जाईल. आदिवासी देवी-देवतांचे पूजन, पारंपरिक श्रद्धा, रूढी आणि सांस्कृतिक परंपरांचे दर्शन घडविणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. या माध्यमातून आदिवासी समाजाच्या समृद्ध परंपरेचा आणि सांस्कृतिक वारशाचा गौरव करण्यात येईल.

भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त जिल्ह्यात विविध ठिकाणी मुख्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. आदिवासी समाजासाठी सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या समाजधुरीणांचा सन्मान करण्यात येईल. तसेच उद्याने, चौक आणि रस्त्यांना आदिवासी महापुरुषांची नावे देण्याच्या उपक्रमातून त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा गौरव करण्यात येणार आहे.

वनपट्टेधारकांना विविध शासकीय योजनांच्या लाभांचे वितरण करण्यात येणार आहे. आधारकार्ड अद्ययावती करणासाठी विशेष सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. कृषी विभागाच्या ऑनलाइन सेवा, शेतकरी नोंदणी, पीकविमा आणि अनुदान योजनांसाठी आवश्यक प्रक्रिया समजावून सांगण्यासाठी विशेष शिबिर आयोजित केले जाईल. त्याचबरोबर डिजिटल साधनांचा वापर करून शासकीय अर्ज भरणे आणि विविध ऑनलाइन सेवा मिळविण्याबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिके दाखविण्यात येणार आहेत.

आरोग्य विभागाच्या माध्यमातून आरोग्य तपासणी शिबिरे आणि विविध वैद्यकीय तपासण्या करण्यात येणार आहेत. माता-बाल आरोग्य, पोषण आणि प्रतिबंधात्मक आरोग्यविषयक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले जाईल. पौष्टिक तृणधान्ये, कडधान्ये आणि स्थानिक अन्नपिकांचे महत्त्व पटवून देण्यात येणार आहे.

द•ख•ल

सराफाच्या दुकानातून अडीच ग्रॅम वजनाचे सोन्याचे टॉप्स चोरीस; गुन्हा दाखल

अहिल्यानगर : अहिल्यानगरमधील कल्याण रोडवरील शिवाजीनगर येथे राहणारे आणि अमरधाम जवळ नेप्ती नाका येथे लोळगे ज्वेलर्स नावाचे सराफाचे दुकान चालविणारे फिर्यादी अमोल बाळासाहेब लोळगे यांचे दुकानातील लाकडी ट्रेमध्ये ठेवलेले २५ हजार रुपये किमतीचे अडीच ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातील दोन टॉप्स अज्ञात चोरट्याने ग्राहक बनून येऊन लबाडीच्या उद्देशाने स्वतःच्या आर्थिक फायद्याकरिता चोरून नेल्याची घटना घडली असून या प्रकरणी फिर्यादी अमोल बाळासाहेब लोळगे यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात समक्ष हजर राहून फिर्याद दाखल केली आहे दिनांक १० नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी दहा वाजता फिर्यादी व त्यांची पत्नी दुकानात नेहमीप्रमाणे कामावर आले होते त्यानंतर फिर्यादी दुकानातील कामानिमित्त शहरात गेले होते आणि संध्याकाळी सात वाजता दुकानात परत आल्यावर त्यांनी दुकानातील लाकडी ट्रेमध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने तपासले असता सोन्याचे कानातील दोन टॉप्स दिसून आले नाहीत त्यानंतर दुकानात व इतर ठिकाणी शोधाशोध करूनही ते दागिने कुठेही मिळून आले नाहीत आणि विचारपूस करूनही कोणतीही उपयुक्त माहिती मिळाली नाही ज्यामुळे दुकानात ग्राहक बनून आलेल्या अज्ञात चोरट्याने संधी साधून हे दागीने लांबवल्याची खात्री पटली असून या चोरी प्रकरणाचा पुढील तपास कोतवाली पोलीस करीत आहेत.

फटाके वाजवण्यास विरोध केल्यामुळे महिलासह कुटुंबीयांना मारहाण; तीन जणांविरुद्ध गुन्हा

अहिल्यानगर : अहिल्यानगर शहराच्या उपनगर असलेल्या भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रेणुकानगर आणि बाराबाभळी परिसरात घरासमोर फटाके वाजवण्यास विरोध केल्याच्या कारणावरून वाद निर्माण झाला असून या वादातून एका महिलेला लाथाबुक्क्यांनी मारहाण करत लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याची घटना घडली आहे या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात तीन जणांवविरुद्ध विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून घटनेची नोंद पोलीस दप्तरी करण्यात आली आहे फिर्यादी महिला ही आपल्या घरासमोर असताना आरोपींनी तिथे येऊन गोंधळ घातला होता आणि फटाके वाजवण्यास मना केल्याच्या कारणावरून त्यांच्यात वाद टोकाला गेला होता या वादादरम्यान आरोपी अक्षय किसन पोटे याने फिर्यादी महिलेची छाती दाबून तिच्या विनयभंगाचा प्रयत्न केला आणि लज्जा उत्पन्न होईल असे लाजिरवाणे वर्तन केले तसेच आरोपी किसन धनाजी पोटे याने हातातील लाकडी काठीने फिर्यादी महिलेस मारहाण करून दुखापत केली असून या मारहाणीत फिर्यादी महिलेला शारीरिक त्रास सहन करावा लागला आहे या संपूर्ण प्रकरणात सोबतच कमल किसन पोटे या आरोपीचा देखील सहभाग असल्यामुळे पोलिसांनी या तिन्ही आरोपींविरुद्ध कायदेशीर कारवाईचा बडगा उगारला आहे घटनेची माहिती मिळताच भिंगार कॅम्प पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आणि पीडित महिलेच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण केली आहे या गुन्ह्याचा पुढील तपास भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या वतीने सुरू करण्यात आला असून पोलीस उपनिरीक्षक सुहास आव्हाड हे या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत दिवाळीच्या दिवसात फटाके वाजवण्याच्या कारणावरून घडलेल्या या गंभीर प्रकारामुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे पोलिसांनी या प्रकरणी सर्व आरोपींवर कायदेशीर व कायदेसुधारित कलमांनुसार गुन्हे दाखल केल्याची माहिती दिली असून नागरिकांनी कायदा हातात घेऊ नये असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे

कंस्ट्रक्शन वादातून मारहाण

अहिल्यानगर : शहरातल्या तोफखाना पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या गणेश कॉलनी परिसरात एक धक्कादायक प्रकार समोर आला असून बांधकामाच्या कारणावरून झालेल्या वादातून एका इसमाला लाकडी दांडक्याने बेदम मारहाण करण्यात आली आहे या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अनिल रामशशी सिंग असे फिर्यादीचे नाव आहे फिर्यादी अनिल रामशशी सिंग हे त्यांच्या चंदा टेलरिंग दुकानाच्या माध्यमातून गणेश कॉलनी भारत बेकरी जवळ वास्तव्य करत असून ते आपले नियमित कामकाज पाहत होते यादरम्यान आरोपी राजेंद्र सुर्यनारायण आणि त्याचे दोन मुले यांच्यासोबत फिर्यादीचे बांधकाम करण्यावरून वाद झाला आरोपींनी फिर्यादीला तू येथे बांधकाम करू नकोस असे म्हणून विनाकारण अंगलट येऊन शिवीगाळ केली आणि दमदाटी करण्यास सुरुवात केली फिर्यादी अनिल रामशशी सिंग यांनी आरोपींना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असता राजेंद्र सुर्यनारायण याने संताप येऊन जवळच पडलेला लाकडी दांडका उचलला आणि फिर्यादीच्या पाठीवर तसेच हातावर जोरदार प्रहार करून त्यांना गंभीर जखमी केले तसेच तू येथे कसे बांधकाम करतो बघतोच अशी धमकी देऊन जीवे मारण्याची भाषा वापरली या हल्ल्यात फिर्यादी अनिल रामशशी सिंग हे स्वतः गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीने उपचारासाठी अहिल्यानगर येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे या घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस यंत्रणेने तात्काळ घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली असून या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

ट्रिगर-१ लागू, तरी कर्जतमध्ये रोजगाराचा ठोस आराखडा नाही!

७५ हजार मजुरांना रोजगार देण्याची मागणी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

राशीन : कर्जत तालुक्यात ट्रिगर-१ लागू होऊनही रोजगार हमी योजनेअंतर्गत नवीन कामांचा आराखडा मंजूर झालेला नसल्याने दुष्काळी परिस्थितीत मजुरांसमोर रोजगाराचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. हजारो मजुरांची जॉबकार्ड निष्क्रिय असून नवीन कामांना मंजुरी मिळत नसल्याने दिवाळीनंतर मजुरांवर उपासमारीची वेळ येण्याची भीती व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर स्वाभिमानी सकल मराठा बहुजन विचार मंचचे निमंत्रक तथा सेवानिवृत्त उपअभियंता इंजि. शिवश्री दिलीपराव कानगुडे यांनी विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे व आमदार रोहित पवार यांना सविस्तर निवेदन देत प्रशासनाला तातडीने सक्त सूचना देण्याची मागणी केली आहे. कानगुडे यांनी दिलेल्या निवेदनानुसार, दि. १ ऑक्टोबर रोजी कर्जत-जामखेड तालुक्यातील टंचाई परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक झाली होती. या बैठकीत मागेल त्याला काम मिळाले पाहिजे, रोजगार कमी पडू देऊ नये आणि नवीन आराखडा तातडीने मंजूर करावा, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र दोन महिने उलटूनही प्रत्यक्षात ठोस कार्यवाही



झालेली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. दुष्काळाच्या काळात मजुरांच्या हाताला काम मिळणे ही केवळ प्रशासकीय बाब नसून त्यांच्या कुटुंबाच्या जगण्याचा प्रश्न आहे. आराखडे, अंदाजपत्रके आणि प्रशासकीय मंजुरी वेळेत झाली नाही, तर हजारो मजुरांना रोजगारासाठी तालुका व जिल्ह्याबाहेर स्थलांतर करावे लागेल. त्यामुळे लोकप्रतिनिधींनी या प्रश्नात तातडीने लक्ष घालून प्रशासनाला कार्यवाहीचे आदेश द्यावेत. अशी मागणी इंजि. शिवश्री दिलीपराव कानगुडे यांनी केली आहे.

खेळाडू पुन्हा उतरले क्रिकेटच्या मैदानात

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



मिरजगाव : कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथे दिवाळी - पाडवा सणाच्या सुट्टीचे औचित्य साधून शहरातील माजी क्रिकेट खेळाडूंच्या वतीने 'ओल्ड इज गोल्ड' भव्य प्रीमियर लिग क्रिकेट स्पर्धा या कार्यक्रमाचे आयोजन करत आगळावेगळा उपक्रम राबविण्यात आला. ही स्पर्धा दिवंगत क्रिकेटपटूंच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी घेण्यात आली. गेली अनेक वर्षानंतर पुन्हा एकदा क्रिकेटच्या मैदानावर दिवसभर रंगलेल्या जुन्या संवगडीच्या या सामन्यात असा काहीसा थरार नुकताच येथील कृषी महाविद्यालयाच्या मैदानावर मंगळवारज्दि १० नोव्हेंबर रोजी दिवसभर पाहायला मिळाला. या क्रिकेट स्पर्धेत सहभागी संघापैकी ग्रेट फायटर या संघाने चमकदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले. तर ओल्ड इज गोल्ड डायमंड क्रिकेट क्लब संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. कधीकाळी एकत्र बसणारे आणि शहरात क्रिकेट गाजवणारे मिरजगावचे माजी क्रिकेट खेळाडू आज पस्तीशी किंवा चाळीशीच्या पार केलेले होते.. मात्र मैदानात पाऊल ठेवताच त्यांचा उत्साह एखाद्या विशीतील तरुणासारखा दिसत होता.

ही स्पर्धा केवळ क्रिकेटपुरती मर्यादित न राहता जुन्या मित्रांना पुन्हा एकत्र आणणारा, दिवंगत खेळाडुंच्या आठवणी जपणारा आणि नव्या पिढीसमोर मैत्री, एकजुट व खेळ भावनेचा आदर्श निर्माण करणारा उपक्रम ठरला..

अनेक वर्षानंतर हातात बॅट आणि बॉल आल्यामुळे सुरुवातीला काही खेळाडूंची तारांबळ उडाली. मात्र काही वेळातच मैदानावर चौकार आणि षटकारांची आतिषबाजी सुरू झाल्याचा तोच जुना अनुभव दिसून आला. शाळा आणि शाळेचे शालेय जीवन प्रत्येकाच्या आयुष्यातील सुवर्णकाळ असतो. शाळा सुटले की, मित्र वेगवेगळ्या वाटेने निघून जातात कोणी नोकरीत व्यग्र होते. तर कोणी व्यवसाय पण गेले.

अनेक वर्षानंतर जेव्हा हीच जुनी सवंगडी पुन्हा एकदा क्रिकेटच्या मैदानात पांढरा निळसर रंगीत पोशाख घालून उतरताच जुन्या कर्णधाराने पुन्हा एकदा संघाचे नेतृत्व केले. आणि आपल्या अचूक रणनितीने सर्वांना थक्क केले. गोलंदाजाने आपल्या फिरकीची जादू दाखवली. तर फलंदाजाने जुन्या शैलीत ड्राईव्ह आणि पुल शॉट मारले. तेव्हा तो क्षण केवळ एक खेळ राहत नाही, तर तो आठवणीचा एक उत्साह बनतो. असा काहीसा थरार नुकताच मिरजगाव शहरांमध्ये अनुभवायला मिळाला.

पाडव्याच्या स्नेहबंधातून जपली नात्यांची गोडी!

बहिणीच्या आठवणी जपत धोंडे यांचा दिवाळी पाडवा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

मिरजगाव : भाऊ आणि बहीण यांचे नाते जगातील सर्वात सुंदर पवित्र आणि अतूट नात्यांपैकी मानले जाते. या नात्यामध्ये प्रेम, राग, भांडण, काळजी आणि जिव्हाळा या सर्व गोष्टींचा गोड संगम असतो. याचा प्रत्यय आष्टीचे माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या माध्यमातून पहावयास मिळाला आहे.

राजकारणात अनेक नेते पाहायला मिळतात ; मात्र राजकारणापलीकडे जाऊन माणुसकीची नाती जपणारे आणि वर्षानुवर्षे जुन्या ऋणानुबंधांना तितक्याच आत्मीयतेने जपणारे नेतृत्व विरळच असते.

पद, प्रतिष्ठा आणि राजकीय जबाबदाऱ्या सांभाळताना कौटुंबिक नात्यांचा विसर न पडू देणारे आष्टी तालुक्याचे भाग्यविधाते माजी आमदार भीमरावजी धोंडे यांनी यंदाही दिवाळी पाडव्याच्या निमित्ताने रुई नालकोल येथील खिल्लारे कुटुंबाला भेट देत आपल्या जिव्हाळ्याच्या नात्याची परंपरा गेली ४० ते ४५ वर्षांपासून आजही कायम राखली आहे.



आष्टी तालुक्यातील रुई नालकोल या गावाशी भीमरावजी धोंडे यांचे अनेक वर्षांपासून अतिशय जिव्हाळ्याचे आणि कौटुंबिक ऋणानुबंध आहेत. त्यांची बहीण कै. द्वारकाबाई खिल्लारे यांच्या हस्ते औक्षण करून घेतल्याशिवाय मा.आ. धोंडे यांची दिवाळी पाडव्याची सुरुवात होत नसे. बहिणीच्या हातून होणारे औक्षण, तिचा आशीर्वाद आणि त्या क्षणातील प्रेमाचा आपुलकीचा ओलावा हा त्यांच्यासाठी केवळ धार्मिक विधी नव्हता, तर भावबहिणीच्या अतूट नात्याचा अनमोल ठेवा होता.

काळाच्या ओघात कै. द्वारकाबाई खिल्लारे यांचे निधन झाले. मात्र, बहिणीच्या आठवणी आजही भीमराव धोंडे यांच्या मनात तितक्याच जिवंत आहेत.

बहिणीच्या पश्चातही तिच्या कुटुंबाशी असलेले प्रेमाचे नाते त्यांनी कधीही कमी होऊ दिले नाही. दरवर्षी दिवाळी पाडव्याला रुई नालकोल येथे येऊन खिल्लारे कुटुंबीयांकडून औक्षण करून घेण्याची परंपरा त्यांनी आजही जपली आहे.

बहिणीच्या नंतर बहिणीच्या सुनेला बहिणीचे स्थान देऊन यंदाच्या दिवाळी पाडव्याला सौ. मंदाताई सुनील खिलारे यांच्या हस्ते धोंडे यांचे औक्षण करण्यात आले. बहिणीच्या पश्चात तिच्या सुनेला बहिणीचे स्थान देऊन तिच्या माहेरच्या नात्याचा सन्मान करण्याची भूमिका त्यांनी व्यक्त केली. रक्ताच्या नात्यापलीकडे जाऊन माणुसकीच्या नात्याला दिलेले हे स्थान उपस्थितांसाठी अत्यंत भावस्पर्शी ठरले असून कै. द्वारकाबाई खिल्लारे यांच्या पश्चात त्यांच्या कुटुंबात मोठा मुलगा सुनील खिल्लारे, दुसरा मुलगा मनोज खिल्लारे आणि मुलगी अनिता गांगर्डे असा परिवार आहे. या कुटुंबातील सुनील खिल्लारे, दिपाली खिल्लारे, अभिजीत डोळस, जयदीप सुनील खिल्लारे, नारायणी अभिजीत डोळस, अंजली सटाले, काव्या खिल्लारे आणि जयदत्त खिल्लारे यांच्यासह सर्व कुटुंबीय या जिव्हाळ्याच्या परंपरेचे साक्षीदार आहेत.

या कौटुंबिक आणि भावनिक भेटीप्रसंगी संजय काका नालकोल, माजी सरपंच छगन खोडके, संतोष नालकोल, आजिनाथ नालकोल, शरद नालकोल, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती नामदेव धोंडे, दत्तोबा मांढरे, मुरलीधर गांजुरे, प्रकाश नालकोल सर, बाळासाहेब यांच्यासह इतर मान्यवर, पाहुणे मंडळी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

अध्यक्षपदी सुजय विखे करंजीत जल्लोष

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



करंजी : जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदी माजी खासदार डॉक्टर सुजय विखे पाटील यांची बिनविरोध निवड झाल्याने करंजी,मिरी, तिसगाव परिसरात भाजपच्या कार्यकर्त्यांनीगुलाल उधळत डीजे च्या तालावर नाचत एकच जल्लोष करत आनंद साजरा केला.

जिल्हा बँकेची संचालक पदाची निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी डॉ. सुजय विखे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे व सर्वच राजकीय नेत्यांनी प्रयत्न केले पण गटातटाचे राजकारणामुळे यश आले नाही. आणि निवडणूक झाली त्यानंतरही थोरात गटाच्या जास्त जागा आल्याने जिल्हा बँकेचे अध्यक्षपदी कोण विराजमान होणार यासाठी सर्वसामान्य जनतेला उत्सुकता होती. सुजय विखे सुरुवातीला अध्यक्ष पद घेणार असं मानलं जात होतं मात्र त्यानंतर यांनी फडणवीसच ठरवतील असं म्हटल्याने अनेकांच्या मनात शंका निर्माण झाल्या.असे असतानाच आज अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाच्या निवडी जाहीर झाल्या अध्यक्षपदी माजी खासदार डॉक्टर सुजय विखे पाटील यांची तर उपअध्यक्षपदी रंजीत देशमुख यांची बिनविरोध निवड झाली विखेंनी पुन्हा आपलं कर्तृत्व सिद्ध केलं आणि निश्चितच जिल्ह्यात विखे शिवाय पर्याय नाही इथेच जिल्ह्याची आपल्या तालुक्याची प्रगती करू शकतात आणि म्हणून विखेंचेच हात बळकट करणे गरजेचे आहे जनतेच्या भल्याचा असल्याचे प्रतिपादन भाजपचे तालुका सरचिटणीस सुनील साखरे यांनी यावेळी बोलताना आपल्या भावना व्यक्त केल्या विखेंच्या निवडीने करंजीत डीजे वाजून गुलाल उधळून फटाक्यांची आदर्श बाजी करत विजयाचा आनंद उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी बाळासाहेब अकोलकर, मिर्झा मण्यार, सुनील साखरे,आबासाहेब अकोलकर , राहुल अकोलकर, नवनाथ आरोळे,यांसह भाजपचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खा. लंके यांच्या संघर्षाला लिमिट नाही : माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

निघोज : नगर दक्षिणचे खासदार निलेश लंके यांच्या संघर्षाला कोणते ही लिमिट नाही. संपूर्ण नगर दक्षिणमधील सहा विधानसभा मतदारसंघांत ते सातत्याने फिरतात. प्रत्येकाच्या सुख-दुःखात सहभागी होणे शक्य नसतानाही ते जनतेच्या प्रश्नांसाठी अहोरात्र धडपडत असतात. एवढा संघर्ष करण्याची आणि तरीही न थकता काम करण्याची ऊर्जा त्यांना कुठून मिळते, असा प्रश्न पडतो. मात्र, ही ऊर्जा त्यांना जनतेच्या प्रेमातून मिळते, असे गौरवोद्गार माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी काढले.

पारनेर तालुक्यातील हंगा येथे खासदार निलेश लंके यांनी आयोजित केलेल्या दिवाळी फराळ व स्नेहमेळावा कार्यक्रमात थोरात बोलत होते. यावेळी खासदार निलेश लंके यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बाबासाहेब भोस, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सीताराम काकडे, राष्ट्रवादीचे नेते दीपक अण्णा लंके, ज्येष्ठ नेते मधुकर राळेभात, सूर्यकांत मोरे, राष्ट्रवादीचे नेते रवींद्र राजदेव, मारुती रेपाळे, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष अर्जुन भालेकर, जिल्हा प्रवक्ते मोहनराव रोकडे, रामेश्वर निमसे, ॲड. राहुल झावरे, कारभारी पोटघन, दादा शिंदे, शिक्षक नेते संतोष खामकर, ज्येष्ठ



शिक्षक नेते द. मा. ठुबे गुरुजी, दत्तात्रय वारे, अभयसिंह नांगरे, बापू चत्तर, ज्ञानदेव लंके गुरुजी , मळगंगा देवी यात्रा समीतीचे अध्यक्ष शिवाजी लंके, भास्कर कवाद, दिलीप ढवण

आदी उपस्थित होते. तसेच निलेश लंके प्रतिष्ठानचे पदाधिकारी, आपला मावळा संघटनेचे पदाधिकारी आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी मंत्री बाळासाहेब थोरात पुढे म्हणाले की, निलेश लंके हे जनमानसातून आणि मातीमधून उभे राहिलेले कसदार व्यक्तिमत्त्व आहे. अशा व्यक्तिमत्त्वाची जडणघडण सहज होत नाही. अनेक कसोट्यांमधून, संघर्षातून आणि अडचणींना सामोरे जात ते पुढे आले आहेत. त्यांच्या निवडणुकीच्या काळात त्यांना किती त्रास सहन करावा लागला, याच्या अनेक कथा ऐकायला मिळतात. आमच्या भागात एखाद्या टक्क्यानेही एवढा संघर्ष पाहायला मिळत नाही. त्यांच्या निवडणुकीच्या संघर्षावर स्वतंत्र पुस्तक तयार होऊ शकते आणि त्यातून अनेक शिष्य तयार होतील, असे मिश्कीलपणे सांगत त्यांनी लंके यांच्या संघर्षाचे कौतुक केले. पुढे बोलताना ते म्हणाले की, लोकांसाठी काम करताना खूप मेहनत आणि कष्ट घ्यावे लागतात. जनतेचे सर्वच प्रश्न एका वेळी सुटतात असे नाही. मात्र, लोकांच्या अडचणी समजून घेऊन त्यांच्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे. निलेश लंके यांच्याकडे जनतेला सुखा दुःखात पाठबळ आणि काम करण्याची प्रचंड ऊर्जा आहे.

दखल

शिरूर पोलिसांची अंमली पदार्थ तस्करीविरोधात मोठी कारवाई!

कवठे येमाई : शिरूर शहरात अंमली पदार्थांची अवैध विक्री व तस्करी करणाऱ्यांविरोधात शिरूर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. मार्केट यार्डच्या मागील बाजूस असलेल्या साईनगर परिसरात छापा टाकून गांजा विक्रीप्रकरणी दोन तरुणांना अटक करण्यात आली आहे. तर या प्रकरणातील मुख्य आरोपी आशुतोष मिलिंद काळे हा फरार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

दि. ५ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री पावणे कराच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. यामध्ये उत्कर्ष जालिंदर ढेरे (वय २१, रा. बाभुळसर खुर्द, ता. शिरूर) आणि साई संतोष ससाणे (वय २०, रा. हुडको कॉलनी, शिरूर) या दोघांना पोलिसांनी अटक केली. पोलिसांनी केलेल्या तपासात मुख्य आरोपी आशुतोष काळे याने स्वतःच्या राहत्या घरात गांजा साठवून ठेवला होता. त्यापैकी काही गांजा विक्रीसाठी उत्कर्ष ढेरे व साई ससाणे यांच्याकडे दिल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी घराची व संबंधित ठिकाणांची तपासणी करून मोठ्या प्रमाणात गांजा आणि इतर साहित्य जप्त केले.या कारवाईत आशुतोष काळे याच्या घरातून १ किलो ८०९ ग्रॅम, उत्कर्ष ढेरे याच्याकडून १२२ ग्रॅम, साई ससाणे याच्याकडून ८० ग्रॅम, तर ॲक्टिव्हा मोटारसायकलच्या डिक्कीतून ४०३ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. याशिवाय दोन आयफोन, एक वनप्लस मोबाईल, गांजा पॅकिंगसाठी वापरण्यात येणाऱ्या ९९ रिकाम्या प्लास्टिक पिशव्या आणि वजनकाटा हस्तगत करण्यात आला.

ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग बांधवांसोबत साजरी झाली माणुसकीची दिवाळी



आळेफाटा : आम्ही जुन्नरकर रहिवासी संघ, पुणे व पिंपरी-चिंचवड यांच्या वतीने ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग बांधवांसोबत 'दिवाळी स्नेह उपक्रम' उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमांतर्गत राजाराम पाटील वृद्धाश्रम, बल्लाळवाडी येथे २ पेशंट कॉट, २ इन्व्हर्टर बॅटरी, १ ऑफिस टेबल, १ कराओके स्पीकर व किराणा साहित्य भेट देण्यात आले. तर दिव्यांग कला विकास केंद्र संचालित नंदनवन संस्था, जुन्नर येथे दिव्यांग बांधवांसाठी विशेष 'दिवाळी किराणा बाजार' आयोजित करून किराणा साहित्य व दिवाळी भेटवस्तू देण्यात आल्या.यावेळी ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग बांधवांशी स्नेहसंवाद साधून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्याचा प्रयत्न करण्यात आला. फटाक्यांच्या आतषबाजीपेक्षा माणुसकीची उजळणीच खरी दिवाळी असल्याची भावना यावेळी सर्वांनी व्यक्त केली.

समाजकारणाचा आदर्श जपत प्रतिष्ठानची वाटचाल – विजय कोलते



सासवड : राजकीय कार्यकर्त्यांनी राजकारणापेक्षा समाजकारण अधिक करावे ही शिकवण महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांनी दिली तोच आदर्श घेऊन भारताचे माजी केंद्रीय कृषिमंत्री शरदराव पवार यांचे मार्गदर्शनाखाली आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान कार्यरत आहे. म्हणून कायमस्वरूपी आर्थिक सुबत्ता देणारे शरद – विजय व्यापारी संकुल तयार झाले. असे विचार आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय कोलते यांनी व्यक्त केले.

सासवड येथील व्यापारी संकुल व शरद विजय असे नामकरण समारंभ प्रतिष्ठानचे खजिनदार सीए. सत्येन नवलाखा यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी उद्योगपती विश्वस्त भाऊसाहेब शिंगाडे, सासवडचे माजी नगराध्यक्ष हेमंत भोंगळे , माजी अधीक्षक अभियंता रमेश आगवणे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री कोलते बोलत होते. सासवड पिसर्वे रस्त्यावर बांधलेल्या या व्यापारी संकुलात ३० गाळे आहेत. यासाठी सुमारे चार कोटी रुपये खर्च झाला आहे.

कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांचा घोरपडवाडी येथे शेतकऱ्याच्या घरी दिवाळी फराळ

दुष्काळाच्या संकटात शासन खंबीरपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे – कृषिमंत्री

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज इंदापूर तालुक्यातील घोरपडवाडी येथे शेतकरी हणमंत बापुराव लावंड यांच्या घरी भेट देऊन शेतकऱ्यांसमवेत दिवाळीचा फराळ केला. दुष्काळाच्या संकटात राज्यशासन खंबीरपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे असून शेतकऱ्यांनी धीर सोडू नये. भविष्यामध्ये पिण्याचे पाणी, शेतीचे पाणी असो किंवा जनावरांचा चाऱ्याचा विषय असो या सर्व बाबींमध्ये लगेच करावयाच्या उपाययोजना तसेच दीर्घकालीन उपाययोजना निश्चितपणे हाती घेण्यात येतील, अशी ग्वाही यावेळी श्री. भरणे यांनी शेतकऱ्यांना दिली.

कृषिमंत्र्यांनी गाडीतून उतरताच शेतकरी श्री. लावंड यांच्या घरासमोरील गाईच्या गोठ्याकडे गेले. त्यांनी लावंड बंधूंकडून जनावरांची माहिती घेतली, तसेच चाऱ्याची व्यवस्था कशी केली हे विचारले असता घरचे थोडे असलेले संपूर्ण उसाचे पिक ठेवले असून आणि मका विकत घेतली जाते असे सांगितले. यावेळी श्री. भरणे यांनी शेळ्यांच्या गोठ्याची तसेच कोंबड्यांचीही पाहणी केली. त्यानंतर शेतकऱ्यांच्या घरातील सुवासिनींनी श्री. भरणे यांचे औक्षण केले.

यावेळी त्यांनी घरातील तसेच उपस्थित शेतकऱ्यांशी संवाद साधून आस्थेने विचारपूस केली. त्यानंतर सर्वांसोबत दिवाळी फराळ आणि पोहे घेतले.



मी देखील शेतकऱ्याचा मुलगा :

श्री भरणे म्हणाले, मी राज्याचा कृषिमंत्री असलो तरी तुम्हा शेतकऱ्यांचा प्रतिनिधी आहे. मी सुद्धा एक शेतकऱ्याचा मुलगा असल्याने तुमचे दुःख, या भागातले प्रश्न, अडचणी माहिती आहेत. ते पुढे म्हणाले, येणारे वर्ष सर्वांसाठी थोडे संकटाचे, अडचणीचे आहे. मात्र जून महिन्यापर्यंत पुरेल असे पिण्याचे पाण्याचे नियोजन करण्यात येत आहे. जिथे पिण्याच्या पाण्याची अडचण आहे तिथे अर्ज केल्यावर लगेच टँकर देण्याची व्यवस्था करू. जिथे पाण्याचे स्रोत आहेत तिथे चारा पिके घेण्याचे नियोजन करण्यात येत आहे. त्यासाठी राज्य शासनाकडून चारा पिकाचे बियाणे देण्यात येत आहे. जनावरांच्या छावणीच्या बाबतीतही पुढच्या एक-दोन महिन्यात विचार करण्यात येईल.

पाच हजारांचे अनुदान हे अग्रीम; पुढील काळात जास्तीत जास्त मदत करू :

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वात राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. याप्रसंगी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांचीही आठवण आपल्या सर्वांना येत असल्याचेही ते म्हणाले. ते पुढे म्हणाले. राज्य शासनाच्यावतीने दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या खात्यावर ५ हजार रुपये दिवाळीसाठी अग्रीम जमा करण्यात आले आहेत. परंतु, एनडीआरएफच्या निकषाप्रमाणे तसेच एसडीआरएफच्या माध्यमातून, शासनाच्यावतीने जास्तीत जास्त मदत करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

जमिनीतील पाण्याची पातळी वाढवण्यासाठी संधी :

दुष्काळाचे संकट निश्चितच मोठे आहे, मात्र, भविष्यातील जमिनीतील पाण्याची पातळी वाढवण्यासाठी ही एक संधी म्हणून आपल्याला पाहावे लागेल. त्या दृष्टीने कृषी विभागाच्या माध्यमातून, जलसंधारण विभागाच्या माध्यमातून तलावातील गाळ काढणे, छोटे छोटे बंधारे करणे, सांडव्याची दुरुस्ती आदी कामे हाती घेण्यात येतील. रोजगार हमी योजनेतून या कामांसह पाणंद रस्त्यांची कामे हाती घेण्यात येतील, जेणेकरून शेतमजुरांनाही रोजगार मिळेल. या संकटातून शेततळे असो ठिबक सिंचन असो अशा नवीन गोष्टी शिकण्याचाही प्रयत्न करा, असा सल्लाही त्यांनी यावेळी शेतकऱ्यांना दिला.यावेळी कृषी विभागासह अन्य विभागाचे अधिकारी, तालुक्यातील लोकप्रतिनिधी, शेतकरी उपस्थित होते.

जिल्ह्यातील धरणांतून ३२.५१ टीएमसी पाण्याचा वापर

पावसाअभावी पाण्याची मागणी वाढली; २६ धरणांत सध्या १६२.७१ टीएमसी साठा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : यंदा पावसाने ओढ दिल्याने पुणे जिल्ह्यातील धरणांमधील पाण्याची मागणी वाढली आहे. गेल्या दोन ते तीन महिन्यांत जिल्ह्यातील धरणांतून तब्बल ३२.५१ टीएम सी पाण्याचा वापर झाला आहे. त्यामुळे पावसाळ्यात ९८ टक्क्यांवर पोहोचलेला पाणीसाठा आता ८२ टक्क्यांवर आला आहे. जिल्ह्यातील २६ धरणांमध्ये सध्या एकूण १६२.७१ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध आहे. खरीप हंगामात पावसाने ओढ दिल्याने शेतीसाठी पाण्याची मागणी वाढली असून, आगामी काळातही पाण्याचा वापर वाढण्याची शक्यता आहे.

चालू वर्षी जून महिन्यात पावसाने दडी मारली होती. त्यानंतर जुलैमध्ये झालेल्या दमदार पावसामुळे धरणांच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक झाली. परिणामी, जिल्ह्यातील धरणांमधील पाणीसाठा १९५.२२ टीएमसीवर म्हणजेच ९८ टक्क्यांपर्यंत पोहोचला होता. मात्र, ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये पावसाने अपेक्षित हजेरी लावली नाही. त्यामुळे खरीप हंगामातील पिकांना पाण्याची गरज भासू लागली. पावसाअभावी पिके अडचणीत आल्याने शेतकऱ्यांकडून सिंचनासाठी धरणांतील पाण्याची मागणी वाढली. त्यानुसार विविध धरणांतून सिंचनासाठी आवर्तने सोडण्यात आली. याशिवाय पिण्याच्या पाण्यासाठीही साठ्याचा वापर झाल्याने गेल्या काही महिन्यांत पाणीसाठ्यात मोठी घट झाली आहे. जिल्ह्यातील २६ धरणांची एकूण पाणीसाठवण क्षमता १९८.३४ टीएमसी आहे. सध्या त्यापैकी १६२.७१ टीएमसी पाणीसाठा शिल्लक आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत धरणांमध्ये १९५.३९ टीएमसी म्हणजेच ९८ टक्के पाणीसाठा होता. त्या तुलनेत यंदा सुमारे ३२.६८ टीएमसीने कमी पाणीसाठा उपलब्ध आहे. त्यामुळे आगामी रब्बी हंगामासह उन्हाळ्यातील पाणी नियोजनाचे आव्हान निर्माण होण्याची शक्यता आहे.

सध्या मुठा खोऱ्यातील टेमघर, वरसगाव, पानशेत आणि खडकवासला या चार धरणांमध्ये मिळून २३.५१ टीएमसी म्हणजेच ८० टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. नीरा खोऱ्यातील पवना, कासारसाई, कळमोडी, चासकमान, भामा आसखेड, आंध्रा, वडीवळे, शेटफळ, नाझरे, गुंजवणी, भाटघर, नीरा देवघर आणि वीर या धरणांमध्ये एकूण ४२.४९ टीएमसी म्हणजेच ८७ टक्के पाणीसाठा आहे.

कुकडी खोऱ्यातील पिंपळगाव जोगे, माणिकडोह, येडगाव, वडज, डिंभे आणि चिल्हेवाडी तसेच घोड धरणात मिळून ३२.८९ टीएमसी म्हणजेच ९३ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. तर उजनी धरणात ३६.०७ टीएमसी म्हणजेच ६७ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. विविध खोऱ्यांतील पाणीसाठ्याची स्थिती समाधानकारक दिसत असली, तरी गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा साठ्यात मोठी घट झाली आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर आणि सिंचनाच्या आवर्तनांचे योग्य नियोजन महत्त्वाचे ठरणार आहे.

धरणनिहाय असलेला पाणीसाठा, टीएमसीमध्ये :

टेमघर ३.१४, वरसगाव १०.९८, पानशेत ८.२७, खडकवासला १.१२, पवना ७.६९, कासारसाई ०.४८, कळमोडी १.५०, चासकमान ६.५७, भामा आसखेड ६.६१, आंध्रा २.६१, वडीवळे १.०४, शेटफळ ०.२०, नाझरे ०.४७, गुंजवणी ३.५५, भाटघर २३.४०, निरा देवघर ११.६३, वीर ३.८९, पिंपळगाव जोगे ३.३९, माणिकडोह ९.१४, येडगाव १.८६, वडज १.०८, डिंभे १२.२५, चिल्हेवाडी ०.७६, घोड ४.४०, विसापूर ०.५८, उजनी ३६.०७, मुळशी १४.७२

जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविण्यात येते की मौजे (वाघोली) आव्हाळवाडी, ता. हवेली, जि. पुणे, पुणे महानगरपालिका हद्दीतील गट नं. २०१, एकूण क्षेत्र १ हे. ३२ आर पैकी २००० चौ. फूट (१८५.८७ चौ. मी.) क्षेत्रफळाचा खाजगी प्लॉट नं. २० व त्यावरील बांधकाम, मिळकत नं. १३६७, याचे मूळ मालक कै. किशोर परशुराम पाटील, कै. सुमन किशोर पाटील व श्री. विनोद किशोर पाटील हे आहेत. कै. किशोर परशुराम पाटील यांचे दिनांक ०७/०६/२०२१ रोजी व कै. सुमन किशोर पाटील यांचे दिनांक २१/०५/२०२१ रोजी निधन झाले असून, त्यांच्या पश्चात श्री. विनोद किशोर पाटील हे एकमेव कायदेशीर वारस आहेत. सदर मिळकतीबाबत श्री. विजय विठ्ठलराव जाधव व सौ. संगीता विजय जाधव यांनी कै. किशोर परशुराम पाटील यांच्या नावे दिनांक १९/१२/२००८ रोजी निष्पादित केलेले मूळ विकास करारपत्र व कुलमुखत्यारपत्र, दुय्यम निबंधक हवेली क्र. ७ येथे अनुक्रमांक ८३२५ व ८३२६ अन्वये नोंदणीकृत असून, सदर मूळ कागदपत्रे, इंडेक्स-II व RR हरविले/गहाळ झाले आहेत. श्री. विनोद किशोर पाटील यांनी सदर मिळकतीवर गृहकर्जासाठी वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्याकडे अर्ज केला आहे. तरी, सदर मिळकतीबाबत कोणाचाही व वारसाहक्काबाबत हक्क, अधिकार, हितसंबंध, हरकत अथवा मूळ कागदपत्रांबाबत काही माहिती असल्यास, आवश्यक पुराव्यांसह ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर लेखी कळवावे. अन्यथा, कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे पुढील व्यवहार करण्यात येईल.

Adv. Vanashree G Kshirsagar
VASTU HOUSING FINANCE CORP LTD,
OFFICE NO. 603 C AND 604 D, BUILDING VANTAGE 21,
SR.NO. 133, PIMPLE SAUDAGAR, PUNE-411027
Mob. 9823598801, Email - vanashree.kshirsagar@vastuhfc.com

पुणे
दिनांक: 13/11/2026

ग्रामपंचायत राजापूर ता.भोर जि.पुणे
बी १ निविदा सूचना १/२०२६-२७

प्रशासक ग्रामपंचायत राजापूर ता. भोर जि. पुणे येथे मौजे राजापूर येथे खालील कामासाठी बी-१ पद्धतीने जि. प सार्वजनिक बांधकाम यांचे कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदर यांच्याकडून निविदा बी-१ दोन लिफाफा पद्धतीने सिलबंद लिफाफा मध्ये निविदा मागविण्यात येत आहे. दि. १३/११/२०२६ सकाळी १०.०० ते २०/११/२०२६ दु ५.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात बंद लिफाफा मध्ये कार्यालयीन वेळेत सादर करण्यात याव्यात सदर निविदा दि २३/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा ग्रामपंचायत कार्यालयामध्ये उघडण्यात येतील.

अ.क्र	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम जीएसटी सह	अंदाजपत्रकीय रक्कम जीएसटी सोडन	इसारा रक्कम	कोरे निविदा रक्कम	कामाचा कालावधी	ठेकेदार वर्ग
१	मौजे राजापूर येथील गुडगुडे वस्ती अंतर्गत रस्ता करणे	५९९९८५/-	५०६५६९/-	५०६६/-	५९०/-	३ महिने	सु.बे.अ

निविदा अटी व शर्ती –
१) कोणत्याही निविदा स्वीकारण्याचा अथवा निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतिकडे राखून ठेवला आहे २) कोऱ्या निविदा नमुन्याची फी (टेंडर फी) रक्कम ग्रामपंचायत राजापूर या नावाने चेक कॅश ऑनलाईन भरून निविदा उपलब्ध होतील ३) निविदा मधील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे तांत्रिक लिफाफा मध्ये सादर करण्यात यावेत ३) इसारा रक्कम ग्रामपंचायत राजापूर या नावाने चेक कॅश ऑनलाईन डीडी लिफाफा न १ मध्ये जोडणे आवश्यक आहे त्याशिवाय लिफाफा क्र २ उघडला जाणार नाही.

ग्रामपंचायत अधिकारी **प्रशासक**
ग्रामपंचायत राजापूर

ग्रामपंचायत भोलावडे ता.भोर जि.पुणे
बी १ निविदा सूचना १/२०२६-२७

प्रशासक ग्रामपंचायत भोलावडे ता. भोर जि. पुणे येथे मौजे भोलावडे येथे खालील कामासाठी बी-१ पद्धतीने जि. प सार्वजनिक बांधकाम यांचे कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदर यांच्याकडून निविदा बी-१ दोन लिफाफा पद्धतीने सिलबंद लिफाफा मध्ये निविदा मागविण्यात येत आहे. दि. १३/११/२०२६ सकाळी १०.०० ते २०/११/२०२६ दु ५.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात बंद लिफाफा मध्ये कार्यालयीन वेळेत सादर करण्यात याव्यात सदर निविदा दि २३/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा ग्रामपंचायत कार्यालयामध्ये उघडण्यात येतील.

अ.क्र	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम जीएसटी सह	अंदाजपत्रकीय रक्कम जीएसटी सोडन	इसारा रक्कम	कोरे निविदा रक्कम	कामाचा कालावधी	ठेकदार वर्ग
१	मौजे भोलावडे येथील ग्रामपंचायत(स्लायडिंग) ऑफिस सुधरणा करणे	३९९९९९/-	३३७५५२/-	३३७६/-	२३६/-	३ महिने	सु.बे.अ

निविदा अटी व शर्ती –
१) कोणत्याही निविदा स्वीकारण्याचा अथवा निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतिकडे राखून ठेवला आहे २) कोऱ्या निविदा नमुन्याची फी (टेंडर फी) रक्कम ग्रामपंचायत भोलावडे या नावाने चेक कॅश ऑनलाईन भरून निविदा उपलब्ध होतील ३) निविदा मधील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे तांत्रिक लिफाफा मध्ये सादर करण्यात यावेत ३) इसारा रक्कम ग्रामपंचायत भोलावडे या नावाने चेक कॅश ऑनलाईन डीडी लिफाफा न १ मध्ये जोडणे आवश्यक आहे त्याशिवाय लिफाफा क्र २ उघडला जाणार नाही.

ग्रामपंचायत अधिकारी **उपसरपंच**
ग्रामपंचायत भोलावडे

चारा टंचाई रोखण्यासाठी कृषी विभागाचे नियोजन

कमी पाण्यातील बहुकापणी चारा पिकांना प्रोत्साहन; बियाणे उपलब्धतेपासून चारा लागवडीपर्यंत उपाययोजना

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : यंदा पावसातील तूट, असमान वितरण आणि खरीप पिकांच्या उत्पादनातील घट यामुळे राज्यात चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच रब्बी हंगामातील संभाव्य कमी पेरणी क्षेत्राचा विचार करून चारा उपलब्धता वाढविण्यासाठी कृषी विभागाने नियोजन केले आहे. त्यासाठी कमी पाण्यात येणाऱ्या आणि बहुकापणी चारा पिकांच्या लागवडीला प्रोत्साहन देण्यासह चारा बियाण्यांची उपलब्धता, शासकीय जमिनीवर चारा लागवड आणि शेतकरी प्रशिक्षणावर भर देण्यात येणार आहे. चारा टंचाईवर उपाययोजना सुचविण्यासाठी गठित अभ्यासगटाच्या अहवालानुसार कृषी विभागाने दोन नोव्हेंबर रोजी शासन परिपत्रकाद्वारे मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. त्यानुसार कृषी विभागाची क्षेत्रीय यंत्रणा, कृषी विद्यापीठे, तालुका बीज गुणन केंद्रे आणि संबंधित संस्थांनी पशुसंवर्धन विभागाच्या समन्वयाने उपाययोजनांची अंमलबजावणी करावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.रब्बी हंगाम २०२६ मध्ये चारा पिकांसाठी आवश्यक असलेल्या बियाण्यांची जिल्हानिहाय आणि पिकनिहाय मागणी निश्चित करण्यात येणार आहे. कृषी आयुक्तालय पशुसंवर्धन विभागाच्या समन्वयाने हे नियोजन करणार आहे. महाबीज, राष्ट्रीय बियाणे महामंडळ, कृषी विद्यापीठे, कृषी विज्ञान केंद्रे आणि अन्य संबंधित संस्थांच्या माध्यमातून आवश्यक बियाणे उपलब्ध करून देण्याची कार्यवाही केली जाणार आहे. स्थानिक हवामान आणि उपलब्ध पाण्याचा विचार करून मका, ज्वारी, बाजरी, न्यूट्रीफीड आणि शुगरग्रेझ यांसारख्या चारा पिकांच्या लागवडीसाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. सिंचनाची सुविधा असलेल्या क्षेत्रांत रब्बीमध्ये चारा लागवड वाढविण्यावर भर राहणार आहे. त्यासाठी बियाणे, खतांचा संतुलित वापर, पाणी व्यवस्थापन, पेरणीची योग्य वेळ, कापणी आणि पुनर्वाढीचे नियोजन याबाबत तांत्रिक मार्गदर्शन केले

दुष्काळात पाच हजारांची अग्रीम मदत शेतकऱ्यांसाठी ठरली दिलासादायक

दिवाळीपूर्वी खात्यात रक्कम जमा झाल्याने आर्थिक अडचणीच्या काळात मिळाला आधार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : यंदा एल निनोच्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने राज्यातील अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली. पुणे जिल्ह्यातील दहा तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला. कमी पावसामुळे खरीप हंगामातील पिकांचे नुकसान होऊन शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला.

या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने पिकांच्या पंचनाम्यांच्या आधारे पात्र शेतकऱ्यांना पाच हजार रुपये अग्रीम मदत देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार दिवाळीपूर्वीच शेतकऱ्यांच्या बँक खात्यांत मदतीची रक्कम जमा करण्यात आली. ऐन सणासुदीच्या काळात मिळालेल्या या आर्थिक आधारामुळे शेतकऱ्यांना दैनंदिन गरजा भागविण्यासाठी तसेच शेतीशी संबंधित खर्चासाठी काही प्रमाणात हातभार मिळाला आहे. बारामती तालुक्यातील उंबरवाडी मोडवे येथील शेतकरी नवनाथ नानासाहेब बालगुडे यांनी दुष्काळी पंचनाम्यानंतर पाच हजार रुपयांची अग्रीम मदत मिळाल्याचे सांगितले. तसेच सदोबाची वाडी येथील शेतकरी सुरेश दत्तात्रय सूर्यवंशी यांनी कमी पावसामुळे सोयाबीनचे पीक हातातून गेल्याचे नमूद केले. पिकांचे पंचनामे पूर्ण झाल्यानंतर खात्यात पाच हजार रुपयांची मदत जमा झाल्याने आर्थिक अडचणीच्या काळात काही प्रमाणात आधार मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.आंबेगाव तालुक्यातील एकलहरे येथील शेतकरी किसन राखमाजी लोंढे यांनाही दिवाळीपूर्वी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत मिळाली. कमी पावसामुळे निर्माण झालेल्या प्रतिकूल परिस्थितीत ही मदत वेळेत मिळाल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले. दौंड तालुक्यातील बोरी पारधी येथील शेतकरी संतोष अरुण ताडगे यांनी यंदा बाजरीची पेरणी केली होती. मात्र, पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने पिकाचे नुकसान झाले.

ग्रामपंचायत नसरापूर तालुका भोर जिल्हा पुणे
बी १ जाहिर निविदा नोटीस नंबर ०१ सन २०२६-२०२७

ग्रामपंचायत नसरापूर तालुका भोर जिल्हा पुणे हे खालील कामासाठी सीलबंद निविदा जिल्हा परिषदेकडील योग्य त्या नोंदणीकृत ठेकेदारकडून निविदा मागवित आहे मोहरबंद अर्ज दिनांक १३-११-२०२६ सकाळी १०:०० ते २०-११-२०२६ सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालय नसरापूर येथे स्वीकारली जातील. सदरच्या निविदा दिनांकः २३-११-२०२६ रोजी सकाळी ११.०० वा ग्रामपंचायत कार्यालय नसरापूर ता. भोर या ठिकाणी उघडण्यात येतील.

अ. क्र.	कामाचे स्वरूप	कामाची अंदाजपत्रकिय रक्कम	निविदा शुल्क	अनामत रक्कम	काम पूर्ण करण्याचा कालाधवी
१	मौजे नसरापूर येथील एनएच-०४ ते ओम कॉलनी अंतर्गत रस्ता करणे.	९२९७०२/-	५९०/-	९२९७/-	६ महिने
२	मौजे नसरापूर येथील इंदिरा सोसायटी अंतर्गत रस्ता व गटर करणे.	९२८६९०/-	५९०/-	९२८७/-	६ महिने

अटी व शर्ती:
१) कोणतेही निविदा अर्ज स्वीकारण्याचा अथवा सर्व निविदा फेटाळणेचा अधिकार ग्रा.प ने राखून ठेवला आहे.
२) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध होतील.
३) ठेकेदाराने कोरी निविदा मागणी अर्जासोबत प्रमाणित नोंदणी प्रमाणपत्र, G.S.T प्रमाणपत्र, PAN कार्ड अनुभव प्रमाणपत्र व पूर्ण भरलेली निविदा जोडणे आवश्यक आहे.
४) इसारा रक्कम कोणत्याही बँकेवरील धनादेश डी. डी ग्रामपंचायत नसरापूर या नावाने काढून तो लिफाफा क्र १ मध्ये जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय लिफाफा क्रमांक ०२ उघडण्यात येणार नाही.
५) सदरचे कामे हे मा. उपअभियंता, शाखा अभियंता जि.प बांधकाम उपविभाग भोर व प्रशासक / ग्रामपंचायत अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणे आवश्यक आहे.
६) काम पूर्ण झाल्यानंतरच कामाचे देयक अदा करण्यात येईल.

सही/- ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत नसरापूर, ता. भोर, जि. पुणे

सही/- प्रशासक
ग्रामपंचायत नसरापूर, ता. भोर, जि. पुणे

ग्रामपंचायत वराळे, ता. खेड, जि. पुणे
बी-१ खुली निविदा सूचना क्र.१ सन २०२६-२७

ग्रामपंचायत वराळे, ता. खेड, जि.पुणे यांचेतर्फे महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग व जि.प. पुणे यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदार यांचेकडून दोन लिफाफा पध्दतीने खालील कामंच्या मोहरबंद निविदा २ पाकिटे पध्दतीने मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदा नमुना ग्रा.पं. कार्यालय, वराळे, ता. खेड, जि.पुणे यांच्याकडून दि. १३/११/२०२६ ते दि. १९/११/२०२६ रोजी कार्यालयीन काम काजाच्या दिवशी (सकाळ १०.०० ते सांय. ०४.३० वाजेपर्यंत) देण्यात येतील व भरून पाठविलेल्या मोहरबंद निविदा दि. १३/११/२०२६ ते दि. १९/११/२०२६ पर्यंत सायं ०४.३० वाजेपर्यंत ग्रा.पं. कार्यालय वराळे, ता.खेड, येथे स्विकारल्या जातील व शक्य झाल्यास दि. २०/११/२०२६ रोजी स. ११.०० वाजे नंतर कार्यालयात उघडण्यात येतील.

अ. क्र.	कामाचे नाव	कामाची अंदाजपत्र किंमत रू.	कोऱ्या निविदेची किंमत रूपये	इसारा रक्कम	ठेकेदार वर्ग	कामाचा कालावधी
१	मौजे वराळे येथे न.पा.पू दुरूस्ती करणे	४१९५७३/-	५००/-	४१९६/-	सु.बे.अ.	६ महिने
२	मौजे वराळे येथे न.पा.पू वितरण व्यवस्था काकडेवस्ती व तिरूपती नगर	३६०२६५/-	५००/-	३६०३/-	सु.बे.अ.	६ महिने
३	मौजे वराळे येथे नळ पाणीपुरवठा लाईन विस्तारीकरण करणे	६६१६८९/-	५००/-	६६१७/-	सु.बे.अ.	६ महिने
४	मौजे वराळे येथे एमजीपी लाईनपासून नवीन पाण्याची टाकी लाईन करणे	९४२०६७/-	५००/-	९४२१/-	मंजुर सह. संस्था	६ महिने
५	मौजे वराळे येथे प्राथमिक आरोग्य उपकेंद्र सभागृह काम करणे	९३६५१०/-	५००/-	९३६५/-	सर्वसाधारण	६ महिने
६	मौजे वराळे येथे उपकेंद्र उर्वरित काम करणे	९९९२२५/-	५००/-	९९९२/-	सर्वसाधारण	६ महिने
७	मौजे वराळे येथे उपकेंद्र उर्वरित काम करणे	९९४९०८/-	५००/-	९९४९/-	मंजुर सह. संस्था	६ महिने

टिप – १. कोणत्याही निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रा.पं. ने राखून ठेवला आहे. २. कोणतीही निविदा कारण न देता रद्द अथवा फेरबदल करण्याचा अधिकार ग्रा.पं. ने राखून ठेवला आहे. ३. सदर निविदा मोहरबंद लिफाफ्यामध्ये स्विकारल्या जातील. सुट्टीच्या दिवशी निविदा स्विकारल्या जाणार नाहीत. ४. सोबत पुढील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.
१. नोंदणी प्रमाणपत्र २. जीएसटी रजिस्ट्रेशन ३. आयकर प्रत ४. पॅनकार्ड.

सही/- ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत वराळे, ता. खेड, जि. पुणे

सही/- प्रशासक
ग्रामपंचायत वराळे, ता. खेड, जि. पुणे

करंजी तिसगाव वाहतूक कोंडीचा उच्चांक; प्रशासनावर प्रश्नचिन्ह

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



करंजी : दिवाळीला प्रवासी वाहनांची ग्रामीण भागाकडं मोठ्या प्रमाणामध्ये वर्दळ वाढल्याने करंजी घाट आणि दिवसातून चार वेळा तिसगाव येथे मोठी वाहतूक कोंडी होऊन दोन दोन तास वाहनांना वाहतूक कोंडीत टाकण्याची वेळ यावर्षी पाहायला मिळाली.

पुणे मुंबईला गेलेला नोकरवर्ग आपल्या गावाकडे दिवाळीनिमित्त तसेच भाऊबीज निमित्त नेहमीच जात असतो. त्यामुळे या रस्त्याला वर्दळ वाढते मात्र यावर्षी प्रचंड वाहतूक कोंडी होत होती.

करंजी येथे पोलीस असूनही ते आउट पोस्ट च्या बाहेर पडत नव्हते. अनेक वेळा स्थानिक तरुणांनीच वाहतूक कोंडी सोडविण्याचा प्रयत्न केला. तिसगाव येथे मात्र सातत्याने वाहतूक कोंडी होत होती. पोलीस अधून मधून उगवल्यासारखे यायचे थोडा वेळ झाला की निघून जायचे.मात्र त्यानंतर पुन्हा वाहतूक कोंडी व्हायची. गेल्या चार दिवसापासून सातत्याने कल्याण निर्मळ नांदेड या राष्ट्रीय महामार्गावर वाहतूक कोंडी होताना दिसत आहे. वाहतुक पोलीस व पोलीस प्रशासन मात्र याबाबत कोणतीच काळजी घेत नसल्याचे अनेक प्रवासी व स्थानिक नागरिकांनी सांगितले.

पोलिसांची ड्युटीच या कालावधीत असते की नाही अशी शंका ग्रामस्थांनी व्यक्त केली.

सणासुदीच्या काळात वाहतूक कोंडी होत असताना या वाहतूक कोंडीच्या पॉईंटला दोन दोन पोलीस किमान सकाळी आठ ते संध्याकाळी सहा वाजेपर्यंत जायला काय हरकत आहे. पोलीस प्रशासनाने तथा वाहतूक शाखेने याचे नियोजन का केले नाही असा सवाल ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे.

शाळेचे ऋण फेडण्यासाठी माजी विद्यार्थ्यांचा पुढाकार

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



श्रीगोंदा : ज्या शाळेच्या प्रांगणात शिक्षणाचे धडे गिरवले, संस्कारांची शिदोरी मिळवली आणि आयुष्याला दिशा मिळाली, त्या शाळेचे ऋण फेडण्यासाठी माजी विद्यार्थी सरसावले आहेत. पिसोरेखांड येथील पीएम श्री जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या विकासासाठी माजी विद्यार्थी, ग्रामस्थ आणि शिक्षकांनी एकत्र येत तब्बल एक लाख रुपयांची देणगी दिली. माजी विद्यार्थ्यांच्या या सामाजिक बांधिलकीचे सर्वत्र कौतुक होत आहे. शाळेत आयोजित माजी विद्यार्थी व पालक मेळाव्यात हा स्तुत्य उपक्रम पार पडला. या देणगीमध्ये ताराचंद पोपट जरे यांनी ५० हजार रुपये, उद्योजक अजय बाबुराव गावडे यांनी २५ हजार रुपये, तर स्वप्निल बाळासाहेब गावडे यांनी एक हजार रुपयांचे योगदान दिले. यावेळी प्रदीप इंगळे, विकास इंगळे, कैलास येरकळ, अजय गावडे, श्याम जरे, संजय इंगळे, संदीप इंगळे, संदीप ढवळे, शंकर गोरे, इंद्रभान गावडे, हरिश्चंद्र जरे, संतोष कुदांडे, दत्तात्रय जरे, दत्तात्रय खवळे, विजय इंगळे, शरद श्रीराम, केंद्रप्रमुख राम ओहोळ, विश्वनाथ जगताप, योगेश इंगळे, संदीप चौधरी, सुधाकर इंगळे, सुनील श्रीराम, अण्णा कुदांडे, हरिश्चंद्र इंगळे, सिद्धेश्वर जरे, मानसिंग इंगळे, शरद गावडे, सतीश गावडे, विलास येरकळ, रोहिदास गावडे, भाऊसाहेब इंगळे, भाऊसाहेब गोरे, अमोल जरे, गणेश गोरे, भगवान इंगळे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेतील विद्यार्थिनी कु. सृष्टी हनुमंत इंगळे व कु. सानिका मल्हारी शिंदे यांनी केले.

दखल

वेताळबाबा स्टेडियमसाठी संभाजी केशव लंके यांच्या स्मरणार्थ एल ई डी लाईट

निघोज : संभाजी केशव लंके यांच्या स्मरणार्थ त्यांचे चिरंजीव उद्योजक विकास लंके यांनी वेताळबाबा स्टेडियमसाठी एल ई डी




लाईट दिली असून याबद्दल त्याचे स्टेडियमचे सर्वेसर्वा मेजर विकास वराळ यांनी आभार मानले आहेत. वेताळबाबा स्टेडियम जवळपास तीन एकर परिसर सुसज्ज झाला असून याठिकाणी मोठ्या प्रमाणात ज्येष्ठ मंडळी व युवक तसेच महिला भगिनी मोठ्या संख्येने पहाटे व सायंकाळी व्यायाम तसेच फिरण्यासाठी येत असतात. आजी माजी सैनिक संघटना तसेच निघोज व पंचक्रोशीतील ग्रामस्थ यांनी लोकसहभागातून मोठ्या प्रमाणात या ठिकाणी देणगी देऊन वेताळबाबा स्टेडियम सुसज्ज केला आहे. पारनेर तालुक्यातील ग्रामीण भागात असणारे हे सर्वात मोठे व सुसज्ज स्टेडियम असून याठिकाणी सातत्याने क्रिडा स्पर्धा होत असतात या स्टेडियमचे नियोजन अतिशय चांगल्या पद्धतीने गावकरी व आजी माजी सैनिक संघटना यांनी केले आहे.

पसायदान सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून रामचंद्र महाराज सुपेकर यांचे कार्य कौतुकास्पद

निघोज : पठारवाडी आणि परिसरातील गोरगरीब जनतेला दिवाळी मिठाई, साडी, फेटा,शाल,धोतर वाटप करुन सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, सेवानिवृत्त प्राचार्य रामचंद्र महाराज सुपेकर सर यांनी पहिल्याच वर्षी अतिशय कौतुकास्पद समाजसेवी सेवाभावी उपक्रम राबवला असून ही संस्था मोठी होण्यासाठी पंचक्रोशीतील गावांनी देणगीच्या माध्यमातून सहकार्य करण्याचे आवाहन ज्येष्ठ पत्रकार तथा पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे यांनी केले आहे. दिपावली पाडवा निमित्ताने पठारवाडी येथील भैरवनाथ मंदीर प्रांगणात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी ते अध्यक्षीय भाषणात बोलत होते. यावेळी पसायदान सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रामचंद्र महाराज सुपेकर सर यांच्या वतीने व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पंचवीस महिला माता भगिनी यांना साडी व मिठाई वाटप तसेच पंचवीस ज्येष्ठ मंडळींचा फेटा शाल धोतर व मिठाई वाटप करुन सत्कार करण्यात आला. यावेळी पसायदान सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र महाराज सुपेकर सर, मारुती पवार गुरुजी, ज्येष्ठ संचालक, मार्गदर्शक रावजी पठारे, विठ्ठल पठारे, मा. सरपंच हरिभाऊ पवार, लक्ष्मण सुपेकर, पाटीलबा पठारे, क्रियाशील सदस्य, सचिव समाधान धनवडे, उद्योजक, मार्गदर्शक संपतराव वाढवणे, बाबासाहेब पठारे, सरपंच भास्कर सुपेकर, उपसरपंच दौलत सुपेकर, नितीन सुपेकर, रघुनाथ सुपेकर, निलेश पठारे, शांताराम बोदगे, योगेश सुपेकर, पांडुरंग सुपेकर, शाहीर सुपेकर, नानाभाऊ सुपेकर, अण्णा धनवडे, शांताराम वेताळ आदी तसेच ग्रामस्थ व महिला भगीणी मोठ्या संख्येने या वेळी उपस्थित होते.

सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांना समाजभूषण पुरस्काराने सन्मानित



जामखेड : सामाजिक कार्याची दखल घेऊन हजारोंचे प्राण वाचणारे आणि सर्व क्षेत्रात अग्रेसर असणारे सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांना समाज भूषण पुरस्कार देण्यात आला असून त्यांचे आज वितरण झाले. माणसाचे आयुष्य हे जन्मापासून सुरू होत असले, तरी त्याचे खरे अस्तित्व आणि मोठेपण तो समाजात काय कार्य करून ठेवतो, यावरच अवलंबून असते. समाजात अनेक माणसे येतात आणि जातात; मात्र ज्यांचे पाय जमिनीवर आणि हात नेहमी मदतीसाठी पुढे असतात, त्यांचे नाव काळाच्या पडद्याआड कधीच जात नाही. भुकेलेल्यांना अन्नदान करणे आणि दुःखी-कष्टाळूंच्या पाठीशी उभे राहणे हेच खरे पुण्य असते, आणि हेच पवित्र काम सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार अत्यंत निष्ठेने करत आहेत, असे गौरव उद्गार माजी जिल्हा परिषद सदस्य व ज्येष्ठ नेते प्रा. मधुकर राळेभात यांनी काढले. स्मरण केवळ आठवणींचे नव्हे, तर संस्कार आणि सेवाभाव जपासण्याचे! या उदात्त विचारांना अनुसरून जामखेड येथे कै. मोहन भगवान पवार आणि कै. सचिन मोहन पवार यांच्या पुण्यस्मरणार्थ उद्योगपती व सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार यांच्या माध्यमातून ११ नोव्हेंबर रोजी विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे औचित्य साधून सामाजिक बांधिलकीतून जामखेड येथील ३०० दिव्यांग आणि निराधार बंधू-भगिनींना अन्नदान व जीवनोपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले.

श्री नंदादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चे प्राचार्य पदी पाटील यांची नियुक्ती



जामखेड : तालुक्यातील नान्नज येथील श्री नंदादेवी विद्यालय चे माजी प्राचार्य.दशरथ पवार हे दि.३१/१०/२०२६ रोजी सेवानिवृत्त झाल्याने विद्यालयातील पर्यवेक्षक .दादासाहेब पाटील यांना प्रभारी प्राचार्य पदी नियुक्ती झाल्याबद्दल तसेच अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या इ.१० वी बोर्ड परीक्षेसाठी कृतीपत्रिका सराव संच २०२६-२७ विज्ञान आणि तंत्रज्ञान भाग-२ करिता विषय तज्ञ शिक्षक म्हणून निवड झाल्याबद्दल विद्यालयातील शिक्षक .नीरज बोऱ्हाडे यांचा सत्कार करण्यात आले स्कूल कमिटी सदस्य शहाजी राजेभोसले ,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष.गोकुळ ढेपे, शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष .आप्पासाहेब मोहळकर, आजिनाथ कुमटकर, जालिंदर चव्हाण,गहिनीनाथ मोहळकर,भरत मोहाळकर,अंकुश मोहळकर, युनूस पठाण, जमील शेख, पोतेवाडीचे सरपंच प्रवीण पोते,इस्माईल कुरेशी, अजय रजपूत, सर्व शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी शालेय शिस्त,गुणवत्ता, भौतिक सुविधा याबद्दल समाधान व्यक्त केले तसेच २०२४-२५ मध्ये शाळेने तालुकास्तरीय स्वच्छ सुंदर शाळा पुरस्कार मिळवला. इतर तक्रारी करण्यापेक्षा शिस्त आणि गुणवत्ता कशी वाढेल याकडे लक्ष द्या राजकारण शाळेवर करू नका गावात करा विद्यालयाची गुणवत्ता ही वर्षानुवर्ष वाढतच आलेली आहे तसेच या विद्यालयांमध्ये भौतिक सुविधा शिस्त सुसज्ज अशी इमारत व तज्ञ शिक्षक आहेत दहावी व बारावीचा निकाल हा चांगला लागलेला आहे तसेच माझी शाळा स्वच्छ शाळा सुंदर शाळा हे जामखेड तालुक्यात प्रथम बक्षीस मिळाले आहे त्यामुळे वाढत असलेल्या गुणवत्तेमुळे आम्ही पालक म्हणून आमची कुठलीही तक्रार नाही खूप समाधानकारक असेच काम आहे.

पैठण उजवा कालव्यात पाणी आवर्तन सुटल्याने शेतकरी आनंदले

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

हातगाव : मराठवाड्यासह अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यातील अनेक गावांसाठी वरदान ठरणाऱ्या पैठण येथील नाथसागर जलाशयाच्या उजवा कालव्यात रब्बीचे पहिले आवर्तन सुटले असल्याने शेवगाव तालुक्यातील १५ ते २० गावासह इतरही असंख्य गावांना ऐन दुष्काळात मोठा दिलासा मिळाला असून शेकडो शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असल्याचे दिसून येत आहे. पैठण जलाशयाची निर्मिती होताना शेवगाव तालुक्यातील असंख्य गावांना विस्थापित व्हावे लागले असून निर्मितीच्या वेळी विस्थापित झालेल्या या गावांचे त्यावेळी शासनाने पुनर्वसन करून या सर्व गावांना पुनर्वसनचा दर्जा दिलेल्या आहे. जलाशयाची निर्मिती होताना १०२ टी एम सी ची निर्मिती करण्यात आली असून त्यामध्ये ७६ टक्के जिवंत तर २६ टक्के मृत साठा धरणाच्या दप्तरी निश्चित करण्यात आलेला आहे. सध्या दुष्काळाची मोठ्या प्रमाणात परस्थिती निर्माण झाली असताना उजवा कालव्यात पाणी आवर्तन सुटते की नाही या चिंतेत असणाऱ्या शेतकऱ्यांनी गेली अनेक दिवसापासून कालव्यात पाणी सुटावे म्हणून मागणी केली होती. मागणीनंतर वैधानिक विकास महामंडळाच्या संभाजीनगर येथील कार्यालयात राज्याचे जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थित जलाशयाच्या सर्व प्रमुख अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन रब्बी हंगामासाठी ३ आवर्तन तर उन्हाळी १ आवर्तन निश्चित केले असून त्या मध्ये प्रत्येक आवर्तनात १५ दिवस कालव्यात पाणी ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

बुधवार दि. ११ नोव्हेंबर २६ पर्यंत सकाळी ६ वाजेपर्यंत जलाशयात ७०. २८ टक्के एवढा पाणी साठा शिल्लक होता तर त्याच पाणी साठ्याची गुरुवार दि.१२ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजेपर्यंत ६९. ७४ टक्के एवढी जलाशयाच्या दप्तरी नोंद नोंदली गेली असल्याचेही सांगण्यात आले असून गत वर्षी याच दोन्हीही तारखेला जलाशयात १०० टक्के पाणी साठा असल्याची नोंद पाटबंधारे विभागाकडून उपलब्ध झाली आहे.

त्यामुळे बैठकीत ठरलेले पहिले आवर्तन मंगळवार दि ९ रोजी ३०० क्युसेसने सोडण्यात आले असून गुरुवार दि.१२ रोजी सकाळी ६ नोंदीवरील माहिती नुसार त्यामध्ये वाढ करून १४०० क्यूससच्या पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. या सुटलेल्या अवर्तनाचा शेवगाव तालुक्यातील खडका, मडका, खामपिंपरी, पिंगेवाडी,हातगाव, मुंगी, कांबी या कालव्यालगतच्या गावासह लखमापूरी, दहीगाव - शे, प्रभुवाडगाव, सोनविहीर या जमिनीचे मोठमोठे क्षेत्र असणाऱ्या गावांना त्याचा मोठ्या प्रमाणात लाभ होत असून यातील अनेक गावांनी व या व्यतिरिक्तही काही गावांनी पाणी उपसा करण्याच्या पाटबंधारे विभागाकडून रीतसर परवानग्या घेऊन लाभ घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

शांताई दूध उद्योग समूहाकडून १ कोटी १ लाखाचा बोनस

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



निघोज : पारनेर व शिरुर तालुक्यातील बागायत पट्ट्यातील गावांमध्ये दूध संकलन करीत शुन्यातून दूध उद्योग समूह उभा करुण आज जवळपास प्रतिदिन ३० हजार लिटर दूध संकलन करणाऱ्या टाकळी हाजी येथील शांताई दूध उद्योग समूहाने दूध उत्पादक शेतकऱ्यांची दिवाळी गोड केली असून १ कोटी १ लाख रुपये बोनसचे रोख वाटप करीत गरीबीची जाण असणाऱ्या शांताई दूध उद्योग समूहाचे सर्वेसर्वा दिलीपराव सोदक यांनी परिसरातील अनाथ मुलांना कपडे, दिवाळी मिठाई वाटप करीत सामाजिक सेवाभाव साधण्याचे काम केले आहे. १ कोटी १ लाख बोनस वाटप केल्याने जवळपास १ हजार ३४९ दूध उत्पादक शेतकऱ्यांना याचा लाभ मिळाला असून दुष्काळी परिस्थितीची जाण असणाऱ्या शांताई दूध उद्योग समूहाचे सर्वेसर्वा दिलीपराव सोदक यांनी शेतकऱ्यांच्या घरामध्ये खऱ्या अर्थाने दिवाळीचा आनंद दिला आहे. सन २०११ मध्ये शांताई दूध उद्योग समूहाची सुरुवात फक्त २ हजार लिटर संकलन करीत सुरुवात झाली. आज हेच संकलन प्रतिदिन ३० हजार लिटर पर्यंत गेले आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सोदक साहेब यांनी दूध उद्योग समूह उभा केला. मात्र शेतकऱ्यांची विश्वासाहर्ता मिळवीत त्यांनी विश्वास संपादन केला. दूध उत्पादक शेतकऱ्यांना गायी घेण्यासाठी आगाऊ रक्कम देत तसेच शेतकऱ्यांच्या सुखा दुःखात सहभागी होऊन सातत्याने त्यांना आर्थिक मदत करीत शेतकऱ्यांना पाठबळ देण्याचे काम त्यांनी सातत्याने केले. हेच काम करीत असताना रंजल्या गांजलेल्या मुलांना कपडे वाटप व खाऊ वाटप करीत त्यांनी शाळेसाठी सहकार्य करीत विद्यार्थ्यांना शैक्षणिक स्पर्धेत सहभागी करण्यासाठी पाठबळ दिले. हाच गोरगरीब जनतेचा आशीर्वाद त्यांना कामी आला असून निघोज असो किंवा टाकळी हाजी येथील सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक कार्यात सातत्याने सहभागी होऊन त्यांनी सर्वांनाच मदतीचा हात दिला.

सर्वसामान्य जनतेच्या आशीर्वादाने त्यांना आज भरभरून मिळाले. प्रत्येक वर्षी दूध उत्पादक शेतकऱ्यांना बोनसचे भरभरून वाटप करीत ते सर्वसामान्य जनतेला दिवाळीचा आनंद देत आहेत. आपण सर्वसामान्य परस्थीतून सावरलो आहे हे केवळ सर्वसामान्य जनतेच्या आशीर्वादाने शक्य झाले आहे. शांताई दूध उद्योग समूहाच्या विकासामध्ये माझे कुटुंब, पत्नी मुले मित्र परिवार व जनतेचे पाठबळ यामुळे खऱ्या अर्थाने विकास झाला असून प्रत्येक दिवाळीला दिवाळीचा आनंद सर्वसामान्य जनता माझे दैवत असणारे दूध उत्पादक शेतकरी यांना देणे हे मी माझे नैतिक कर्तव्य समजतो.

महिलांनी घालून दिला एकीचा आदर्श!२५ बचत गटांचा अनोखा उपक्रम

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : दिवाळीचा आनंद केवळ पैशांतून नव्हे, तर एकजुटीतूनही द्विगुणित करता येतो, याचा सुंदर प्रत्यय एंडोली येथे आला. गरुडझेप महिला ग्रामसंघातील २५ बचत गटांनी एकत्र येत दिवाळीनिमित्त महिला सदस्यांना साखरेचे वाटप केले. महिलांनी स्वतःच्या बचतीतून घराघरांत गोडवा पोहोचविण्याचा हा उपक्रम गावात कौतुकाचा विषय ठरला आहे. गरुडझेप महिला ग्रामसंघातील सर्व २५ बचत गटांचे आर्थिक व्यवहार नियमित व व्यवस्थित सुरू आहेत. या गटांमध्ये जमा होणारी बचत, व्याज, दंड आणि हप्त्यांच्या रकमेतून दिवाळीनिमित्त साखर वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला. विशेष म्हणजे, कोणावरही आर्थिक भार न टाकता स्वतःच्या सामूहिक आर्थिक नियोजनातून महिलांनी हा उपक्रम साकारला. महिलांची बचत ही केवळ अडचणीच्या काळातील आर्थिक मदत नसून सामाजिक एकजूट आणि परस्पर सहकार्याचेही प्रभावी माध्यम ठरू शकते, हे या उपक्रमातून अधोरेखित झाले. बचतीच्या छोट्या-छोट्या थेंबांतून दिवाळीचा मोठा आनंद निर्माण करण्याची किमया या महिलांनी साधली. या उपक्रमावेळी माता भीमाई गटाच्या अध्यक्षा दीपाली शेंडगे, सचिव अनिता जठार, माता रमाई गटाच्या अध्यक्षा संध्या शिंदे, सचिव ऋतुजा शिंदे, राधाकृष्ण गटाच्या अध्यक्षा मंदा कोळपे, सचिव सुनीता पवळ, श्रीगणेश गटाच्या अध्यक्षा अश्विनी इथापे, सचिव अनिता पंदरकर यांच्यासह मीना शिंदे, लता शिंदे, उज्वला शिंदे, बबई शिंदे, शोभा शिंदे, सुमन कोळपे, मंदा शिंदे, गौरी शिंदे, मनीषा थोरात, रंजना शिंदे आदी महिला उपस्थित होत्या. या उपक्रमासाठी मोहन कोळपे, कुलदीप इथापे आणि पप्पू शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.स्वतःच्या बचतीतून स्वतःच्या सणात गोडवा निर्माण करणाऱ्या एंडोलीच्या महिलांनी महिला सक्षमीकरणाचा खरा अर्थ कृतीतून दाखवून दिला आहे.

पाच वर्षांपासून बंद, पळशी-पुणे एसटी बस पुन्हा सुरू

आ. दातेंच्या हस्ते बससेवेचा शुभारंभ..!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



पारनेर : पारनेर तालुक्यातील पळशी-पुणे मार्गावरील प्रवाशांसाठी आनंदाची बातमी! गेली अनेक वर्षांपासून सुरू असलेली पळशी-पुणे एसटी बससेवा मागील पाच वर्षांपासून बंद होती. त्यामुळे या मार्गावरील विद्यार्थी, नोकरदार, शेतकरी आणि सर्वसामान्य प्रवाशांची मोठी गैरसोय होत होती. ही बससेवा पुन्हा सुरू व्हावी, अशी नागरिकांची अनेक दिवसांपासून मागणी होती.

ही बाब लक्षात घेऊन सुभाष गांधी यांनी पळशी-पुणे बससेवा पुन्हा सुरू करण्यासाठी आमदार काशिनाथ दाते सर आणि पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या या मागणीची दखल घेत पालकमंत्री व आमदार साहेबांनी संबंधित विभागाकडे ही बससेवा सुरू करण्यासंदर्भात पाठपुरावा केला. पाच वर्षांपासून बंद असलेली पुणे-पळशी एसटी बससेवा आजपासून पुन्हा सुरू झाली आहे.

आज आमदार काशिनाथ दाते सर यांच्या हस्ते या बससेवेचा शुभारंभ करण्यात आला. यामुळे पुणे आणि पळशी दरम्यान प्रवास करणाऱ्या नागरिकांची मोठी सोय होणार असून, विद्यार्थी, नोकरदार व सर्वसामान्य प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.

यावेळी आगारप्रमुख अमोल कोतकर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष वसंतदादा चेडे, सुभाष गांधी, हरिओम शिंदे, पांडुरंग वाळुंज, रमेश मोढवे, गणेश शिंदे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

पाच वर्षांपासून बंद असलेली बससेवा पुन्हा सुरू झाल्याने परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

या बससेवेसाठी सातत्याने पाठपुरावा करणारे सुभाष गांधी तसेच पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील व आमदार काशिनाथ दाते सर यांचे नागरिकांकडून आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

दीपावली पाडव्याला फुलला कर्जतच्या भूमिपुत्रांचा सहकुटुंब मैत्रीचा गोडवा

३६ वा पाडवा मेळावा विविध उपक्रमांनी संपन्न

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



कर्जत : शाळा-महाविद्यालयातील मैत्री आजतागायत आम्ही कर्जतकरांनी मनात कोरली असून आमच्या पुढील पिढीने देखील या मैत्रीत्वाचा धागा कायम जपायला हवा. प्रशासकीय सेवा असो किंवा व्यावसायिक क्षेत्र आम्ही सर्व मित्रांनी त्यास न्याय देत हा गुंफलेला मैत्रीचा धागा आजमितीस तब्बल ३६ वर्षे अखंड ठेवला आहे. म्हणतात ना संगत आयुष्य घडवते पण आणि बिघडवते पण. मात्र चांगली मैत्री एखाद्या पुस्तकासारखी असते. जी कायम आयुष्यासाठी मार्गदर्शक ठरते. आज वेगवेगळ्या जबाबदारीने लांब गेलो असलो तरी प्रत्येक दिवाळीचा पाडवा मैत्रजनांच्या सहवासाने फुलतो या सारखे समाधान आणि आनंद दुसरे कशातच नाही आहे असे प्रतिपादन मुंबईचे पोलीस उपअधीक्षक राजेंद्र तोरडमल यांनी केले. ते कर्जत येथे शांतीसेना आणि भटकंती समूहाच्या दिवाळी-पाडवा स्नेह मेळाव्यात बोलत होते.

कर्जत भटकंती समूहाचे अध्यक्ष अड नंदकुमार लांगोरे यांच्या संकल्पनेतून शहरातील शिंदेवाडी राऊत फार्म येथे ३६ व्या दीपावली पाडवा मैत्रजनांचा स्नेह मेळावा मंगळवारी पार पडला. यावेळी नोकरीनिम्मित बाहेर असलेले कर्जतचे भूमिपुत्र आणि स्थानिकांचा दरवर्षी प्रमाणे यंदा देखील सहकुटुंब मैत्रीचा मळा फुलला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पोलीस उपअधीक्षक राजेंद्र तोरडमल तर प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई मंत्रालयाचे आरोग्य विभागाचे सेवानिवृत्त उपसचिव विलास बेद्रे, अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे सेवानिवृत्त अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजीराव लांगोरे होते. यावेळी बोलताना संभाजीराव लांगोरे म्हणाले की, नोकरी आणि संसारिक जबाबदारीच्या व्यस्त कार्यात दिवाळीचा पाडवा मैत्रीच्या सहवासाने कायम हवाहवासा वाटतो. लहान मुलं, तरुणाई फटाकेच्या आकर्षणाने याकडे पाहत असले तरी आम्ही या दिवाळी सणाकडे एकमेकांच्या प्रत्यक्ष भेटीसाठी व्याकुळ झालेले असतो. ही भेट आम्हाला वर्षभर प्रेरणा देणारी ठरते. जिची आम्ही सर्व कर्जतकर एका चातका पक्ष्यांप्रमाणे वाट पाहत असतो. आयुष्य क्षणभंगुर आहे याची जाणिव असताना देखील पुढील दिवाळीच्या पाडव्याला नक्की भेटू ही आस मनी घेत निरोप घेताना मन भावूक होते असे म्हणत आम्ही जशी आमची संगत ठेवली तीच संगत आमच्या मुलांनी देखील एकमेकांच्या सुखदुःखात पार पाडावी असे उपस्थितांना आवाहन केले. यावेळी कर्जत शहराच्या लगत असणाऱ्या राऊत फार्मवर मैत्रजनांचा सहकुटुंब मेळावा स्नेह भोजनांच्या पंगतीने समारोप झाला. यावेळी सेवानिवृत्त पोलीस उपअधीक्षक शकुर सय्यद, सेवानिवृत्त उपविभागीय कृषी अधिकारी राजेंद्र सुपेकर, उद्धव सुपेकर, कोकण विभागाचे सेवानिवृत्त गटविकास अधिकारी बाळासाहेब भोगे, सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक कैलास काळे, नंदकुमार भांड, सोन्याबापु धनवटे, सुनील देशमुख, राजेंद्र काळोखे, राजेंद्र बारटक्के, राहुल राऊत, राजेंद्र गांगर्डे, राजेश राऊत, स्वप्नील मराळ, पप्पू भारती, पत्रकार डॉ अफरोजखान पठाण, तनोज लांगोरे, गणेश तोरडमल, फिरोज सय्यद, मयूर साळुंके, श्रीकांत राऊत, अरविंद हिंगसे, सतीश पवार आदी उपस्थित होते.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री

शुक्रवार, दि.१३ नोव्हेंबर २०२६ । पान ८

ऊर्जा स्वावलंबनासाठी बायो-सीबीजी प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार : राधाकृष्ण विखे पाटील

पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे कारखान्यात प्रतिदिन १६ टन क्षमतेच्या प्रकल्पाचे भूमिपूजन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

लोणी : सहकारी साखर कारखान्यांमध्ये बायो-सीबीजी प्रकल्प उभारण्यासाठी केंद्र सरकारने दिलेले पाठबळ आत्मनिर्भर भारताच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. या प्रकल्पांच्या माध्यमातून देशाला ऊर्जा क्षेत्रात स्वावलंबी होण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वास जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.

पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे सहकारी साखर कारखान्याच्या वतीने केंद्र सरकारच्या गोवर्धन योजनेअंतर्गत प्रतिदिन १६ टन क्षमतेचा बायो-सीबीजी प्रकल्प उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पाचा भूमिपूजन समारंभ मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत झाला. माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे



पाटील, उपाध्यक्ष सोपानराव शिरसाठ, सभापती ज्ञानेश्वर गोंदकर, नगराध्यक्ष डॉ. स्वाधीन गाडेकर, नंदूशेठ राठी, मकरंद गुणे, मच्छिंद्र थेटे, कार्यकारी संचालक महेश कोनापुरे यांच्यासह शेतकरी, सभासद व अधिकारी उपस्थित होते. अण्णासाहेब म्हस्के पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त दुष्काळ सहाय्यता निधीसाठी पाच लाख रुपयांचा धनादेश शासनाकडे सुपूर्द करण्यात आला.

विखे पाटील म्हणाले की, विखे कारखान्याने बायो-सीबीजी प्रकल्प उभारण्याचा धाडसी निर्णय घेतला आहे. शेतातील वाया जाणाऱ्या कृषी अवशेषांचा उपयोग करून आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने त्याचे ऊर्जेत रूपांतर केले जाणार आहे. हा प्रकल्प देशाच्या ऊर्जा सुरक्षेसाठी महत्त्वपूर्ण ठरेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऊर्जा स्वावलंबन आणि पर्यावरणपूरक विकासाचे उद्दिष्ट देशासमोर ठेवले आहे. हरित ऊर्जा निर्मितीमुळे शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्नाचे साधन उपलब्ध होणार आहे.

कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रयत्नांतून कारखान्याचे विस्तारीकरण कमी कालावधीत पूर्ण झाले असून, हे काम देशातील विक्रम असल्याचे त्यांनी नमूद केले. भविष्यात साखर कारखानदारीचे अर्थकारण सक्षम करायचे असेल, तर कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादन वाढविण्याला प्राधान्य द्यावे लागेल, असेही ते म्हणाले.

डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आणि केंद्रीय सहकारमंत्री अमित शाह यांच्या माध्यमातून सहकारी साखर कारखानदारीला मोठे पाठबळ मिळत आहे. नव्या प्रकल्पातून शेतकरी हिताला प्राधान्य मिळणार असून, कारखान्याने एक लाख टन ऊस गाळपाचा टप्पा पूर्ण करून राज्यात प्रथम स्थान मिळविले आहे.

अण्णासाहेब म्हस्के पाटील यांनी कारखान्याच्या गळीत हंगामाच्या नियोजनाचे कौतुक केले. सहकारी साखर कारखानदारीसमोर अनेक आव्हाने असली, तरी आधुनिक प्रयोग आणि सामूहिक प्रयत्नांतून पुढील पिढीच्या नेतृत्वाखाली ही व्यवस्था टिकविण्याचे प्रयत्न यशस्वी होत असल्याचे त्यांनी सांगितले.

खासदार ते सहकाराचे शिलेदार!

डॉ. सुजयदादा विखे पाटील : लोकसभेपासून महाराष्ट्राच्या राजकीय आणि सहकार क्षेत्रातील नेतृत्वापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास! विकासाची दूरदृष्टी, जनसंपर्काची ताकद, राजकीय निर्णयक्षमता आणि नेतृत्वाचा ठसा उमटवणारे नाव म्हणजे डॉ. सुजयदादा विखे पाटील!

राजकारणात पद मिळवणे सोपे असते; मात्र त्या पदाच्या माध्यमातून जनतेच्या अपेक्षांना न्याय देणे, मतदारसंघाच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न करणे आणि आपल्या कार्यकर्तृत्वातून स्वतंत्र ओळख निर्माण करणे ही खरी नेतृत्वाची कसोटी असते. हीच कसोटी पार करत



डॉ. सुजयदादा विखे पाटील यांनी अहिल्यानगर जिल्ह्याच्या राजकारणात आपली वेगळी छाप निर्माण केली आहे.

वैद्यकीय क्षेत्रातील उच्चशिक्षण आणि न्यूरोसर्जन म्हणून व्यावसायिक ओळख असतानाही त्यांनी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सक्रिय होण्याचा निर्णय घेतला. जनतेशी जोडलेली नाळ, विकासाची तळमळ आणि राजकीय क्षेत्रातील सक्रिय सहभाग या बळावर त्यांनी २०१९ मध्ये भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून लोकसभेची निवडणूक लढवली आणि अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघातून खासदार म्हणून निवडून येण्याचा मान मिळवला.

खासदारकीचा कार्यकाळ : विकासासाठी संसदेत बुलंद आवाज!

खासदार म्हणून काम करताना डॉ. सुजयदादा विखे पाटील यांनी केवळ संसदेतील उपस्थितीपुरते स्वतःला मर्यादित ठेवले नाही, तर अहिल्यानगर जिल्ह्यातील पायाभूत सुविधा, दळणवळण, रेल्वे, महामार्ग, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना राष्ट्रीय स्तरावर मांडण्याचा प्रयत्न केला. सुरत-चेन्नई महामार्ग, अहिल्यानगर-पुणे रेल्वेसेवा, विमानसेवा, विकासात्मक पायाभूत सुविधा अशा विविध विषयांवर त्यांनी संसदेत आवाज उठवला. त्यांच्या खासदारकीच्या कार्यकाळात ५०८ प्रश्न उपस्थित करणे आणि १०५ चर्चांमध्ये सहभाग नोंदवणे ही त्यांच्या संसदीय कामकाजाची उल्लेखनीय आकडेवारी आहे. खासदार म्हणून मतदारसंघातील विकासकामांना गती देण्यासाठी केंद्र सरकारच्या विविध विभागांशी समन्वय साधणे, विकासनिधीच्या माध्यमातून कामे मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणे आणि ग्रामीण भागातील नागरिकांच्या समस्या शासनदरबारी पोहोचवणे, या बाबींमध्ये त्यांनी सक्रिय भूमिका बजावली.

खासदारकीनंतरही राजकीय प्रवासाला नवी दिशा!

लोकसभेच्या निवडणुकीत विजय मिळाला नाही म्हणून राजकीय प्रवास थांबत नाही, हे डॉ. सुजयदादांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. खासदारकी संपल्यानंतरही त्यांनी जनसंपर्क, संघटनात्मक बांधणी आणि राजकीय सक्रियता कायम ठेवली. भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक पातळीवर काम करत त्यांनी महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली. हे पद म्हणजे केवळ राजकीय सन्मान नसून पक्षाच्या संघटनात्मक विस्ताराची, कार्यकर्त्यांना बळ देण्याची आणि राज्याच्या राजकारणात प्रभावी भूमिका बजावण्याची मोठी जबाबदारी आहे.

सहकार क्षेत्रातील नवे पर्व : जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदापर्यंत झेप!

राजकारणासोबतच महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या सहकार क्षेत्रातही डॉ. सुजय विखे पाटील यांनी महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदी बिनविरोध निवड झाल्यानंतर आता १२ नोव्हेंबर २०२६ रोजी बँकेच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली आहे. खासदारकी, पक्ष संघटनेतील प्रदेश उपाध्यक्षपद आणि आता जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदापर्यंतचा हा प्रवास त्यांच्या राजकीय कारकिर्दीतील महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

जिल्हा बँक ही केवळ आर्थिक संस्था नसून शेतकरी, विविध कार्यकारी सेवा संस्था, सहकारी संस्था आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला आधार देणारी महत्त्वपूर्ण यंत्रणा आहे. त्यामुळे या बँकेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी म्हणजे जिल्ह्यातील सहकार क्षेत्राच्या भवितव्याची मोठी जबाबदारी आहे.

नेतृत्वाची खरी कसोटी आता सुरू!

खासदार म्हणून दिल्लीच्या संसदेत जिल्ह्याचा आवाज बुलंद करणे, भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदाच्या माध्यमातून संघटनात्मक जबाबदारी पार पाडणे आणि आता अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदावरून सहकार क्षेत्राचे नेतृत्व करणे, असा डॉ. सुजयदादा विखे पाटील यांचा प्रवास निश्चितच लक्षवेधी आहे.

पद बदलले, जबाबदाऱ्या बदलल्या; मात्र जिल्ह्याच्या राजकीय आणि विकासात्मक घडामोडींमध्ये आपली भूमिका कायम ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न दिसून येतो. आता जिल्हा बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक बळ, सहकारी संस्थांना नवी दिशा, पारदर्शक कारभार आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती देण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर आहे. खासदारकीपासून प्रदेश उपाध्यक्षपदापर्यंत आणि तेथून जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदापर्यंतचा प्रवास हा केवळ पदांचा आलेख नाही; तर बदलत्या राजकीय परिस्थितीत स्वतःची भूमिका आणि नेतृत्व सिद्ध करण्याचा प्रवास आहे.

राजकारणात अनेक चेहरे येतात आणि जातात; मात्र आपल्या कार्यातून, निर्णयक्षमतेतून आणि नेतृत्वाच्या ठशातून स्वतंत्र ओळख निर्माण करणारी व्यक्तिमत्त्वे कायम स्मरणात राहतात. डॉ. सुजयदादा विखे पाटील यांचा हा प्रवास अहिल्यानगर जिल्ह्याच्या राजकीय इतिहासातील एक उल्लेखनीय अध्याय ठरावा, हीच अपेक्षा!

खासदार ते माजी खासदार ते भारतीय जनता पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष आणि आता जिल्हा बँकेचे अध्यक्ष - नेतृत्वाचा प्रवास, जबाबदारीचा नवा अध्याय आणि विकासाच्या अपेक्षांचे नवे पर्व!

शब्दांकन : विक्रमसिंह राजे भोसले

भाव द्या !; नेवासे फाट्यावर शेतकरी संघटनेचा चक्काजाम

सत्ताधारी आ. विठ्ठलराव लंघे थेट रस्त्यावर



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व साखर सम्राट एकत्र येऊन हातात हात घालू शकतात, मग घाम गाळणाऱ्या शेतकऱ्यांच्या उसाला योग्य भाव देण्यासाठी त्यांना एकत्र का येता येत नाही? असा संतप्त सवाल विचारत शेतकरी संघटनेच्या वतीने मंगळवारी अहिल्यानगर-छत्रपती संभाजीनगर महामार्गावर नेवासे फाटा येथील राजमुद्रा चौकात तीव्र रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. तब्बल दोन तास महामार्ग रोखून धरत चक्का जाम केला.

या आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी भररस्त्यात ठिय्या मांडून भजन करत साखर सम्राटांचा जाहीर निषेध नोंदवला. आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना ठरलेल्या प्रवरानगर कारखान्यानेच आता पुढाकार घेऊन उसाचा पहिला भाव जाहीर करावा, अशी मागणी करण्यात आली. तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी उसाला प्रतिटन किमान साडेचार हजार रुपये दर द्यावा, असा आक्रमक पवित्रा आंदोलकांनी घेतला. सत्तेत असूनही आमदार शेतकऱ्यांसोबत थेट रस्त्यावर या आंदोलनाचे प्रमुख आकर्षण ठरले ते आमदार विठ्ठलराव लंघे-पाटील यांची प्रत्यक्ष उपस्थिती. सत्तेत सहभागी असूनही ते शेतकऱ्यांच्या रास्त मागण्यांसाठी थेट आंदोलनात उतरले आणि रखरखत्या उन्हात रस्त्यावर मांडी घालून बसले.

यावेळी भूमिका मांडताना आमदार लंघे-पाटील म्हणाले, मी केवळ एका तालुक्याचा आमदार म्हणून नव्हे, तर एक शेतकरी पुत्र म्हणून आज तुमच्या सोबत बसलो आहे. ऊस पिकवणे शेतकऱ्यांच्या हातात असले तरी त्याला योग्य भाव मिळवणे बळीराजाच्या हातात उरलेले नाही. शेतकरी सध्या भीषण दुष्काळाला तोंड देत असताना उसाला योग्य दर मिळणे अत्यावश्यक आहे. शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपये वर्षानुवर्षे कारखानदारांकडे अडकून पडले आहेत. ही थकीत रक्कम व्याजासह तातडीने परत करावी, हीच माझी प्रमुख मागणी असल्याचे सांगत आमदार लंघे-पाटील यांनी आंदोलनाला जाहीर पाठिंबा देताच उपस्थितांनी त्यांचे जोरदार स्वागत केले.



शिर्डी शहराच्या प्रथम महिला नगराध्यक्षा तथा
श्री साईबाबा संस्थानच्या माजी विश्वस्त
स्व. सुमित्रा (काकी) कैलासबापू कोते
भावपूर्ण श्रद्धांजली!
हॉटेल लक्ष्मी पॅलेस
श्री.सुधाकर बाजीराव शिंदे पा.
लक्ष्मीबाई शिंदे मार्ग, कौशल्यानगर, शिर्डी

दीपावली पाडव्यानिमित्त हार्दिक शुभेच्छा
श्री.गणेश जाधव पुणतांबा
राहता तालुका अध्यक्ष मनसे
श्री.बाळासाहेब निवृत्ती चव्हाण पुणतांबा
सरचिटणीस राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार अहिल्यानगर जिल्हा
कै.रखमाजी म्हातारबा बखळे पा.
सामाजिक प्रतिष्ठान पुणतांबा
श्री संदीप वहाडणे पा पुणतांबा
अध्यक्ष शेतकरी सेना (मनसे) राहाता तालुका

दीपावली, पाडवा व भाऊबीजेच्या हार्दिक शुभेच्छा...
लेट श्री एकनाथ नामदेव गटकळ इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, टाकळीभान, ता. श्रीरामपूर
अँड भाऊसाहेब टेमक - संस्थापक
अँड सुरेखा टेमक - शैक्षणिक संकुल प्रमुख
प्राचार्य व सर्व शिक्षक, सेवक वृंद लेट श्री एकनाथ नामदेव गटकळ इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज टाकळीभान.

दीपावली, पाडवा व भाऊबीजेच्या हार्दिक शुभेच्छा...
मा. श्री सुभाष नाना मांजरे
(गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर) भोकर ता. श्रीरामपूर
(सर्व शासकीय कामे चांगले व दर्जेदार पद्धतीने केले जातील...)



शिर्डी शहराच्या प्रथम महिला नगराध्यक्षा तथा
श्री साईबाबा संस्थानच्या माजी विश्वस्त
स्व. सुमित्रा (काकी) कैलासबापू कोते
यांच्या दशक्रियाविधी निमित्त
भावपूर्ण श्रद्धांजली!
हॉटेल तानिया प्रेसिडेंट इन
श्री. दादासाहेब गोंदकर पा. • श्री. पिटर फिलिप फर्नांडिस

दीपावली, पाडवा व भाऊबीजेच्या हार्दिक शुभेच्छा...
दीपावली, पाडवा व भाऊबीजेच्या सर्व शेतकरी, शेतमजूर व सर्व नागरिकांना हार्दिक शुभेच्छा...
आशीर्वाद
स्व.अँड बबनराव काळे
आशीर्वाद
मा.श्री रघुनाथ दादा पाटील (शेतकरी संघटना ,महाराष्ट्र राज्य अध्यक्ष)
शेतकरी संघटना
जय जवान जय किसान
शेतकऱ्यांचा बुलंद आवाज
आदरणीय
अँड.अजितराव काळे साहेब
उपाध्यक्ष शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य

दीपावली, पाडवा व भाऊबीजेच्या हार्दिक शुभेच्छा...
ग्रामपंचायत भोकर, ता. श्रीरामपूर
ग्रामपंचायत हा लोकशाहीचा खरा पाया आहे...
- ग्रामपचायत सदस्य मंडळ -
श्री. सागर दत्तात्रय आहेर
श्री. मयूर दत्तात्रय काळे
सौ. हिराबाई मच्छिंद्र खंडागळे
सौ. माया तान्हाजी राक्षे
सौ.सीमा सुनील विधाटे
सौ. संगीता बाळासाहेब अभंग
सौ. संजीवनी ज्ञानेश्वर काळे
श्री. संदीप बापूसाहेब गांधले
श्रीमती. छाया दत्तात्रय आहेर
सौ. मीना राजेंद्र आबूज
श्री. संजय काळू गायकवाड
श्री. विजय पाऊलस अमोलिक
श्री.गिरीष मते (उपसरपंच) भोकर,
ग्रामसेवक व सर्व कर्मचारी वृंद, ग्रामपंचायत भोकर



सत्तेची खुर्ची असो वा नसो, जनतेच्या मनावर राज्य करणारा एकमेव 'ब्रँड' म्हणजे आमचे साहेब !
मा.खा.डॉ.सुजय (दादा) विखे पा.
अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या चेअरमन पदी निवड झाल्याबद्दल
हार्दिक शुभेच्छा...
- शुभेच्छुक -
श्री.अंबादास बाप्पाजी पिसाळ
अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेचे माजी संचालक
श्री.विक्रम सिंह राजे भोसले
भाजपा नेते राशीन